# विकास प्रतिमान विषयक चर्चासत्र

(रविवार, दि. १५ डिसेंबर २००२)

## आधारभूत टिपणे व संक्षिप्त अहवाल

प्रयास

संसाधने व उपजीविका गट,

प्रयास, पुणे.

## प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे चालणारे काम

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांचा उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व प्रयत्नांच्या केंद्रस्थानी कसा आणता येईल यावर संसाधने आणि उपजीविका गट काम करीत आहे. या गटात खालील विषयावर काम चालू आहे.

१) शाश्वत उपजीविकेचा विकासविषयक दृष्टिकोनाच्या मांडणीचे काम

शाश्वत उपजीविका या विषयावर संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन अंगाने काम करण्याचा या गटाचा उद्देश आहे. यामध्ये, 'शाश्वत उपजीविका' यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर चाललेल्या चर्चेचा अभ्यास करणे आणि या चर्चेत सहभागी असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिकेची चिकित्सा करणे हा या कामाचा एक भाग आहे. तळागाळातल्या कार्यकर्त्यांसमोर या चर्चेचे विश्लेषण मांडून त्यांची दृष्टी, त्यांचा अनुभव आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चेमध्ये नेण्यासाठी प्रयत्न करण्याची या गटाची इच्छा आहे. तसेच पर्यायी प्रतिमानाच्या संकल्पनात्मक बाजूवर विचार करणे आणि 'शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाची (Sustainable Livelihood Perspective) संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन पातळ्यांवर मांडणी करणे, हा या कामाचा दुसरा भाग आहे.

२) अ) आदिवासी कुटुंबाच्या प्रत्यक्षातील उपजीविकांचे विवरण

रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या उपजीविकेच्या परिस्थितीसंबंधी सखोल माहिती मिळवणे हे या अभ्यासामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

ब) इतर अभ्यासात्मक उपक्रम

- रायगड जिल्ह्यातील सरकारी पातळीवर दारिद्र्य-निर्मूलन व आदिवासी विकासाचा योजनांचा अभ्यास तळागाळातील संघटनांच्या दृष्टीतून करणे.
- सरकारने स्वीकारलेल्या पर्यायी योजनेचा (परसबाग योजना) अभ्यास करणे.

३) कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती

समाजातील वंचित समूहाच्या शाश्वत उपजीविकेसाठी रोख पैसे व बाह्य साधनाची गरज कमी असणाऱ्या कसणूकीच्या पद्धती व तंत्रे (विशेषत: नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनासंबंधी) यावर काम करणे हे गटाचे दुसरे प्रमुख उद्देश्य आहे. या कामामध्ये प्रयोग, प्रत्यक्षदर्शन (डेमॉन्स्ट्रेशन), प्रशिक्षण, व माहितीसंकलन असा चार सूत्री कार्यक्रम चालू आहे.

**खाजगी वितरणासाठी** **देणगी मूल्य रु. २०/-**

# अनुक्रमणिका

१. प्रस्तावना

२. मूळ टिपणे

प्रा. स. ह. देशपांडे, डॉ. मिलिंद बोकील, डॉ. सुबोध वागळे

३. प्रतिक्रियात्मक टिपणे

प्रा. स. ह. देशपांडे, प्रा. अजित अभ्यंकर, डॉ. विवेक कुलकर्णी,
प्रा. चंद्रकांत केळकर, डॉ. माधव दातार, प्रा. रा. के. पाटील,
डॉ. चि. मो. पंडित, श्री. रामदास भटकळ

४. चर्चासत्राचा संक्षिप्त अहवाल

५. उपस्थित व्यक्तींची नावे व संपर्क पत्ते

---

(प्रा. प्रकाश गोळे यांच्या चार लेखांच्या संग्रहाच्या प्रती *(निसर्गप्रधान भारत आणि त्यासाठी नवी अर्थनीती)* प्रयासने चर्चासत्राच्या वेळी वितरित केल्या होत्या. त्या प्रतींचा समावेश या दस्तावेजामध्ये नाही. जर या प्रती कोणाला हव्या असतील तर 'प्रयास' वा प्रा. प्रकाश गोळे यांच्याशी संपर्क करावा.)

# प्रस्तावना

प्रयास संस्थेमधील 'संसाधने व उपजीविका गट' ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची उपजीविका या क्षेत्रांमध्ये काम करीत आहे. या कामाचा एक भाग म्हणून विकासाच्या विविध धोरणांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर सध्या चालू असणाऱ्या चर्चेचा अभ्यास आम्ही करीत आहोत. आज एकीकडे जागतिकीकरणाची प्रक्रिया वेगाने पुढे नेली जात आहे. त्याचवेळी काही आंतरराष्ट्रीय संस्था जागतिकीकरणाची जोड चिरंजीवी उपजीविका (Sustainable Livelihoods) ह्या विषयाशी घालून त्या विषयावर मोठ्या प्रमाणात संशोधन करीत आहेत. ह्या संशोधनावर आधारित असणारे विकासप्रकल्प आता वेगवेगळ्या देशांतही राबवले जात आहेत.

भारताच्या स्तरावर पाहिल्यास आज लोकांच्या, विशेषत: वंचित समूहांच्या, उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनल्याचे दिसत आहे. अनेक ठिकाणी रूढ विकास धोरणांच्या अंमलबजावणीमुळे व जागतिकीकरणांतर्गत येणाऱ्या धोरणे व प्रकल्पांमुळे लोकांच्या उपजीविकेचे प्रश्न आणखीनच तीव' बनल्याचे आढळून येते आहे. ठिकठिकाणी लोक व त्यांच्या संघटना अशा विध्वंसक प्रकल्पांना विरोध करीत असतानाच विविध प्रकारच्या पर्यायांची मांडणी व प्रत्यक्षात उभारणी करताना दिसत आहेत.

'जनाचे अनुभव पुसतां' (मौजे प्रकाशन गृह, २००२) या डॉ. मिलिंद बोकील यांच्या नवीन पुस्तकात महाराष्ट्रात नैसर्गिक संसाधनांवरील हक्कांसाठी व त्यांच्या लोकप्रणीत उपयोगासाठी झालेले तृणमूल पातळीवरील काही प्रयत्न आणि संघर्ष यांचे चित्रण डॉ. बोकीलांनी केले आहे. पुस्तकात एकूण सात 'केस स्टडी' असून त्यानिमित्ताने विविध विकासविषयक प्रश्न डॉ. बोकीलांनी पुन्हा एकदा ऐरणीवर घेतले आहेत. या पुस्तकाला प्रा. स. ह. देशपांडे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. प्रस्तावनेमध्ये त्यांनी स्वत:ची विकासविषयक भूमिका स्पष्ट करतानाच मिलिंद बोकीलांच्या भूमिकेबद्दल काही प्रश्न उपस्थित केले आहेत. आम्ही सध्या करीत असलेल्या अभ्यासाच्या संदर्भात आम्हाला ह्या पुस्तकानिमित्ताने उपस्थित होणारी चर्चा खूप महत्त्वाची वाटली. याबाबत डॉ. मिलिंद बोकील व प्रा. स. ह. देशपांडे या दोघांशी बोलताना या पुस्तकाच्या निमित्ताने या विषयावर एक चर्चासत्र प्रयासतर्फे आयोजित करावे अशी सूचना पुढे आली.

हे चर्चासत्र रविवार दि. १५ डिसेंबर २००२ रोजी पुणे येथे घेण्यात आले. सदर चर्चासत्रातील चर्चेचा संक्षिप्त गोषवारा सर्वांना उपलब्ध व्हावा या उद्देशाने हा दस्तावेज तयार केला आहे. चर्चासत्राला विविध ज्ञानशाखातील प्राध्यापक, जनसंघटनांचे व राजकीय पक्षांचे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील कार्यकर्ते, विकासाच्या क्षेत्रात काम करण्याऱ्या काही संस्थांचे प्रमुख कार्यकर्ते, तळागाळात काम करणाऱ्या संघटनांचे ज्येष्ठ कार्यकर्ते, वरिष्ठ पत्रकार, प्रकाशक असे एकूण पन्नासजण हजर होते. चर्चासत्राच्या तयारीसाठी एकूण तीन टिपणे (प्रा. स.ह. देशपांडे यांच्या प्रस्तावनेतील काही भाग, डॉ. मिलिंद बोकीलांचे टिपण, व डॉ. सुबोध वागळे ह्यांचे टिपण) सर्व निमंत्रितांना पाठवण्यात आली. ही प्राथमिक टिपणे ह्या दस्तावेजामध्ये अंतर्भूत केली आहेत. ह्या प्राथमिक टिपणातील मुद्द्यांवर काही प्रतिक्रियात्मक टिपणे पाठवण्याची इच्छा झाल्यास ती जरुर पाठवावीत असे आवाहन निमंत्रितांना करण्यात आले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून अनेकांनी टिपणे पाठवली. ही सारी प्रतिक्रियात्मक टिपणेही सदर दस्तऐवजाद्वारे सर्वांना उपलब्ध करुन देत आहोत.

ह्या दस्तावेजामध्ये असणाऱ्या चर्चेच्या गोषवाऱ्यावरून असे दिसेल की चर्चेमध्ये विविध मुद्द्यांवर विविध परिप्रेक्ष्यांतून विचार मांडले गेले. मात्र ही चर्चा वेळेअभावी व विषयाच्या व्यापकतेमुळे अपुरी राहिल्याचे अनेक निमंत्रितांना जाणवले. दिवसभराच्या चर्चेनंतर पर्यायी विकासावरील चर्चेची ही प्रक्रिया यापुढेही चालू ठेवली जावी असा अनेक उपस्थितांनी आग्रह धरला व त्यासंबंधात अनेक उपयुक्त सूचनाही केल्या. ह्या सूचनांवरील एक छोटीशी टिपणी या दस्तावेजाच्या शेवटी दिली आहे. त्याचबरोबर चर्चासत्राला उपस्थितांची नावे, डाकपत्ते व इतर संपर्क–पत्त्यांची माहितीही सोबत दिली आहे. चर्चासत्राच्या शेवटी अनेकांनी सूचना केल्याप्रमाणे ही प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी प्रयासतर्फे काही योजनांची आखणी केली जात आहे.

चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी ज्यांनी हातभार लावला त्या साऱ्यांचे आम्ही आभारी आहोत. विशेषत: प्रा. स. ह. देशपांडे , डॉ मिलिंद बोकील, प्रा. एस. डी. कुलकर्णी, प्रा. रमेश पानसे, प्रा. शाम असोलेकर ह्यांच्या सहकार्याची मुद्दाम नोंद करावयास हवी. चर्चासत्राला उपस्थित राहिलेल्या व विशेषत: प्रतिक्रियात्मक टिपणे देणाऱ्या सर्व अभ्यासक, पत्रकार, कार्यकर्त्यांचे आम्ही विशेष आभारी आहोत. ह्या साऱ्यांच्या मन:पूर्वक प्रतिसादामुळे व मदतीमुळे ही प्रक्रिया पुढे नेण्यासाठी आम्हाला बळ मिळाले आहे.

**२६ जानेवारी २००३** **संसाधने व उपजीवीका गट, प्रयास**

# ‘जनाचे अनुभव पुसतां’ – प्रा. स. ह. देशपांडे यांच्या प्रस्तावनेतील विकास–प्रतिमान विषयक चर्चा असणारा भाग

(पुस्तकातील पान क्र. १५ ते २८)

या लेखांच्या अनुरोधाने जे विकासविषयक प्रश्न उपस्थित होतात त्यांपैकी काहींची येथे चर्चा करणे उपयुक्त होईल असे वाटते.

विकासविषयक प्रश्नांकडे बोकील मुख्यत: नैसर्गिक संपत्तीवर आधारित उपजीविकेच्या अंगाने पाहतात. असे पाहत असताना त्यांनी ‘शहरी–औद्योगिक’ या रूढ आणि प्रस्थापित विकासविषयक प्रतिमानाविषयी मधून मधून काही विधाने केलेली आहेत. या बाबतीत त्यांची भूमिका काहीशी अस्पष्ट राहिल्याचे मला जाणवते. त्यांनी आपली भूमिका एखाद्या स्वतंत्र लेखात मांडली असती तर ही अस्पष्टता कदाचित राहिली नसती. पण अशा स्पष्टतेच्या अभावी मला जे काय या विषयाबद्दल वाटते ते मी मांडण्याचा प्रयत्न करतो. बोकील आपली भूमिका माझ्या या भूमिकेशी ताडून पाहू शकतील. माझ्या विवेचनाचा रोख दर वेळी बोकीलांनी त्या संदर्भात जे म्हटले आहे त्याकडे नाही. एतद्विषयक वाङ्मयात ज्या प्रकारची मते सर्व साधारणपणे प्रकट होतात त्यांचा संदर्भ या विवेचनाला आहे.

विकासाची आपली नेमकी संकल्पना काय आहे ते प्रथम निश्चित केले पाहिजे. माणूस हा ‘प्राणी’ असला तरी इतर प्राण्यांपेक्षा काही निराळेपणा त्याच्यात आहे. त्याला बुद्धी आहे, भविष्याचे भान आहे, आकांक्षा आहेत,त्याच्या अंगी वेगवेगळ्या क्षमताही आहेत. तो ‘समाज’ करुन राहतो. जग समजावून घेण्याची क्षमता त्याच्यात असल्यामुळे तो विज्ञान जन्माला घालतो; सौंदर्याचा आस्वाद घेण्याची क्षमता त्याच्यात असल्यामुळे तो कलांची निर्मिती करतो. थोडक्यात तो संस्कृती निर्माण करू शकतो. या सर्वांमागे स्वत:चे जीवन अधिकाधिक सुखी करण्याची त्याची प्रेरणा कार्यरत झालेली असते. हे मानवत्व आहे. आपली विकासाची कल्पना अशा मानवत्वाशी सुसंगत असली पाहिजे.

सुखाचा शोध घेत असताना मानवाच्या लक्षात येते की निसर्गाकडून मिळणाऱ्या वस्तू जशाच्या तशा उपभोगण्यापेक्षा त्यांचे ‘रूप’ बदलून त्या जास्त उपयुक्त व सुखावह करणे आपणाला शक्य आहे, त्याच्यात तशी ‘क्षमता’–‘निर्मितीक्षमता’ ही आहे. म्हणजे ‘उद्योग’ आला. हा उद्योग प्राथमिक अवस्थेत हात वगैरे अवयवांनी केला जात होता. (म्हणून Manufacturing हा शब्द. 'Manufacture' या धातूचा मुळातला अर्थ ‘हातांनी करणे’ असा आहे.) पुढे यंत्रे आली आणि रूप देणे सुकर आणि अधिक वेगाने होऊ लागले. शिवाय करमणूक, ज्ञान इत्यादी ‘सेवा’ ही माणसाला लागतात. मात्र सेवा पुरविणारे उद्योगच असतात.

याचा अर्थ असा की मानवी विकासाच्या प्रक्रियेतच ‘उद्योग’ ही गोष्ट अंतर्भूत आहे.

शिवाय सुखाचा शोध अविरत चालू असतो, म्हणजे तो कधी थांबत नाही, हेही ध्यानात घेतले पाहिजे. ‘इतके झाले, आता पुरे’ असे बहुसंख्याक माणसांच्या बाबतीत घडत नाही. काही गरजा भागल्या की नव्या निर्माण होतात.

सुखाचा शोध चालू असताना असे लक्षात येते की काही गरजा मर्यादित असतात. उदाहरणार्थ, अन्न. त्याची गरज जीवशास्त्रानेच नियमित केलेली असते. अर्थात अधिक वैविध्य असलेले अन्न, अधिक चविष्ट किंवा पौष्टिक अन्न यांच्या गरजा वाढतील. पण त्यांनाही मर्यादा असते. हीच गोष्ट वस्त्र व निवारा यांबाबत थोड्याफार फरकाने खरी आहे. मात्र इतर वस्तू व सेवा यांची गरज अमर्याद असते.

याचा परिणाम असा होतो की सुखाच्या शोधात माणूस आपले ‘जीवनमान’ जसजसे वाढवीत जातो, म्हणजे वस्तू आणि सेवांचा उपभोग वाढवीत जातो तसतसे औद्योगिक वस्तू आणि सेवा यांचे त्याच्या एकूण उपभोगातले प्रमाण वाढत जाते.

याचा अर्थ असा की मानवी विकासात उद्योगांना अटळ स्थान आहे. एवढेच नव्हे तर ते स्थान वाढते राहते. मग औद्योगिक प्रतिमान नाकारणे याचा अर्थ विकास नाकारणे असा होतो.

विकासाची ही संकल्पना पूर्णपणे ऐहिक आहे. सर्वसामान्य माणसांना हा विकास अपेक्षित असतो या गृहीतावर ती आधारलेली आहे. म्हणून राज्यसंस्थेची धोरणे आखताना ह्या प्रकारच्या विकासाला अनुकूल अशा रीतीने ती आखली जावीत अशी अपेक्षा असते. अर्थात काही अपवादात्मक व्यक्तींना वेगळ्या प्रकारचा, त्यांच्या–त्यांच्या अर्थाने आध्यात्मिक, असा विकास साधायचा असेल तर तशा पध्दतीने जगण्याचे स्वातंत्र्य राहील.

मात्र ही ऐहिक विकासाची तृष्णा सरसकटपणे ‘चंगळ’ म्हणून तिरस्करणीय ठरू नये. सर्व ऐहिक गरजा या शारीर गरजाच असतात असे नव्हे, मनोबुद्धीच्या गरजाही त्यात येतात. शारीर गरजा अतिरिक्तपणे पुरविणे म्हणजे ‘चंगळ’ असे म्हणता येईल. तिचे वैयक्तिक दुष्परिणाम ती–ती व्यक्ती भोगील; सामाजिक दुष्परिणाम असतील तर ते कायद्याच्या कक्षेत येतील.

चंगळ सापेक्षही असू शकते ती विषमतेच्या संदर्भात. येथे केवळ शारीर गरजांचाच प्रश्न नसतो. शारीर सुखापलीकडची सुखेही काही थोड्यांनाच मिळत आहेत आणि इतर काहींना पुरेसे अन्नही मिळत नाही अशी स्थिती असेल तर काही प्रकारचे उपभोग ही चंगळ ठरेल. म्हणून विकासात समतेचा दृष्टिकोन अवश्य आहे. ही समता नेमकी कोणत्या मर्यादेपर्यंत असावी याचे सर्वच ठिकाणी लागू पडेल असे एकच उत्तर देता येत नाही. तेव्हा समतेचा विचार विकासावर एक मर्यादा घालतो असे म्हणता येईल.

दुसरी मर्यादा पर्यावरणरक्षणाची. आत्ताची लोकसंख्या आणि पुढच्या पिढ्या यांना आवश्यक तेवढा पर्यावरणाचा अंश शिल्लक राहिला पाहिजे. पण पर्यावरण एके पर्यावरण असा आग्रह उपयोगी नाही. याचा अधिक विचार पुढे येणार आहे.

विकासाबद्दल माझी धारणा ही आहे.

निर्माणक उद्योग मानवजातीच्या जन्मापासूनच आहेत. पण यंत्रांचा उपयोग त्यासाठी होऊ लागल्यापासून आधुनिक औद्योगिकीकरण सुरू झाले आणि या औद्योगिकीकरणाबरोबर आणखी एक घटना घडली–नागरीकरण किंवा शहरांची वाढ. म्हणून 'शहर–औद्योगिक' हा शब्दप्रयोग अस्तित्वात आला आणि विकासाच्या या प्रतिमानाला ते नाव ठेवले गेले. ह्या प्रतिमानावर टीका होत आहे.

शहरे म्हणजे माणसांची गर्दी, प्रदूषण, बकाल वस्त्या, गुन्हेगारी, हिंसाचार एवढेच नव्हे तर निर्व्यक्तीकरण, एकटेपणा, मानवी संबंधातील शुष्कपणा, स्वार्थी वृत्तीचा अतिरेक, मानसिक ताण, निसर्गापासून दुरावा अशी टीका त्यावर केली जाते. तिचा थोडक्यात परामर्श घेऊ.

नागरीकरणातले काही दोष अंगभूत समजले तरी दोष परिहार्य आहेत. ते अनियोजित विकासामुळे निर्माण झालेले आहेत.

पण हे परिहार्य दोष गेले तरी मोठ्या लोकसमूहांमुळे आणि 'व्यापारी' म्हटल्या जाणाऱ्या संस्कृतीमुळे नागरीकरण हे मुळातच अमंगल आहे अशी भूमिका काही जण घेऊ शकतील. ती आपण वादासाठी तूर्त मान्य करु.

मग प्रश्न असा उपस्थित होतो की हे शहरी प्रतिमान अस्तित्वात का आले? 'बिनशहरी पण औद्योगिक' असा पर्याय कां स्वीकारण्यात आला नाही ?

तर या प्रश्नाचे उत्तर सरळ आहे. ते असे की, तंत्रविद्या ज्या रीतीने विकसित झाली त्या रीतीने दुसरा पर्यायच उपलब्ध नव्हता. ही तंत्रविद्या 'केंद्रीकरण' करणारी होती. एका कारखान्यात हजारो कामगार, असे हजारो कारखाने, त्यामुळे निर्माण झालेले लक्षावधी किंवा क्वचित कोट्यवधी माणसांचे समूह– ह्या सर्व घटना उपलब्ध तंत्रविद्येने नियमित झालेल्या होत्या.

म्हणजे शहरी–औद्योगिक प्रतिमान हे अनेक पर्यायांमधून निवड करून स्वीकारले गेले असे नाही. कारण पर्यायच अस्तित्वात नव्हते. विकास हवा तर औद्योगिक वस्तू आणि सेवा हव्यात, त्या हव्यात तर उपलब्ध तंत्रविद्येतूनच त्या प्राप्त करून घेतल्या पाहिजेत आणि उपलब्ध तंत्रविद्या तर शहरी–औद्योगिक प्रतिमानाला जन्म देते–असा हा पेच होता.

आपणांला जर शहरी अमंगल नको असेल तर असे तंत्रज्ञान हवे की ज्यामुळे विकेंद्रित औद्योगिक रचना अस्तित्वात येईल. पर्यायी प्रतिमान त्याच वेळी शक्य होईल. तसा पर्याय उपलब्ध नसताना विद्यमान प्रतिमान झिडकारणे म्हणजे विकासालाच खीळ घालणे होय. मला असे वाटते की, विद्यमान प्रतिमानावर टीका करणारांनी असा काही पर्याय दाखवलेला नाही.

पूर्वी डॉ. राममनोहर लोहिया यांनी असे काही अल्प खर्चाचे, झोपडीत चालवण्यासारखे विकेंद्रीकरणाला पोषक तंत्रज्ञान असावे अशी कल्पना मांडली होती. याचा एक अर्थ असा की अर्थव्यवस्थेचे स्वरूप उपलब्ध तंत्रविद्येने नियमित होते याची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी प्रस्थापित शहरी–औद्योगिक प्रतिमान झिडकारले नाही. पण दुसरा अर्थ असा की डॉ. लोहियांचे हे एक स्वप्न होते. ते एका सदिच्छेचे प्रकटीकरण होते. तंत्रविद्येतली प्रगती कुठल्या दिशेने व्हावी याबद्दलचे मत फक्त ते मांडत होते.

असे मत मांडणे अर्थातच योग्य आहे. किंबहुना असे शोध कुणी लावत असेल तर त्याला उत्तेजन देणे आणि कुणी ते दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांची कारवाई उघडकीला आणून त्यांना शिक्षा करणे हेही योग्य आहे.

पण एक लक्षात घ्यावे. सर्वच शास्त्रीय शोध नियोजित नसतात. 'गरज ही शोधाची जननी असते' हे नेहमीच खरे नसते. अनेक शोध आपाततः लागत असतात आणि त्यांच्या उपयोगापुरते ते कार्यवाहीत आणले जातात. आर्थिक इतिहास पाहिला तर असे दिसून येते की वाफ, वीज, खनिज तेल, अणुशक्ती या ऊर्जांच्या लाटा आल्या आणि त्यांनी आजचे जग घडवले. या सर्वांचे शोध त्या त्या काळी विचारवंतांनी जे आदर्श समाजाचे चित्र रंगवले होते त्याच्या गरजेतून लागले नाहीत. माणूस हा बव्हंशी आपाततः उपलब्ध झालेल्या तंत्रज्ञानालाच शरण गेला आहे. तेव्हा प्रचलित प्रतिमानाला विरोध करणाऱ्यांनी पर्यायी समाजरचनेला उपयुक्त अशा वैज्ञानिक शोधांचा आग्रह धरणे एवढाच मार्ग शिल्लक उरतो. 'पर्यायी प्रतिमान उभे केले पाहिजे' असे ते मधून मधून म्हणतात तेच केवळ खरे आहे. तसे प्रतिमान अस्तित्वात नसताना विद्यमान प्रतिमान मोडीत काढणे म्हणजे विकासविमुख भूमिका घेणे होय.

आता संगणक आणि माहिती–तंत्रज्ञान यांमुळे आर्थिक रचनेचे एक नवे स्वरूप प्रत्यक्षात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. (पाहा : राजीव साने, युगांतर, राजहंस प्रकाशन, पुणे). त्यात विकेंद्रीकरणाचा पुष्कळ संभव दिसतो. पण हे तंत्रज्ञान पर्यायी विकेंद्रित प्रतिमान विकसित करण्याचा इच्छेतून निर्माण झालेले नाही. शिवाय असे की संगणकामुळे औद्योगिक प्रशासनात आणि व्यवस्थापनेत विकेंद्रीकरण आले तरी निर्माणक उद्योगात ते येईल अशी संभाव्यता आता तरी दिसत नाही.

बोकीलांच्या लेखनातून उपस्थित होणारा मुद्दा नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवण्याचा आणि ती अधिक उत्पादक करण्याच्या विषयीचा आहे. कोकणातील रासायनिक आणि इतर उद्योग निसर्गावर आक्रमण करुन तो दूषित करीत आहेत या तक्रारीच्या संदर्भात त्यांनी पुढील विधाने केली आहेत : 'खाडी ही जलसंपदा मासेनिर्मितीसाठी योग्य आहे आणि म्हणून तिथे मासेमारी केली पाहिजे.' पुढे ते म्हणतात मासेमारीला पर्याय नाही. हीच गोष्ट भात, वाल, काजू, आंबे, फणस, जांभूळ, साग, ऐन, हिरडा, बेहडा इत्यादी सर्व पदार्थांबाबत खरी आहे.'

खाडी मासेमारीला योग्य का? तेथे ती चालत आली आहे म्हणून? हा निकष विवेकी (रॅशनल) नाही हे उघड आहे.

या भूमिकेची तार्किक परिणती अशी असेल की ज्या ज्या ठिकाणी जे जे व्यवसाय चालू आहेत ते ते तसेच चालू राहावेत. यात विकासाची शक्यताच संपते.

प्रकल्पाच्या निवडीचा विवेकी निकष म्हणजे आर्थिक. पण आर्थिक म्हणजे नुसता पैशातला खर्च किती आणि त्यातून परतावा किती हा नाही, तर एकूण लाभ–हानीचा निकष. असा हिशेब करताना सर्व बरे–वाईट आर्थिक–सामाजिक परिणाम लक्षात घेतले जातात.

खाडी मच्छीमारीसाठी उपयुक्त आहे हे खरेच आहे; कारण तसे सिद्धच झाले आहे. पण दुसऱ्या एखाद्या व्यवसायासाठी ती अधिक उपयुक्त असण्याचीही शक्यता आहे. अट एवढीच की पर्यायी व्यवसाय तुलनात्मक लाभ–हानीच्या कसोटीला उतरतो असे दाखवून दिले पाहिजे.

कोकणात मासेमारी, भातशेती, काजू, फणस, आंबा इत्यादींच्या तुलनेने पोलाद किंवा रासायनिक उद्योगांनी राष्ट्रीय उत्पन्नात किती भर पडेल हे मला माहीत नाही. पण अशी शक्यता आहे की लाभहानीच्या निकषावर हे उद्योग तपासले तर ते उजवे ठरतील. मग धरमतरच्या खाडीत 'हाहाकार' का उडाला? बोकीलांच्याच ' भरती आणि ओहोटी' या लेखात परिस्थितीचे जे दर्शन घडते त्यावरुन पुढील निष्कर्ष काढता येतील :

(१) बोकीलांनी तपशिलात सांगितल्याप्रमाणे मुळात कोकण विकास कसा करायचा याबद्दल सरकारी धोरण धरसोडीचे आणि आत्मविसंगत आहे. (२) इस्पात इंडस्ट्रीज या कंपनीला कायद्याचे उल्लंघन करुन परवानगी देण्यात आली. (३) कंपनीने वेगवेगळ्या खात्यांकडून मिळविलेली ना–हरकत प्रमाणपत्रे संशयास्पद आहेत. (४) कंपनी नेमके कायकाय करणार आहे आणि त्याचे परिणाम काय होणार आहेत याची कल्पना कंपनीने वा शासनाने लोकांना दिली नाही. (५) नुकसान झालेल्यांच्या तोडांवर भरपाई फेकून त्यांना तात्पुरते शांत करणे आणि बेदरकारपणे सभोवती होणाऱ्या विध्वंसाकडे डोळेझाक करणे अशा रीतीने कंपनीची वागणूक आहे. उदाहरणार्थ वाटाघाटींसाठी शासनाने बोलावलेल्या सभेलाही कंपनीचे प्रतिनिधी हजर राहत नसत. (६) शासनाला हे सर्व चालते असे दिसते. (७) संघर्ष करणाऱ्यांपैकी काही जण फितले.

परिणामी लोक या संकटात बेसावध पकडले गेले. जाळी तुटली, बोटींच्या यंत्रांच्या घरघरीने लांबचे मासे खाडीत येईनासे झाले, स्थानिक माशांची निपज थांबली, संरक्षक बांध फुटून साडेतीनशे एकर जमीन निकामी झाली, मच्छीमारांखेरीज इतर साडेतीनशे कुटुंबांना हा बांध फुटण्याचा तडाखा बसला.

याचा अर्थ असा की ही सर्व वाताहत सरकारची अनास्था, कंपनीचा बेमुर्वतखोरपणा व जनतेतलेच काही स्वार्थी लोक यांमुळे झाली. बोकील म्हणतात त्याप्रमाणे हे अर्थशास्त्र नव्हते तर 'राजकीय अर्थशास्त्र' होते. म्हणजे हे परिणाम 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानामुळे घडून आले असे नाही तर ते प्रतिमान ज्या रीतीने राबवण्यात आले त्या रीतीमुळे घडून आले. यातून धडा असा घ्यायचा की प्रतिमानाचे जे रूप प्रस्तुत आहे ते व्यापक आर्थिक–सामाजिक निकषांवर तपासावे किंवा तपासण्याचा आग्रह धरावा, त्या परीक्षेला ते उतरले तर त्याचे स्वागत करावे आणि ते न्याय्य आणि कायदेशीर रीतीने, योग्य त्या नियमनांसह आणि पारदर्शीपणाने कार्यवाहीत येईल याबद्दल जागरूक रहावे. इस्पात इंडस्ट्रीजविरुद्ध खाडीतल्यांनी जो संघर्ष केला त्यात आमचे पुन:स्थापन करा या मागणीपर्यंत ते आले आहेत. पोलाद–उद्योगच नको कारण आम्हांला मासेमारी आणि भातशेती अविच्छिन्नपणे करता यायलाच हवी अशी आता तरी त्यांची मागणी नाही. ही भूमिका शहाणपणाची आहे. तीच मागणी अभयारण्यामुळे पीडित झालेल्यांची आहे ('प्राण्यांना अभय, माणसांना वनवास'). आताच्या प्रतिमानाच्या मर्यादेत कमीजास्त प्रमाणात कुणाचे तरी विस्थापन होणे अपरिहार्य दिसते. त्यांचे पुन:स्थापन नीट होईल असे पाहणे हाच मग मुख्य कार्यक्रम उरतो. अर्थात 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाचा जो अंश प्रस्तुत आहे तो आर्थिक – सामाजिक निकषांवर उतरतो असे येथे गृहीत केलेले आहे. तशी परिस्थिती नसेल तर त्यावर आक्षेप घेणे अर्थातच योग्य आहे.

'कल्पवृक्ष' या लेखात विकासाच्या 'भूमि–आधारित' प्रतिमानाने कशी समृद्धी निर्माण झाली आहे याचे वर्णन आहे. या प्रतिमानाच्या सार्वत्रिकतेविषयी थोडी चर्चा केली पाहिजे. म्हणजेच केवळ शेतीवर आधारलेला विकास शक्य आहे का या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. मागे सांगितल्याप्रमाणे विकासाच्या व्याख्येतच औद्योगिकीकरण सामावलेले आहे. म्हणजेच औद्योगिक वस्तू (आणि सेवा) विकासप्रक्रियेत अपरिहार्य बनतात. पण प्रत्येक देशाबद्दल हे खरे असेल असे नाही. शेती–उत्पादन निर्यात करुन औद्योगिक वस्तू इतर देशांकडून घेता येतील. स्कँडिनेव्हीयन देशांसारखे काही देश काही प्रमाणात असे करतातही. पण असे करण्याचा निर्णय करण्यापूर्वी आपला देश आर्थिक निकषांवर केवळ शेती–उत्पादनालाच योग्य आहे हे सिद्ध झाले पाहिजे.हे सिद्ध करणे कठीण आहे. केवळ शेतमाल विकणारे देश गरीबच राहण्याची शक्यता अधिक असते हे न्यायमूर्ती रानड्यांपासून अनेक जणांनी ओळखले होते. (यामागच्या आर्थिक कारणांच्या गुंतागुंतीत मी येथे शिरत नाही.) शिवाय कच्चा शेतमाल निर्यात करण्यापेक्षा प्रक्रिया केलेला (Processed) शेतमाल निर्यात करणे अधिक फायद्याचे असते. आणि प्रक्रिया आली की थोडेफार औद्योगिकीकरण आलेच. जे देश तथाकथित 'भूमि–आधारित' उत्पादन करतात तेही संकुचित अर्थाच्या 'शेती'बाहेर जाऊन दूध आणि दुग्धपदार्थ, मांस आणि मांसपदार्थ यांवर अधिक भर देतात आणि त्यात प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर अंतर्भूत असते हे लक्षात घेतले पाहिजे. शिवाय असे की देशाच्या जीवनाला केवळ आर्थिक बाजू नसते. त्याला संरक्षण सेना सुसज्ज ठेवाव्या लागतात आणि संरक्षक–सामग्री देशातच निर्माण होणे बरे असते. भूमि–आधारित विकासातून हे साध्य होणार नाही. विकासाचेही काही अंतर्गत गतिक असते आणि त्यात सर्वांगांनी होणारा 'संतुलित'– एकांगी नव्हे–असा विकास अभिप्रेत असतो हाही एक मुद्दा.

मराठवाड्यातले दलित आणि अनेक ठिकाणचे आदिवासी गावच्या सामायिक जमिनीवर किंवा जंगलखात्याच्या जमिनीवर अतिक्रमणे करून लहान लहान तुकडे मिळवीत आहेत. ही अतिक्रमणे शासन असहायपणे पुन:पुन्हा वैध करीत आहे. याचा समग्र इतिहासही बोकीलांनी 'लढाई जमिनीसाठी' या लेखात दिला आहे. लातूरच्या भूकंपग्रस्त विधवा जमिनीच्या लहान तुकड्यांशी झोंबी घेत आहेत. पण या दोन्ही घटनांतून असे निष्पन्न होते की यातून ही माणसे दारिद्र्याच्या शापातून मुक्त होत नाहीत. वर्षभर पुरेल इतके उत्पन्न त्यांना मिळत नाही. त्यांना शेतीशिवाय मजुरी, जोडधंदे असे काही करावे लागतेच. हे सगळे करूनही ती दारिद्र्यरेषेच्या वर येतात असे म्हणता येत नाही. डिचोलीच्या गवळी धनगरांना वेगळ्या स्वरूपात तोच प्रश्न भेडसावत आहे. माधव गाडगीळ व कैलाशचंद्र मल्होत्रा यांचा हवाला देऊन बोकील सांगतात,'एका कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी किमान ११ म्हशी किंवा ३२ गाईंची जरूर भासेल...दमट पानझडीच्या जंगलात २० म्हशींच्या कळपाला साधारण एक चौरस किलोमीटर चराऊ जमीन लागते.' म्हणजे एका कुटुंबाला सुमारे २५ एकर. पण ही जमीन कमी होत आहे आणि गवळी–धनगरांना शेती करावी लागत आहे. कामधंदा पाहण्यासाठी त्यांची मुले मुंबईला जात आहेत. बोर्डीच्या आसपासचा वारली शेतकरीच फक्त आपल्या लहान शेतातून चिक्कूच्या झाडाच्या 'कल्पवृक्षा'मुळे समृद्धीकडे वाटचाल करीत आहे पण त्याच्या मुला–नातवंडांचे पुढे काय होईल याची चिंता आहेच. कारण चिक्कूच्या झाडाला पाणी लागते आणि त्याची आज जरी टंचाई नसली तरी आणखी कूपनलिका झाल्यावर भूमिगत पाण्याची पातळी खाली जाईल अशी भीती आहे. डहाणू तालुक्यातच कोसबाडच्या परिसरात काढलेल्या विहिरींवर ती आपत्ती अगोदरच आलेली आहे.

यातून भारतीय शेतीचा, विशेषत: लहान आणि सीमान्त (Small and marginal) शेतीचा प्रश्न डोळ्यांपुढे उभा राहतो. या लहान शेतांची संख्या अप्रतिहतपणे वाढते आहे आणि त्यांच्या खाली असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळही वाढते आहे. उलटया बाजूने मोठ्या शेतांखाली असणाऱ्या जमिनीचे प्रमाण कमी होत आहे. परिणामी कसणुकीच्या धारणाचे सरासरी क्षेत्र आक्रसते आहे. लहान शेती शेतकऱ्याचे पोट भागवू शकत नाही आणि म्हणून त्याच्या दारिद्र्यावर त्याला एक लहान तुकडा काढून देणे हा उपाय नाही. शिवाय जंगल–जमीन, सामायिक जमीन कमी होणे हे अर्थव्यवस्थेला घातक होते हेही लक्षात घेतले पाहिजे.

तंत्रसुधारणेमुळे उपजीविकेला पुरेशा धारणाची क्षेत्र–मर्यादा खाली येईल–जशी हरित क्रांतीच्या काळी आली. म्हणजे काहीसे लहान धारण चालेल. चिक्कूचे झाड हेही एक तंत्रच आहे आणि त्यामुळेही लहान धारणे अधिक उपजाऊ झाली आहेत. पण एक किंवा दोन गुंठे जमिनीला हा कल्पवृक्षही पोटभर देणार नाही हे स्पष्ट आहे. म्हणजेच कितीही तंत्रसुधारणा झाली तरी लहान शेतांचा प्रश्न कायमच राहणार.

या समस्येवर दोन उपाय आहेत : एक, शेतीवरचा माणसांचा भार कमी करणे आणि दोन, तंत्रसुधारणा करीत जमिनीची उत्पादकता वाढवणे. शेतीवरचा लोकसंख्येचा भार कमी करायचा तर माणसांना कसणुकीखेरीज इतर कामे दिली पाहिजेत. संघटित उद्योगांची प्रगती मंद असल्यामुळे आणि तेथल्या तंत्रसुधारणेमुळे कामगारांना रोजगारात सामावून घेण्याची त्यांची क्षमता कमी होत आहे. कुटिरोद्योगांना, काही अपवाद वजा जाता, भवितव्य नाही. शिवाय कुटिरोद्योगांसाठी अवश्य असणारी व्यवस्थापकीय कौशल्ये आणि धंद्यातला धोका घेण्याची क्षमता बव्हंशी अशिक्षित आणि गरीब असलेल्या माणसांकडे असत नाही.

या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी बेकारांना रोजगार आणि त्या रोजगारातून शेतीच्या उत्पादकतेत भर पाडणारी तंत्रसुधारणा या दोन्हींचा संयोग करणारी योजना म्हणजे महाराष्ट्राची रोजगार हमी योजना. सरकारने पुरेशा वेतनावर रोजगाराची हमी (Guarantee) दिली म्हणजे लहान शेतकरी किंवा शेतमजूर ह्यांचे दारिद्र्य तात्काळ संपेल, ते शेतीतून कायमचा पाय बाहेर काढतील, धारणांची क्षेत्रे वाढतील, मजुरांकरवी पाणीपुरवठा, मृद्संधारण, बांधबंदिस्त, वनीकरण, रस्ते इत्यादी भांडवली स्वरुपाची कामे करुन घेऊन शेती अधिक उत्पादक होईल–असे या योजनेचे समग्र तत्वज्ञान प्रा. वि. म. दांडेकर आणि नीलकंठ रथ यांनी आपल्या Poverty in India या पुस्तकात मांडले. महाराष्ट्रात १९७२–७३ साली सुरू झालेली ही योजना दांडेकर–रथ यांनी सुचविलेल्या सैद्धांतिक आराखड्याबरहुकुम चालली नाही हे खरे. पण तिच्यात अनेक दोष असूनही तिच्यामुळे गेल्या सुमारे तीस वर्षांत जो रोजगार निर्माण झाला व भांडवल गुंतवणूक झाली त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातला दारिद्र्याचा प्रश्न बराच सुसह्य झाला आहे असे अनेक निरीक्षकांचे मत आहे.

बोकीलांनीही 'लढाई जमिनीसाठी' आणि 'भूमिकन्यांचे भालप्रदेश' या दोन लेखांत रोजगार हमीचा उल्लेख केला आहे. राजस्थानच्या अवर्षणावर त्यांनी जो इंग्रजी लेख लिहिलेला आहे ("Drought in Rajasthan: In Search of a perspective", Economic and Political Weekly, November 25, 2000) त्यात त्यांनी इतर रोजगार योजनांची कमतरता दाखवून देऊन हमीयुक्त रोजगाराची आवश्यकता प्रतिपादित केली आहे.

दुर्दैवाने अलीकडच्या आर्थिक धोरणात दारिद्र्यनिवारणाच्या या प्रभावी उपायाकडे दुर्लक्ष होत आहे. बोकीलांनी लहान शेतीच्या संदर्भात जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांचा विचार करता रो. ह. यो. च्या परिणामकारकतेकडे अर्थशास्त्रज्ञांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी व स्वयंस्फूर्त संस्थांनी अधिक लक्ष दिले पाहिजे असे मला वाटते.

तंत्रसुधारणेबद्दल बोलायचे तर जुनीच पण विशिष्ट क्षेत्रात अजून न पोचल्यामुळे तेथे नवी अशी तंत्रे म्हणजे मुख्यत: पाणीपुरवठा, मृद्संधारण इ. ज्यांचा वर उल्लेख केला ती होत. याशिवाय 'नैसर्गिक शेती', 'सेंद्रीय शेती' अशा नावाखाली काही लक्षणीय प्रयोग काही ठिकाणी होत आहेत त्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून ती वापरात आणली पाहिजेत.

बोकीलांनी हे लक्षात आणून दिले आहे की भूकंपग्रस्त विधवांना जमिनी मिळाल्या पण त्या जमिनी जास्त उपजाऊ होतील

यासाठी शासनाने काही केले नाही. दलितांच्या अतिक्रमित जमिनींची तीच स्थिती आहे, दलित पुढाऱ्यांनी अतिक्रमणांना पाठिंबा दिला आणि ती वैध व्हावीत म्हणून आग्रह धरला; पण एकदा जमिनी ताब्यात आल्यावर त्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी जे काम करणे अवश्य आहे ते त्यांनी केले नाही अशी बोकीलांची तक्रार आहे.

बोकीलांच्या या लेखातून स्वयंस्फूर्त संस्था किंवा कार्यकर्ते यांच्या कार्याला क्वचित ओझरता तर क्वचित विस्ताराने स्पर्श झाला आहे. भूकंपग्रस्त विधवांचे प्रश्न हातात घेतले ते 'स्त्री आधार केंद्र' या संस्थेने. डिचोली भागातल्या धनगरांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम बाळ कोळेकर या त्यांच्यातल्याच एका सुशिक्षित तरुणाने केले. बोर्डी भागातले परिवर्तन घडवून आणले ते जयंतराव पाटील आणि त्यांची 'कृषि–उद्योग व आदिवासी कल्याण प्रतिष्ठान' यांनी. धरमतर खाडीतल्या मच्छीमारांच्या आंदोलनाचे नेतृत्व स्थानिक लोकांमधलेच एक अरुण शिवकर यांनी केले. 'उदक चालवावें युक्ती' या लेखात सोशल सेंटर ह्या संस्थेच्या कामाचा उल्लेख आहे. मराठवाड्यातील अतिक्रमणांच्या संदर्भात 'सर्वांगीण विकास संस्था' ह्या दलित तरुणांच्या संस्थेने केलेल्या कार्याचा संदर्भ आहे.

*(या नंतरचे स्वयंस्फूर्त कार्य व ते करणाऱ्या संस्थांबद्दलचे काही परिच्छेद गाळले आहेत.)*

बोकीलांच्या लेखनाच्या निमित्ताने ही चर्चा केली. काही वादविषय झालेले मुद्दे बाजूला ठेवले तरी एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे. ती म्हणजे हे पुस्तक दोन कारणांसाठी महत्वाचे आहे. एक : विकासाच्या प्रक्रियेमधले, पर्यावरणाशी निगडीत असलेले आणि बव्हंशी वंचित समूहाचे अनेक प्रश्न त्यांनी अभ्यासपूर्वक पुढे मांडलेले आहेत. त्यांचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. मी जरी मुक्त अर्थव्यवस्थेचा आणि आताच्या अवस्थेत अटळ असलेल्या औद्योगिक प्रतिमानाचा पुरस्कर्ता असलो तरी ते सावधपणे, पर्यावरणाला आणि मानवी जीविताला कमीतकमी धक्का लागेल अशा रीतीने अमलात आणावे अशा मताचा आहे. आर्थिक उदारीकरणाच्या नव्या लाटेत, ती जणू काही एक जादू आहे, सर्वांच्या समृद्धीची गुरुकिल्ली आहे असे समजण्याचे एक वारे वाहते आहे आणि माणसे गरिबी, बेरोजगारी, अन्याय यांबद्दल संवेदनाहीन होत आहेत की काय असे वाटू लागले आहे. अशा परिस्थितीत या प्रक्रियेच्या दुसऱ्या बाजूकडे वाचकांचे लक्ष वळविण्याचा बोकीलांचा प्रयत्न मोलाचा आहे.

दोन : बोकीलांचे हे पुस्तक आणखी एका दृष्टीने उपयुक्त आहे, त्या संदर्भात 'भरती आणि ओहोटी' हा लेख अतिशय महत्त्वाचा आहे. मोठ्या औद्योगिक कंपन्या, त्यांच्याशी हातमिळवणी करणारे भ्रष्ट राजकारणी हे एका बाजूला आणि दुसरीकडे बव्हंशी अशिक्षित, असंघटित, उपेक्षित, अल्पसंख्याक लोक यांच्या संघर्षाचा वृत्तान्त त्यात विस्ताराने देण्यात आला आहे. हाही संघर्ष होतो याचे कारण शिवकरांसारखा ध्येयनिष्ठ आणि लढाऊ नेता त्यांना मिळाला आहे. वंचितांना अनेकदा असे नेतृत्वही उपलब्ध नसते हेही लक्षात घ्यावे. अशांवरच्या अन्यायाची तर दादही लागत नाही.

हेही विकासप्रक्रियेतील एक आव्हान आहे. आर्थिक दृष्ट्या सबळ असलेले मोठे किंवा बहुराष्ट्रीय उद्योग किती मुजोरीने वागू शकतात याचे इस्पात इंडस्ट्रीज हे एक उदाहरण आहे असे बोकीलांच्या लिखाणावरून स्पष्ट होते. अशा उद्योगांशिवाय आपणांला पर्याय नाही हे जसे खरे आहे तसेच अशा उद्योगांशी आणि राजकारण्यांशी करावयाच्या संघर्षालाही पर्याय नाही हेही खरे आहे. विकासप्रक्रियेचे हे वास्तव आहे, हा धडाही मोलाचा आहे. तो पुढे मांडण्याचा बोकीलांचा प्रयत्न विशेष स्वागतार्ह आहे.

बोकीलांचे लेख भावनेच्या आहारी न जाता, मूल्यभारित (value-loaded) शब्द न वापरता, भावनोद्दीपन न करता, वस्तुनिष्ठ संशोधनाच्या शिस्तीने लिहिलेले आहेत. बोकील जी तथ्ये (Facts) सांगतात तीच पुरेशी बोलकी आहेत आणि मनावर चिरस्थायी परिणाम करणारी आहेत. आणखी एक गोष्ट म्हणजे या लेखनाला पूर्वी म्हटल्याप्रमाणे कथाकथनाची डूब मिळाली आहे. अशा विरळा गुणांचे संमीलन या पुस्तकात झालेले वाचकांना आढळेल. ते त्याचे उत्साहाने स्वागत करतील अशी मला खात्री आहे.

**स. ह. देशपांडे**

# जनाचे अनुभव पुसतां– चर्चेसाठी टिपण

(डॉ. मिलिंद बोकील)

'जनाचे अनुभव पुसतां' हे पुस्तक खरे तर 'विकास' विषयक भूमिका मांडण्यासाठी लिहिलेले नाही. ज्याला 'विकासा'चे ('डेव्हलपमेंट'चे) प्रश्न म्हणतात त्यांना सध्या एक विशिष्ट अर्थ आहे. विकासविषयक भूमिकेला तर निश्चितच आहे. त्यामध्ये विकास कशाला म्हणायचे, तो साधायची पद्धत कोणती? विकासाची कोणती प्रतिमाने आदर्श आहेत? कोणती व्यावहारिक? इत्यादी प्रश्न उपस्थित होतात. ह्या प्रश्नांची चर्चा करावी असे मुळात ठरवलेले नव्हते. शीर्षकावरून समजते त्याप्रमाणे लोक, त्यांचे जगण्याचे अनुभव आणि ते समजावून घेण्याची पद्धत (समाजशास्त्र) हे या पुस्तकाचे सूत्र आहे. हे समजावून घेताना विचारांचा जो कल्लोळ मनामध्ये उठला तो वाचकांपुढे मांडला आहे.

असे असले तरी लोकांचे जगण्याचे अनुभव हे अविभाज्यपणे विकासाच्या प्रक्रियेशी जोडले गेलेले आहेत. त्यामुळे विकासविषयक प्रश्न साहजिकच समोर येतात. त्यांची चर्चा करण्याची जबाबदारी मी टाळू इच्छीत नाही. किंबहुना पुस्तकातल्या प्रत्येक लेखात या ना त्या स्वरूपात ती आलेली आहे. मात्र ते करण्यामागची भूमिका ही समाजशास्त्राच्या अभ्यासकाची आहे. लोकांचे जगणे समजून घ्यावे, त्यांना विचारतच त्याचा अर्थ लावावा आणि त्यातून जर काही समजलेच तर आपल्या शास्त्राच्या आधाराने ते सूत्ररूपात मांडावे अशी ही भूमिका आहे. कुठलाही अभ्यासक हा मुळात एक सामाजिक व्यक्ती असतो त्यामुळे वस्तुनिष्ठ अभ्यास करायचा ठरवला तरी काही प्रमाणात मूल्यात्मक धारणा त्यामध्ये येतेच. मात्र आपली मूल्यात्मक चौकट आधी निश्चित करून मग तिच्या आधाराने लोकजीवनाचा किंवा त्यातील विकासप्रक्रियेचा अन्वयार्थ लावण्याचा खटाटोप मी केलेला नाही. तसे करणे मला अशास्त्रीय तर वाटतेच शिवाय अमानवीही. ह्या कारणांमुळेच ती काहीशी संदिग्ध असणेही संभवते. पण ही संदिग्धता संपूर्ण सत्य सापडल्याचा अभिनिवेश नसणाऱ्या शोधक वृत्तीची संदिग्धता आहे.

हे पुस्तक लोकांच्या जगण्याची म्हणजे उपजीविकेची प्रक्रिया समजून घेणारे असल्याने त्यातली उदाहरणे ही अर्थातच निरनिराळ्या मानवसमूहांची आहेत. शेतीसाठी नदीवर लिफ्ट करून ते पाणी सहकारी पद्धतीने वाटून घेणारे संगमनेर तालुक्यातील शेतकरी, मुळात धरणग्रस्त आणि नंतर अभयारण्याचे संकट ओढवलेले कोयना खोऱ्यातील पशुपालक, गायरानांच्या मालकीसाठी झगडणारे मराठवाड्यातील दलित, चिकूच्या बागा पिकवणारे ठाणे जिल्ह्यातले आदिवासी, भूकंपात विधवा होऊनही आपली शेती नेटाने करणाऱ्या लातूर–उस्मानाबाद मधल्या स्त्रिया आणि औद्योगिकीकरणाच्या आव्हानासमोर ठाकलेले धरमतर खाडीतले मच्छीमार असे हे निरनिराळे लोक आहेत. मात्र ह्या उदाहरणांमध्ये एक समान सूत्र आहे. हे मूलतः ग्रामीण समूह आहेत. त्यांच्या उपजीविकेची पद्धत ही भोवतालच्या जमीन, पाणी, जंगल, डोंगर, नद्या, समुद्र इत्यादी नैसर्गिक साधनसंपत्तीची जोडली गेली आहे. या पद्धतीत जे बदल त्यांनी केले आहेत किंवा जे होऊ घातले आहेत त्यामुळे त्यांच्या जगण्यावर परिणाम होतो आहे. हा परिणाम विविधांगी, विविध पातळ्यांवरचा तर आहेच पण दीर्घ मूलगामी स्वरूपाचाही आहे. ह्या बहुआयामी परिणामामुळेच विकासविषयक प्रश्न उद्भवतात.

प्रा. स. ह. देशपांडे यांनी आपल्या प्रस्तावनेत या प्रश्नांची चिकित्सा केली आहे. तसे करण्यामागची त्यांची एक भूमिका आहे जी त्यांनी निःसंदिग्धपणे मांडलेली आहे. त्यांच्या साक्षेपी आणि चिकित्सक विश्लेषणामुळे या सर्व चर्चेला एक महत्त्वाचे परिप्रेक्ष्य मिळाले आहे यात काही शंका नाही. आपल्या प्रस्तावनेत त्यांनी माझ्या लिखाणातून ध्वनित होणाऱ्या आणि एरवीही चर्चिल्या जाणाऱ्या विकासविषयक भूमिकांविषयी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यावर आपली मते मांडली आहेत. काही ठिकाणी विरुद्ध वाटणाऱ्या मताचा प्रतिवाद केला आहे. माझे लेख प्रकाशित झाल्यावर ही प्रस्तावना लिहिली गेली असल्याने त्यांच्या मतावर मला काय म्हणावयाचे ते मांडण्याचेही त्यांनी आवाहन केले आहे. त्यांच्या या उदार, आत्मीय आणि समाजहितकारी आवाहनामुळे आणि ही चर्चा पुढे जाण्यास मदत व्हावी या हेतूने मी हे टिपण सादर करीत आहे.

देशपांडे प्रस्तावनेच्या पहिल्या भागात म्हणतात त्या प्रमाणे, मानवी जीवनात उद्योग अनिवार्य आहे त्यामुळे इतिहासाच्या एका टप्प्यावर औद्योगिक प्रतिमान, आणि त्यावर आधारित समाजव्यवस्था अस्तित्वात येणे साहजिक आहे. या विषयी काहीच दुमत नाही. औद्योगिक प्रतिमानात लघु, मध्यम, अवजड, घरगुती आणि कारखान्यातले असे निरनिराळ्या प्रकारचे उद्योग अस्तित्वात येणार हे उघड आहे. तसेच लोखंड, पेट्रोल, प्लॅस्टिक, सिमेंट, लाकूड अशा प्रकारच्या नैसर्गिक व मानव निर्मित द्रव्यांचा उद्भव आणि वापर होणार हे ही उघड आहे. उद्योगांच्या ऐतिहासिक अटळतेबद्दल आणि त्यांच्या समाजोपयोगी योगदानाबद्दल प्रश्न नाही. प्रश्न आहे तो औद्योगिक प्रतिमानामार्फत प्राकृतिक संपदेचे दोहन, शोषण, प्रदूषण आणि उद्ध्वस्तीकरण होण्याच्या प्रक्रियेबद्दल. उद्योगांशी नफा जोडला गेला आहे आणि नफ्यासोबत स्वार्थ. स्वार्थासोबत जोडली गेली आहे ती दुसऱ्याच्या हिताबद्दलची बेफिकिरी. ह्या प्रक्रियेत पहिला बळी जातो तो निसर्गाचा, नंतर दुर्बल माणसांचा, त्यानंतर दुर्बल राष्ट्रांचा आणि शेवटी जागतिक शांती व समाधानाचा. यातला कोणताच घटक दुर्बल राहणे योग्य नाही. जागतिक शांतीचा विचार जरी दूरचा म्हणून बाजूला ठेवला तरी ज्यांना आपले राष्ट्र सबल व्हावे असे वाटते त्यांना आपल्या

राष्ट्रातील प्राकृतिक संपदेचे रक्षण व संवर्धन करण्यावाचून गत्यंतर नाही. उद्योग – मग ते घरेलू असोत वा कारखानदारी – जर हे करण्यात बाधा आणत असतील आणि त्यांच्या योगाने जर मानवाच्या जगण्यासाठी मूलभूत असणारी नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होणार असेल तर त्यांच्या स्वरूपाविषयी पुनर्विचार हा सुरू केलाच पाहिजे. मानवी समाजातील कोणताही उद्योग मग तो छिलके काढून दगडाची हत्यारे बनवण्याचा असो, हातमागावर वस्त्र विणण्याचा असो वा डिटर्जंट बनवण्याचा, तो मानवी अस्तित्वाचे भरण, पोषण आणि संवर्धन करतो की नाही हाच मुख्य मुद्दा आहे.

देशपांड्यांच्या प्रतिपादनातला दुसरा मुद्दा शहरीकरणाविषयीचा आहे. सध्याचे औद्योगिक प्रतिमान हे शहरी प्रतिमान आहे. त्यामुळे औद्योगिक प्रतिमानाला आक्षेप असणाऱ्यांचा शहरी व्यवस्थेलाही आक्षेप असणार असे गृहीत धरले जाते. औद्योगिक प्रतिमानाला आक्षेप नसून त्या प्रतिमानाच्या परिणामाविषयी काळजी आहे हे एकदा स्पष्ट केल्यानंतर शहरी व्यवस्थेला आक्षेप नाही हे वेगळे सांगण्याची खरे तर आवश्यकता नाही. मुळात खेडे की शहर असा प्रश्नच नाही. मानवी अस्तित्त्वाला सुखकारक स्वास्थ्यपूर्ण आणि सुरक्षित असे वसतिस्थान (Habitat) असायला हवे. हे स्वास्थ्य व समाधान ज्या व्यवस्थेत मिळेल ती व्यवस्था आदर्श होईल. ते महानगरांत मिळते असे दिसून आले तर महानगरांत राहावे, खेड्यांत मिळाले तर खेड्यांत राहावे. ह्या दोहोंतही न मिळता लहान वा मध्यम आकाराच्या शहरांतच ते मिळते असे अनुभवाला आले तर तशी नगरे वसवण्याच्या ध्येयाला लागावे. आपापला धंदा–व्यवसाय संपन्नतेने करता यावा, माणसामाणसांतील जवळीक कायम राहावी, सांस्कृतिक अंगांचे संवर्धन व्हावे आणि मुख्य म्हणजे माणसांना (सर्व माणसांना) जगताना मझा आणि आनंद यावा अशी माणसाची वस्ती असावी एवढीच अपेक्षा आहे.

ह्याला जोडून असणारा मुद्दा नैसर्गिक साधनसंपत्ती संदर्भात आहे. नैसर्गिक संपदा, विशेषतः तिच्यामधली जैविक विविधता ही मला पृथ्वीवरची सर्वांत सुंदर गोष्ट वाटते. मला जर तऱ्हेतऱ्हेचे आंबे खायला मिळाले, जेवून उठल्यावरही ज्याचा वास जाता जात नाही असा तऱ्हेतऱ्हेच्या वासाचा तांदूळ खायला मिळाला, वेगवेगळ्या चवीचे मासे सेवायला मिळाले तर माझे ऐहिक आयुष्य समृद्ध आणि संपन्न आहे असे मला वाटले. यात चंगळवाद आहे असे मला वाटत नाही. रोगमुक्त जीवनासाठी आवश्यक असणारी औषधे या जैविक विविधतेतून येतात एवढेच नाही तर भारतासारख्या देशात निरनिराळ्या लोकांच्या संस्कृतींमध्ये असणारी विविधताही मुळात प्राकृतिक विविधतेतून आलेली आहे. ही विविधता नष्ट होणे म्हणजे जीवन भकास होणे आहे. समृद्धी हे विविधतेचे दुसरे नाव आहे असे मला वाटते. जीवन आणि संस्कृतीमधील विविधतेची वाढ व्हायची असेल तर प्राकृतिक विविधतेला संवर्धन करण्यावाचून गत्यंतर नाही. या प्रक्रियेत प्राकृतिक वस्तू वा पदार्थांना स्वतःचे असे एक मूल्य प्राप्त होणे साहजिकच आहे. किंबहुना तसे ते प्राप्त व्हायला हवेच म्हणजे त्यांचे संवर्धन किफायतशीर आणि व्यावहारिक होईल. खाडी किंवा नदीमध्ये मासेमारी कां चालली पाहिजे? ती तिथे परंपरेने चालत आली आहे म्हणून नव्हे तर ती दुसरीकडे कुठेच करता येत नाही म्हणून. मालाची वाहतूक दुसऱ्या रस्त्याने वा मार्गाने करता येते पण माशांची पैदास माळरानावर बी पेरून करता येत नाही.

मानवी जीवनाला, विशेषतः आंधळेपणाने वाढवलेल्या बेसुमार लोकसंख्येला, आवश्यक असा विकास फक्त नैसर्गिक साधनसंपदेच्या जोरावर करता येणार नाही हे बरोबर आहे. सिमेंट काँक्रिटच्या गगनचुंबी इमारती, वेगवान हमरस्ते, विमानतळ, लोहमार्ग, शेतीसाठी आवश्यक रासायनिक खतांचे कारखाने, मोटारी इत्यादी गोष्टी शेती किंवा पशुपालनातून मिळू शकणार नाहीत हे खरे आहे. आणि विमानवाहू नौका, फायटर विमाने, चिलखती वाहने, आंतरखंडीय क्षेपणास्त्रे आणि अणुबॉम्ब हे काही माती, पाणी, झाडे, शेण यांच्यापासून बनवता येणार नाही ही तर वस्तुस्थितीच आहे. मुद्दा एवढाच आहे की ज्या देशात औद्योगिक क्रांती झालेली नाही, ज्याचा दोन–तृतीयांश भाग कायम दुष्काळाच्या छायेत असतो, ज्यामध्ये पन्नास–साठ कोटी अशी अशिक्षित माणसे राहतात, की ज्यांच्याजवळ कोणतेही औद्योगिक कौशल्य नाही आणि ज्यांची क्रयशक्ती दोन वेळचे अन्न, कपडा आणि निवारा मिळवण्याइतकी नाही; आणि ज्या देशाचे उद्योग जागतिकीकरणात विकसित देशांशी स्पर्धा करू शकत नाहीत त्या देशातील बहुसंख्य लोकांना जगण्यासाठी किंवा नुसते तगण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे आहे ती संपदा जपणे, तिचा ऱ्हास होणार नाही याची खबरदारी घेणे, तिला प्रदूषित होऊ न देणे आणि हे करतानाच तिची उत्पादकता वाढवण्याचा सतत प्रयत्न करणे अनिवार्य आहे. पाणलोटक्षेत्राचा विकास मृद्संधारण, वनीकरण, पाण्याची साठवण, शेतीमधले संशोधन, जैविक विविधतेचे रक्षण, सौर उर्जेचा वापर ह्या गोष्टी करण्यावाचून आपल्याला गत्यंतर नाही. बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी शेती हा आतबट्ट्याचा धंदा आहे हे खरे पण मोठे जमीनदार सोडले तर इतरांसाठी शेती हा कधीच एकुलता एक धंदा नव्हता. त्याला नेहमीच वेगवेगळ्या धंद्यांची जोड देऊन तो व्यवहार्य केला जाई. शेतीमधली अतिरिक्त माणसे उद्योगात वा इतर क्षेत्रात हलवणे जरूरीचे आहे. त्याचबरोबर शेतीला जलसिंचनाची आणि उत्पादक कृषिप्रक्रियांची जोड देणेही आवश्यक आहे. काम नसलेल्या दिवसात रोजगाराची हमी आणि कामाच्या वेळी पाण्याची हमी या दोन्ही गोष्टी शेतीसाठी अनिवार्य आहेत. त्या पुरवून झाल्यावर जो अतिरिक्त श्रमिक वर्ग उरेल त्याच्यासाठी श्रमप्रधान उद्योग (पारंपरिक आणि अपारंपरिक) असे निर्माण करावे लागतील. या भूमिकेची मांडणी पुस्तकातल्या लेखांमधून तपशीलवार आलेली आहे. नैसर्गिक संपदेच्या आधारे विकास घडवून आणण्याच्या जेवढ्या शक्यता आहेत त्या सगळ्या पूर्णांशाने अमलात आणून बघितल्या पाहिजेत. ते काम जोपर्यंत होत नाही तोपर्यंत नैसर्गिक साधनसंपदा नष्ट करून चालणार नाही. ते करत असताना औद्योगिक विकासाचे कार्यक्रमही राबवायला

पाहिजेत पण ते एकमेकांना पूरक होईल अशा प्रकारे एकमेकांच्या मुळावर उठून नव्हे.

पुस्तकातील लेखांमधले आणखी एक समान सूत्र म्हणजे लोकांच्या जगण्याच्या धडपडीत स्वयंस्फूर्त संस्था आणि कार्यकर्ते यांनी दिलेला सहभाग. लोकसेवा आणि लोकशिक्षण हीच स्वयंस्फूर्त संस्थांची मुख्य कामे आहेत असे मला प्रांजलपणे वाटते. दीन–दुबळ्या निराधार असुरक्षित लोकांसाठी सामाजिक सेवा आवश्यक आहे तर आपल्या हक्क व जबाबदाऱ्यांसाठी व्यापक लोकशिक्षण. विकासाचे कार्य हे खरे तर लोकशिक्षणाचाच भाग आहे पण सोयीसाठी ते एक वेगळे कामही मानता येईल. विकास म्हणजे काय, तो कसा असावा, त्याचे आदर्श व व्यावहारिक रूप कोणते या प्रश्नांना निर्लोभी, बिगर–सरकारी, स्वयंस्फूर्त संस्थाच भिडू शकतात. त्यासाठी आवश्यक ते पथदर्शी प्रयोगही संस्था व कार्यकर्तेच करू शकतात.

माझ्या सारखे जे लोक जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीतून सामाजिक कार्यात आलेले आहेत आणि ज्यांच्यावर गांधी आणि बिनोबा यांच्या विचारांचा प्रभाव आहे त्यांना लोकशक्ती ही राज्यसत्तेपेक्षा नेहमीच मोठी वाटते. स्वयंस्फूर्त संस्था, नागरी समाज, लोकांच्या चळवळी हे सर्व जागृत लोकशक्तीचे आविष्कार आहेत. 'राज्यसत्तेवर अंकुश ठेवणे' हा घासून गुळगुळीत झालेला शब्दप्रयोग आहे पण तेच त्यांचे ऐतिहासिक काम आहे. राजकीय पक्ष, कामगार–शेतमजूर संघटना, शेतकरी चळवळी यांनीही हे काम करायला पाहिजे पण त्यांची बौद्धिक व संघटनात्मक दिवाळखोरी जाहीर असल्याने स्वयंस्फूर्त संस्थांवरच ही जबाबदारी पडली आहे. एका बाजूने बेबंद उधळलेल्या स्वार्थी राज्यसत्तेला कायद्याचा आणि लोकांच्या दबावाचा चाप लावणे आणि दुसऱ्या बाजूने तिच्यामार्फतच लोकविकासाकरिता उपयुक्त अशी धोरणात्मक चौकट बनवणे असे हे दुहेरी कार्य आहे. सध्या या प्रक्रियेला मध्यमवर्गीय समाजाचा प्रतिसाद फार थंड आहे म्हणून वर्तमानपत्रे – पुस्तके – मासिके व इतर माध्यमातून त्याचेही प्रबोधन करण्याचा 'प्रयास' करावा लागतो.

एखाद्या विषयाची भूमिका मांडण्याच्या दृष्टीने हे टिपण फार त्रोटक आहे याची मला कल्पना आहे. पण मला जे काही सांगायचे आहे ते पुस्तकातील लेखांमधून मांडले गेले आहे असे मला वाटते. ते लेख मुळातून वाचले गेले तर या विषयाची अनेक अंगे व त्यांची व्याप्ती लक्षात येईल. विकासाची प्रक्रिया काय असावी हा प्रश्न आहेच पण त्याहीपेक्षा मोठा प्रश्न आपण त्याची चर्चा करत नाही हा आहे. गतानुगतिक होऊन प्रवाहासोबत वाहात तरी जायचे नाहीतर आंधळेपणाने प्रवाहाविरुद्ध दंड तरी थोपटायचे असाच सर्वसाधारण प्रतिसाद दिसतो. मानवी संस्कृती प्रवाह कुठे जाणार आहे या विषयी भाकीत करणे कठीण आणि त्या प्रवाहाला नियंत्रित करणे तर त्याहून कठीण. पण आपण ज्या कालखंडात जगतो त्या कालखंडापुरता तरी तो प्रवाह शुद्ध, निर्मळ आणि सुखकारक राहील असा प्रयत्न करणे योग्य आहे. शिवाय त्या प्रवाहाने बेबंदपणे काठावरचे जीवन उद्‌ध्वस्त करू नये म्हणून काही वेळा बांध घालून वळण देणेही आवश्यक आहे. हे काम सगळ्यांनी मिळून करायचे आहे. वळण देण्याचे काम कार्यकर्ते चांगल्या रीतीने करतील तर कोणते वळण द्यायचे याचा विचार तत्त्वचिंतक करतील. समाजशास्त्राचा अभ्यासक म्हणून मी फक्त हा प्रवाह कसा आहे, त्याची खोली किती, वेग किती; सांचलेपणा कुठे आणि प्रवाहित्व कुठे एवढेच समजून घ्यायचा प्रयत्न केला आहे. तेसुद्धा त्यात डुंबता डुंबता.

❑❑❑❑

# स. ह. देशपांडे यांच्या प्रस्तावनेमधील विकास-प्रतिमान विषयक मुद्द्यांची चर्चा करणारे टिपण

(डॉ. सुबोध वागळे, प्रयास)

**प्रस्तावना**

डॉ. मिलिंद बोकील ह्यांनी लिहिलेल्या 'जनाचे अनुभव पुसतां' (मौज, २००२) ह्या पुस्तकाला प्रा. स. ह. देशपांडे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. प्रस्तावनेमध्ये प्रा. स. ह. देशपांडे यांनी इतर अनेक महत्त्वाच्या मदुद्यांबरोबरच बोकीलांच्या पुस्तकातून ध्वनित होणाऱ्या विकासविषयक मुद्द्यांचा काहीशा संक्षेपाने पण नेमकेपणाने परामर्श घेणारी चर्चा केली आहे. ह्या प्रस्तावनेतील चर्चेच्या निमित्ताने प्रयासच्या वतीने एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. ह्या चर्चासत्राच्या तयारीसाठी प्रयासच्या विनंतीस मान देऊन डॉ. बोकीलांनी प्रा. स. ह. देशपांडे यांनी उपस्थित केलेल्या विकासविषयक चर्चेच्या संदर्भात एक टिपण तयार करून दिले. ह्या टिपणामध्ये डॉ. बोकीलांनी सांगितल्याप्रमाणे पुस्तक लिहिण्यामागे त्यांची भूमिका मूलतः समाजशास्त्रज्ञाच्या अभ्यासकाची आहे. टिपणात त्यांनी प्रा. स. ह. देशपांडे यांच्या काही मुद्द्यांवर आपल्या प्रतिक्रियाही नोंदवल्या आहेत.

प्रयासने आयोजित केलेल्या चर्चासत्रासाठी प्रा. देशपांडे व डॉ. बोकील यांच्यामधील चर्चेकडे विकासविचाराच्या अभ्यासकाच्या दृष्टीतून देखील पाहण्याची गरज प्रकर्षाने जाणवली. त्यादृष्टीने हे टिपण लिहिले आहे. टिपणामध्ये मुख्यतः प्रा. स. ह. देशपांडे (टिपणात सर्वत्र सहदे असा उल्लेख केला आहे) यांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या मुद्द्यांवरील माझ्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. सहदेंच्या मुद्द्यांविषयी माझा (एक पर्यायी विकासप्रतिमानाची गरज वाटणारा ह्या अर्थाने 'पर्यायवादी' असणाऱ्याचा) दृष्टिकोण मांडण्याचा शक्य तितका प्रयत्नही टिपणामध्ये केला आहे.

**विकासाची संकल्पना**

सहदे : ''विकासाची आपली नेमकी संकल्पना काय आहे ते प्रथम निश्चित केले पाहिजे. माणूस हा 'प्राणी' असला तरी इतर प्राण्यांपेक्षा काही निराळेपण त्याच्यात आहे. ... थोडक्यात तो संस्कृती निर्माण करू शकतो. या सर्वांमागे स्वतःचे जीवन अधिकाधिक सुखी करण्याची त्याची प्रेरणा कार्यरत झालेली असते. हे मानवत्व आहे. आपली विकासाची कल्पना अशा मानवत्वाशी सुसंगत असली पाहिजे'' (पान पंधरा).

''विकासाची ही संकल्पना पूर्णपणे ऐहिक आहे. ... अर्थात काही अपवादात्मक व्यक्तींना वेगळ्या प्रकारचा, त्यांच्या-त्यांच्या अर्थाने आध्यात्मिक, असा विकास साधायचा असेल तर त्यांना तशा पद्धतीने जगण्याचे स्वातंत्र्य राहील'' (पान सोळा).

मानवी संस्कृतीच्या मागे स्वतःचे जीवन अधिकधिक सुखी करण्याची आदिम प्रेरणा कार्यरत असते यात काही वाद नाही. पण समाज म्हणून एकत्र राहताना व संस्कृती निर्माण करताना ह्या आदिम प्रेरणेच्या बरोबरीनेच मानवाने समता, बंधुता, स्वातंत्र्य यासारखी अनेक 'नैतिक' मूल्ये निर्माण केली व नंतर ती मानवी संस्कृतीचा भाग बनून गेली. सुखशोधी आदिम प्रेरणेपेक्षा ही नैतिक मूल्येच 'मानवत्वा'चे व 'संस्कृती'चे वेगळेपण व खरी ओळख दर्शवतात. विकासाची कल्पना ही अशा मानवत्वाशी व नैतिक मूल्यांशी सुसंगत असली पाहिजे. त्यासाठी विकासाच्या ऐहिक संकल्पनेला आध्यात्मिक नसली तरी नैतिक बाजू असावीच लागेल.

**उद्योग व औद्योगिक**

सहदे : ''मानवी विकासात <u>उद्योगांना</u> अटळ स्थान आहे. एवढेच नव्हे तर ते स्थान वाढते राहते. मग <u>औद्योगिक प्रतिमान</u> नाकारणे याचा अर्थ विकास नाकारणे असा होतो'' (पान सोळा). (अधोरेखन माझे)

''निसर्गाकडून मिळणाऱ्या वस्तू जशाच्या तशा उपभोगण्यापेक्षा त्यांचे 'रूप' बदलून त्या जास्त उपयुक्त व सुखावह करणे'' म्हणजे 'उद्योग' अशी व्यापक व्याख्या सहदे करतात (पान पंधरा). ती मान्य करण्यास हरकत नाही. याऊलट '(शहरी) औद्योगिक' प्रतिमान हे विकासाचे एक प्रतिमान आहे, ज्यात पाश्चात्त्य, आधुनिक समाजाने निर्मिलेल्या एका विशिष्ट प्रकारच्या औद्योगीकरणाच्या प्रक्रियेला केंद्रीय स्थान आहे. तेव्हा (वरील व्याख्येप्रमाणे) 'उद्योग' व 'औद्योगिक प्रतिमान' ह्या दोन संज्ञांमध्ये महदंतर आहे व एकाच (वरील) तर्कक्रमात त्या दोन संज्ञा समानार्थाने वापरल्याने गोंधळ निर्माण होतो.

एका बाजूला सहदेंनी व्याख्या केलेल्या 'उद्योगा'चे मानवी विकासात अटळ स्थान आहे यात काहीच वाद नाही. कारण अन्यथा मानवाने निसर्गजात अवस्थेतच राहावे असे म्हटल्यासारखे होईल. याउलट, 'औद्योगिक प्रतिमाना'तील ह्या 'पाश्चात्त्य-आधुनिक' औद्योगिकरणाच्या प्रक्रियेच्या अनेक पैलूंवर गंभीर आक्षेप घेतले जातात. या प्रक्रियेतील उद्योगांचा आकार, त्यांची केंद्रीभूत रचना, त्यामध्ये खनिज किंवा पुनर्निर्मितिक्षमता नसणाऱ्या ऊर्जासाधनांचा होणारा वारेमाप व अपव्ययी वापर, त्यामधून निर्माण होणारी पर्यावरणास व मानवी जीवनास घातक असणारी विषारी रसायने, त्यामध्ये कामगारांवर होणारा अन्याय, उद्योंगाच्या महाकाय आकारांमुळे त्यांच्या ठायी एकवटणारी अमर्याद आर्थिक-राजकीय सत्ता, त्या उद्योगांची मर्यादित रोजगारक्षमता या साऱ्या पैलूंवर विविधप्रकारचे, विविध दृष्टिकोणातून आक्षेप घेतले जातात.

ह्या विशिष्ट 'पाश्चात्त्य-आधुनिक' औद्योगीकरणाचे मानवी जीवनाच्या विविध अंगांवर व ते जीवन ज्यावर अवलंबून आहे त्या निसर्गावर (अनेकदा भीषण म्हणावेत असे) जे दुष्परिणाम होतात त्यामधून हे सारे आक्षेप निर्माण झाले आहेत. थोडक्यात, हे 'औद्योगीकरण' मानवी जीवनाच्या तसेच बहुसंख्याच्या विकासाच्याच मुळावर उठणारे आहे असा सार्वत्रिक म्हणता येईल असा अनुभव आहे. अशा विकास-विरोधी 'आधुनिक पाश्चात्त्य' औद्योगीकरणाच्या पायावर उभ्या असणाऱ्या विकासाच्या 'शहरी-औद्योगिक' प्रतिमानावर आक्षेप घेणे किंवा ते नाकारणे म्हणजे विकास नाकारणे असे म्हणता येणार नाही.

सारांशाने सांगायचे तर, अनेक 'पर्यायीविकास'वाद्यांचा 'उद्योगां'ना विरोध नाही. एवढेच नव्हे तर 'औद्योगिकरणा'मधील उत्पादकतावाढीसारख्या काही सकारात्मक पैलूंना देखील त्यांचा विरोध नाही. विरोध आहे तो 'आधुनिक-पाश्चात्त्य' औद्योगिकरणाच्या तसेच त्यावर आधारलेल्या 'शहरी-औद्योगिक' प्रतिमानाच्या 'विकास-विध्वंसक' पैलूंना व त्यांच्या दुष्परिणामांना.

**चंगळवादाचे सामाजिक दुष्परिणाम**

सहदे : शारीर गरजा अतिरिक्तपणे पुरवणे म्हणजे चंगळ असे म्हणता येईल. तिचे वैयक्तिक दुष्परिणाम ती-ती व्यक्ती भोगेल, सामाजिक दुष्परिणाम असतील तर ते कायद्याच्या कक्षेत येतील (पान सोळा).

काही थोड्या मंडळीच्या चंगळीसाठी केले जाणारे बहुतेक व्यवहार हे (विशेषतः भारतासारख्या देशात) सामाजिक दुष्परिणाम घडवणारे असतात. त्यावर समाजाने निर्माण केलेल्या (कायद्यांसारख्या) साधनांद्वारे नियंत्रण ठेवायला हवे असे म्हणणे ठीक. पण ते कायद्याच्या कक्षेत (आपोआप) येतील व त्याचे (आपोआप) दमन/शमन होईल असे म्हणणे प्रत्यक्षात (पुस्तकात नव्हे) बरोबर ठरणार नाही. बव्हंशी, असे समाज-विघातक चंगळवादी व्यवहार व त्यांचे कर्ते यांना प्रचलित कायद्याच्या कक्षेत आणणे प्रत्यक्षात कठीण जाते, असाच अनुभव येतो. (टोकाचे उदाहरण म्हणजे रस्त्यात झोपलेल्या गरिबांना चिरडणारे सारे स्टारपुत्र व उद्योगपतींचे पुत्र.)

पुढे जाऊन असेही म्हटले पहिजे की असे कडक कायदे असले व त्यांची कडक अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला गेला तरी प्रश्न सुटत नाहीत. ही चंगळवादी मंडळी त्यातही मार्ग शोधीत राहातात. त्याचे उत्तम उदाहरण अमेरिकेतील (जेथे कडक कायदे व दक्ष यंत्रणा आहेत असे म्हणतात) एनरॉन, वर्ल्डकॉम, इ. कंपन्यांनी नुकतेच जे रामायण घडवले त्यात पाहायला मिळते. त्यामुळे चंगळवादाला व चंगळवादाच्या पोटात असणाऱ्या हव्यासाला तात्विक पातळीपासून सर्वच पातळ्यांवर विरोध करावा लागेल.

**समता आणि विकास**

सहदे : शारीर सुखापलीकडची सुखेही काही थोड्यांनाच मिळत आहेत आणि इतर काहीना पुरेसे अन्नही मिळत नाही अशी स्थिती असेल तर काही प्रकारचे उपभोग ही चंगळ ठरेल म्हणून विकासात समतेचा दृष्टिकोण आवश्यक आहे. ही समता नेमकी कोणत्या मर्यादेपर्यंत असावी याचे सर्व ठिकाणी लागू पडेल असे एकच उत्तर देता येत नाही. तेव्हा समतेचा विचार विकासावर एक मर्यादा घालतो असे म्हणता येईल (पान सोळा).

सहदे मांडतात त्यापेक्षाही प्रत्यक्षात परिस्थिती भीषण आहे. 'काही थोड्यांना शारीर सुखापलीकडची सुखे मिळत आहेत व काहीना पुरेसे अन्न मिळत नाही' अशाप्रकारे सद्यःपरिस्थितीचे वर्णन करता येणार नाही. खरेतर, 'काही थोड्यांच्या शारीर सुखापलीकडच्या सुखांसाठी म्हणजे चंगळीसाठी अनेकांच्या तोंडचे अपुरे अन्नही विकासाच्या नावाखाली सध्या काढून घेतले जाते आहे' असेच म्हणावे लागेल. तेव्हा अशा विकासाच्या प्रयत्नांना व त्याच्या गाभ्यात असणाऱ्या शहरी-औद्योगिक प्रतिमानाला विरोध करणे केवळ तार्किकदृष्ट्या योग्यच नव्हे तर विवेकी देखील नाही का?

अशा परिस्थितीमध्ये ज्यांना पुरेसे अन्नदेखील मिळत नाही त्यांचा विचार करणे म्हणजे समतेचा विचार करणे आवश्यक आहे, पण त्यामुळे विकासावर मर्यादा येतील (कारण त्यांना पुरेसे अन्न देणे अनुत्पादक ठरेल?) असा विचार सहदे मांडतात. समतेचा विचार केल्याने विकासावर (कोणाच्या? आणि विकासावर की चंगळीवर?) मर्यादा येतात हा सहदेंचा विवादास्पद मुद्दा तूर्तास मान्य केला तरी ज्यांना पुरेसे अन्नही मिळत नाही त्यांचा विचार विकासप्रक्रियेत प्राधान्याने करणे (विशेषतः त्यांच्यापर्यंत सध्याचे प्रतिमान म्हणते त्याप्रमाणे विकास 'झिरपत' नाही असा पाच दशकांचा अनुभव गाठीशी आल्यावर तरी) म्हणजेच समतेचा विचार विकासाच्या प्रतिमानाच्या केंद्रस्थानी आणणे हे आवश्यक नाही का?

**पर्यावरण रक्षणाची गरज**

सहदे : दुसरी मर्यादा पर्यावरणरक्षणाची, आत्ताची लोकसंख्या आणि पुढच्या पिढ्या यांना आवश्यक तेवढा पर्यावरणाचा अंश शिल्लक राहिला पाहिजे. पण पर्यावरण एके पर्यावरण असा आग्रह उपयोगी नाही (पान सोळा, सतरा).

आत्ताची लोकसंख्या व पुढच्या पिढ्या यांना आवश्यक तेवढा पर्यावरणाचा अंश शिल्लक राहिला पाहिजे हे तत्त्व ज्याला मान्य आहे त्याला पर्यावरणवादी म्हणण्यास हरकत नाही. विकासाच्या नावाखाली प्रत्यक्षात जे घडवले जाते आहे त्यामध्ये हे तत्व पाळले जात नाही हाच पर्यावरणवाद्यांचा मुख्य आक्षेप आहे. उदाहरणार्थ, सध्याची पिढी अस्ताला जाण्यापूर्वीच पर्यावरणाचा महत्त्वाचा भाग असणाऱ्या वातावरणाचा बऱ्यापैकी विध्वंस होईल अशी स्थिती आली आहे. हा जगातील विविध देशातील शास्त्रज्ञांच्या आंतरराष्ट्रीय पॅनेलचा जवळजवळ एकमुखी निष्कर्ष आहे. याची अनेक उदाहरणे देता येतील. पुण्यातील

वाहनामधून निर्माण होणाऱ्या कार्बनडाय ऑक्साईड पैकी २% वायूही शोषून घेण्याची पुण्यातील उरल्यासुरल्या झाडांची क्षमता नाही असे मांडले जाते. भारतातील वनक्षेत्रही विकासाच्या नावाखाली झपाट्याने कमी केले जात आहे तर जागतिक स्तरावर सारे श्रीमंत देश स्वतःच्या विकासासाठी त्यांच्या देशातील कर्बवायूचे उत्सर्जन रोखायला तयार नाहीत. या साऱ्यांमुळे निर्माण होणारे वैश्विक वातावरणीय बदलापासून ते स्थानिक प्रदूषणापर्यंतचे सारे प्रश्न आज आपणासमोर आ वासून उभे आहेत. अशा परिस्थितीत देखील ते सारे प्रश्न निर्माण करणाऱ्या 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाची अंमलबजावणी जशीच्यातशीच नव्हे तर आणखीन जोमदारपणे करण्याचा आग्रह धरला जातोय.

'शहरी–औद्योगिक' प्रतिमानानुसारच्या विकासामध्ये अनुस्यूत असणाऱ्या पर्यावरणाच्या अशाप्रकारच्या विध्वंसाकडे संपूर्णतः दुर्लक्ष करून विकासाच्या नावाखाली सारी राजसत्ता व धनसत्ता जेव्हा 'धरण एके धरण' म्हणून किंवा 'रस्ता एके रस्ता' म्हणून पर्यावरणाला व त्यावर अवलंबून असणाऱ्या आदिवासींना उद्ध्वस्त करू पाहते तेव्हा त्याविरुद्ध उभ्या राहणाऱ्या मूठभरांना 'पर्यावरण एके पर्यावरण' असा प्रसंगी टोकाचा वाटणारा आग्रह धरण्याशिवाय गत्यंतर नसते हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

**नागरीकरण व त्याच्या दुष्परिणामांची अपरिहार्यता**

सहदे : ''नागरीकरणातले काही दोष अंगभूत समजले तरी अनेक दोष परिहार्य आहेत. ते अनियोजित विकासामुळे निर्माण झालेले आहेत.''

''पण हे परिहार्य दोष गेले तरी मोठ्या लोकसमूहामुळे आणि 'व्यापारी' म्हटल्या जाणाऱ्या संस्कृतीमुळे नागरीकरण हे मुळातच अमंगळ आहे अशी भूमिका काही जण घेऊ शकतील. ती आपण वादासाठी तूर्त मान्य करू.''

''मग प्रश्न असा उपस्थित होतो की हे शहरी प्रतिमान अस्तित्वात का आले? 'बिनशहरी पण औद्योगिक' असा पर्याय का स्वीकारण्यात आला नाही?''

''तर या प्रश्नाचे उत्तर सरळ आहे. ते असे की, तंत्रविद्या ज्या रीतीने विकसित झाली त्या रीतीत दुसरा पर्यायच उपलब्ध नव्हता'' (पान सतरा).

नागरीकरणाचे समर्थन करण्यासाठी किंवा नागरीकरण व 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानावरच्या विरोधकांच्या टीकेचे खंडन करण्यासाठी सहदे नागरीकरणाची सरसता दाखवून देत नाहीत तर त्यातील दोषांचा उल्लेख करून सहदे सध्याच्या नागरीकरणाच्या व त्यामागे असणाऱ्या विकास प्रतिमानाच्या अपरिहार्यतेकडे जातात. म्हणजेच तेही सध्याच्या 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानामध्ये अनुस्यूत असणाऱ्या नागरीकरणातील दोष व त्याची अवांछनीयताही मान्य करीत असावेत. मात्र त्याशिवाय त्यांना पर्याय दिसत नाही म्हणून इतरांनी त्यावर वांझ टीका करू नये असे त्यांचे म्हणणे आहे. ही जर सहदेंची भूमिका असेल तर ती 'निर्मम विकासवाद्यां'च्या नेहमीच्या भूमिकेपेक्षा वेगळी आहे हे नमूद करायला हवे.

बहुसंख्य 'पर्यायी विकासवाद्यां'ची नागरीकरणाबाबतची भूमिका ही बरीचशी त्यांच्या औद्योगिकरणाच्या बाबतीतल्या भूमिकेसारखीच आहे. ह्या पर्यायवाद्यांचा 'नगरां'ना आंधळा विरोध नाही. 'नगरां'ची मानवी संस्कृतीला जी देणगी मिळाली आहे व मिळते आहे त्यावर त्यांचा आक्षेप नाही. किंबहुना नगरांच्या रचनेतील ह्या सांस्कृतिक व सामाजिक शक्तिस्थानांचा फायदा नव्या तंत्रज्ञानाच्या व नव्या सामाजिक संस्थांरचनांच्याद्वारे नगराबाहेर राहणाऱ्यांनाही मिळायला हवा असेही त्यांच्यापैकी काहीजण म्हणतात. त्यांचा आक्षेप आहे तो विशिष्ट प्रकारच्या 'पाश्चात्त्य–आधुनिक' औद्योगिकरणातून व विशिष्ट प्रकारच्या 'औद्योगिक–शहरी' प्रतिमानातून निर्माण होणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या 'नागरीकरणा'ला. मोठ्या उद्योगांच्या मानवी संसाधनविषयक गरजा भागवण्यासाठी जे नागरीकरण होते त्यातून सहदे मांडतात ते (पान सतरा) व इतर अनेक पर्यावरणीय, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय दुष्परिणाम मानवी जीवनावर व बहुसंख्यांच्या विकासावर होतात. हे सारे दुष्परिणाम हे 'पर्यायवाद्यां'च्या नागरीकरणावरील आक्षेपांचे मूळ आहे.

आता हे दुष्परिणाम परिहार्य आहेत का? सहदे म्हणतात त्याप्रमाणे नागरीकरण व औद्योगीकरण ज्या प्रकारे व ज्या यंत्रणांमार्फत होते त्यांच्या कारभारातील (गव्हर्नन्स) अनेक गंभीर त्रुटींचा (त्यात 'अनियोजन' आले) वाटा ह्या दुष्परिणामांच्या निर्मितीत आहे हे नक्कीच. पण ह्या सर्वत्र जाणवणाऱ्या तीव्र स्वरूपाच्या दुष्परिणामांचे मूळ केवळ ह्या प्रकारच्या त्रुटींमध्ये शोधून पुरेल का? हा मुद्दा येतो. त्याचे उत्तर शोधण्यासाठी विकासाच्या 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानामुळे होणारे नागरीकरण नेमके कसे होते ते पाहूया. हे नागरीकरण दोन महत्त्वाच्या प्रक्रियांद्वारे होते असे म्हणता येईल. पहिल्या प्रक्रियेमध्ये 'पाश्चात्त्य–आधुनिक' औद्योगीकरणाद्वारे निर्माण होणाऱ्या मोठ्या उद्योगांच्या व त्यावर आधारित मध्यम व लघू उद्योगांच्या मानवी संसाधनांच्या गरजा भागवण्यासाठी नागरीकरण होते. याबरोबरच ह्या नागरीकरणाच्या मुळाशी दुसरीही महत्त्वाची प्रक्रिया आहे. 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानामध्ये ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनाच्या (व त्यांच्या उत्पादकतेच्या) विकासाकडे दुर्लक्ष होते. किंबहुना त्यांचा विकास स्थानिक लोकांना टिकावू पद्धतीने उपजीविका मिळावी म्हणून केला जात नाही. तर बव्हंशी शहरी–औद्योगिक व्यवस्थेसाठी त्या संसाधनांचे दोहन करण्यासाठी आवश्यक तसा व तेवढाच त्यांचा विकास केला जातो (वैतरणा धरण, एनरॉन प्रकल्प ही उदाहरणे घेता येतील). अनेकदा, शहरे व उद्योग यांच्या विकासासाठी त्या (ग्रामीण) नैसर्गिक संसाधनांचे दोहन करण्याच्या प्रयत्नात त्यांचा विध्वंसही होतो. ह्या कारणांमुळे त्या ग्रामीण नैसर्गिक संसाधनांवर उपजीविकेसाठी अवलंबून असणारी कुटुंबे व समाजसमूह प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने विस्थापित होतात व नव्या उपजीविकेच्या शोधात शहरात येऊन थडकतात. (त्यांच्या 'व्यवस्थित'

पुनर्वसनाच्या मुद्द्याकडे नंतर वळूया.) विकसनशील देशातील नागरीकरणाच्या मुळाशी असणाऱ्या ह्या दोन महत्त्वपूर्ण प्रक्रियांतून ('पुश्' व 'पुल्') 'शहरी–औद्योगिक' विकासाच्या प्रतिमानामुळे होणारे नागरीकरण आकाराला येते. अशा नागरीकरणामुळे निर्माण होणारी शहरे म्हणजे बव्हंशी औद्योगिकरणासाठी जमा करण्यात आलेल्या विपन्नावस्थेतील अर्ध–गुलामांची झोपडपट्टी अथवा उपजीविकेसाठी कुठेही थारा न मिळालेल्या 'पर्यावरणीय निर्वासितां'ना टाकण्याचा कचराडेपो बनतात असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

आता हे परिहार्य आहे का? ह्याचा विचार करूया. ह्या दोषपूर्ण प्रक्रियांतून निर्माण होणाऱ्या विविध समस्यांचा मुळातून परिहार करण्यासाठी प्रत्यक्षात काही उपाय आहे का ते पाहूया. उद्योगांच्या वर उल्लेखलेल्या उतरंडीत काम करणाऱ्या सर्वच कामगारांना सन्मानपूर्ण मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक तेवढे वेतन अथवा मोबदला देणे अनिवार्य (कायद्याने) केल्यास सध्याचे उद्योग चालू शकतील का? हा मुद्दा विवादास्पद आहे. काहीजणांच्या मते ह्याचे उत्तर निदान काही उद्योगांच्या बाबतीत तरी होकारात्मक आहे. मात्र जे लोक हे उद्योग चालवणार आहेत त्यांचे उत्तर सद्यःस्थितीत काय आहे ते महत्त्वाचे ठरेल. ह्या प्रश्नाचे उद्योगविश्वातील मंडळीनी दिलेले स्पष्ट नकारार्थी उत्तर सध्या चालू असणाऱ्या केंद्रीय कामगार आयोगाच्या अहवालावरील चर्चेतून आपणास सहज मिळू शकते.

त्याचप्रमाणे शहरी–औद्योगिक व्यवस्थेसाठी ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनाचे दोहन केले जाताना ज्या ग्रामीण कुटुंबांच्या उपजीविका धोक्यात येतात त्यांना त्यांच्या नुकसानाची परिपूर्ण भरपाई त्यांचे 'व्यवस्थित' पुनर्वसन करून द्यायची म्हटली तर त्याचा भार शहरी–औद्योगिक प्रकल्पांना व व्यवस्थेला झेपेल का? काही औद्योगिक व विकास प्रकल्पांच्या बाबतीत (उदा. एनरॉन, माहेश्वर यासारख्या) ह्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देता येते. मात्र मोठ्या प्रमाणावर नुकसान व विस्थापन करणाऱ्या अनेक प्रकल्प व धोरणांच्या बाबतीत ह्या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल.

थोडक्यात, सध्याच्या शहरी–औद्योगिक प्रतिमानातून निर्माण होणाऱ्या नागरीकरणाचे दुष्परिणाम हे त्या नागरीकरणाच्या मुळाशी असणाऱ्या प्रक्रियांचे अपरिहार्य भाग आहेत. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, ह्यापैकी अनेक दुष्परिणाम सदर प्रतिमानानुसारच्या कार्यक्रमांच्या कारभारातील (नियोजन अथवा अंमलबजावणीमधील) दोषांमुळे निर्माण झालेले नसून त्यांचे मूळ ह्या प्रतिमानाच्या अस्तित्वाशी किंवा त्याच्या गाभ्याशी जोडले आहे. हाच पर्यायवाद्यांचा त्या प्रतिमानावरचा मुख्य आक्षेप आहे हे लक्षात घ्यायला हवे.

हे सारे मांडल्यानंतर सहदे ज्या एकाच मुद्यावर सध्याच्या 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाला पाठीशी घालतात तो मुद्दा बाकी राहतो. तो मुद्दा म्हणजे त्या प्रतिमानाच्या अनिवार्यतेचा किंवा अपरिहार्यतेचा. त्या मुद्द्याकडे आपण नंतर वळूया.

**नैसर्गिक साधनसंपत्तीची उत्पादकता**

सहदे : ''दुसरा मुद्दा नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवण्याचा आणि ती अधिक उत्पादक करण्याच्या विषयीचा आहे'' (पान अठरा).

सहदे म्हणतात त्याप्रमाणे नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवणे व त्याची उत्पादकता वाढवणे इतका मर्यादित मुद्दा पर्यायवाद्यांच्या मांडणीमध्ये नसतो हे स्पष्ट करायला हवे. कारण साधनसंपत्तीची उत्पादकता वाढवणे म्हणजे त्या साधनसंपत्तीतून (त्याच्या एकक भागातून) जास्तीत जास्त उत्पादन मिळवणे (त्यासाठी इतर संसाधने भाराभार प्रमाणात वापरावी लागली तरी) असा अर्थ बऱ्याचवेळा काढला जातो. नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करताना दीर्घकाळापर्यंत तिची उत्पादकता टिकून राहील (कारण नैसर्गिक साधनसंपत्ती बव्हंशी पुनर्निर्मितिक्षम असते) व त्यातून दीर्घकाळापर्यंत (पुढच्या पिढ्यांनाही) उत्पादन मिळेल ही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीची 'प्राथमिक उत्पादकता' वाढवली पाहिजे असाही मुद्दा अनेकदा 'पर्यायवाद्यां'कडून मांडला जातो. (प्राथमिक उत्पादकता म्हणजे बाहेरच्या कोणत्याही निविष्टी (इनपुटस्) न वापरता मिळणारी उत्पादकता). नैसर्गिक साधनसंपत्तीची 'प्राथमिक उत्पादकता' टिकाऊ प्रकारे वाढवणे ह्याकडे 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाकडून पूर्णतः दुर्लक्ष केले जाते. किंबहुना अनेकदा उत्पादन व तात्कालिक उत्पादकता वाढवताना नैसर्गिक संसाधनांच्या प्राथमिक उत्पादकतेचा (कधी कधी त्यांच्या अस्तित्वाचाच) बळी दिला जातो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे हरित क्रांती पद्धतीची शेती होय. त्यानुसार खते, पाणी, यांसारख्या बाहेरच्या निविष्टी मोठ्या प्रमाणावर वापरून जमिनीची उत्पादकता वाढवण्याच्या प्रयत्नात तिची प्राथमिक उत्पादकता कमी कमी होत जाते व उत्पादकता कायम राखण्यासाठी बाहेरच्या निविष्टींची गरज वाढत जाते. त्यापुढेही बाहेरच्या निविष्टींचे प्रमाण वाढवत नेल्यास इतर दुष्परिणामांबरोबर एक वेळ अशी येते की जमीनच क्षारपड बनते.

**प्रकल्पांची लाभ–हानीच्या निकषावरील तपासणी**

''खाडी मासेमारीला योग्य का? तेथे ती चालत आली आहे म्हणून? हा निकष विवेकी (रॅशनल) नाही हे उघड आहे'' (पान एकोणीस).

(हे तितकेसे विवेकी अथवा उघड नाही हे बोकीलांनी त्यांच्या टिपणामध्ये मांडले आहे.)

''या भूमिकेची तार्किक परिणती अशी असेल की ज्या ज्या ठिकाणी जे जे व्यवसाय चालू आहेत ते ते तसेच चालू राहावेत. यात विकासाची शक्यताच संपते.

''प्रकल्पाच्या निवडीचा विवेकी निकष म्हणजे आर्थिक. पण आर्थिक म्हणजे नुसता पैशातला खर्च किती आणि त्यातून परतावा किती हा नाही, तर एकूण लाभ–हानीचा निकष. असा हिशेब करताना सर्व बरे–वाईट आर्थिक–सामाजिक परिणाम लक्षात घेतले जातात.''

''खाडी मच्छीमारीसाठी उपयुक्त आहे हे खरेच आहे; कारण तसे सिद्धच झाले आहे. पण दुसऱ्या एखाद्या व्यवसायासाठी ती अधिक उपयुक्त असण्याचीही शक्यता आहे. अट एवढीच की पर्यायी व्यवसाय तुलनात्मक लाभ–हानीच्या कसोटीला उतरतो असे दाखवून दिले पाहिजे'' (पान एकोणीस).

सहदे म्हणतात त्या प्रकल्प निवडीसाठीच्या लाभहानीच्या विवेकी निकषाकडे आता जाऊया. त्या लाभ–हानीच्या विवेकी निकषामध्ये बऱ्या–वाईट आर्थिक–सामाजिक परिणामांचा अंतर्भाव सहदे करतात. आर्थिक व सामाजिक परिणामांबरोबर पर्यावरणीय परिणामांचाही विचारदेखील लाभ–हानीच्या निकषामध्ये केला पाहिजे हे आता जागतिक बँक देखील मान्य करते. ''लाभ–हानीचा असा हिशोब करताना सर्व बरे–वाईट आर्थिक–सामाजिक परिणाम लक्षात घेतले जातात'' असे सरसकट विधान सहदेंनी केले आहे. ते मात्र प्रत्यक्षातील अनुभवाच्या कसोटीवर उतरत नाही. खरेतर, आजवरच्या अनुभवाच्या बळावर याच्या नेमके उलट विधान सरसकटपणे करता येईल. ते असे की 'सामाजिक, पर्यावरणीय परिणामांचा सोडाच पण आर्थिक परिणामांचाही परिपूर्ण अभ्यास व विचार विकासप्रकल्पांच्या निवडीच्या वेळी केला जात नाही.' एनरॉन, नर्मदा, कृष्णा खोरे यांसारख्या अनेक प्रकल्पांच्या बाबतीत हे तर आता सिद्ध झाले आहे. यासंदर्भात अशाच एका प्रकल्पावरील चर्चेच्या वेळी एका पर्यायवादी तज्ज्ञाने सरकारी व विकासवादी तज्ज्ञांसमोर जाहीर आव्हान दिले होते की भारतातील एकातरी धरणप्रकल्पाचा (बांधकामानंतर) शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून त्याचा आर्थिक लाभ–हानीचा निर्देशांक दीडच्या वर (जो सर्वमान्य निकष आहे) असे कोणीही दाखवून द्यावे. अर्थात हे आव्हान कोणीही स्वीकारले नाही.

**संशयास्पद प्रकल्प व समाजधुरीण**

वरील अवतरणाच्या शेवटी सहदे म्हणतात की ''अट एवढीच की पर्यायी व्यवसाय तुलनात्मक लाभ–हानीच्या कसोटीला उतरतो असे दाखवून दिले पाहिजे'' (पान एकोणीस). प्रश्न असा आहे की हे कोणी दाखवून द्यायचे? ही जबाबदारी कोणाची? सरकार, प्रकल्प टाकणारे उद्योगपती, त्याच्या पाठी उभे राहणारे अर्थशास्त्रज्ञ यांची ही जबाबदारी नाही का? ती ते जबाबदारी कधी पार पाडतात का? ही मंडळी ती जबाबदारी पार पाडत नसली तर बाहेरचे अर्थशास्त्रज्ञ व इतर समाजधुरीण त्या प्रकल्पांविरुद्ध व त्या प्रकल्पपुरस्कर्त्यांविरुद्ध उभे राहणार का? व ते ही न जमल्यास निदान तोपर्यंत असे संशयास्पद प्रकल्प उभे राहू नयेत अशी खंबीर व जाहीर भूमिका तरी घेणार का?

प्रत्यक्षात चित्र उलटेच दिसते. प्रकल्प बांधणारे सरकार, उद्योजक, त्यामागे आपले बळ उभे करणारे पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ, व इतर समाजधुरीण ही जबाबदारी तर पार पाडत नाहीतच. यापुढे जाऊन प्रकल्पाचे स्वतंत्र परीक्षण करून तांत्रिक, आर्थिक, वित्तीय, पर्यावरणीय, अथवा सामाजिक निकषांवर प्रकल्प उतरू शकत नाही हे दाखवले गेल्यास त्या विश्लेषणामागे व विश्लेषणकर्त्यांमागे उभे राहण्याऐवजी हे पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ, समाजधुरीण त्यांच्यावरच विकासविरोधक म्हणून टीका करून, त्यांची खिल्ली उडवून, त्यांना 'नैतिक दहशतवादी' ठरवून, किंवा क्षुल्लक कोट्या करून त्याकडे दुर्लक्ष करतात. अनेकदा ह्या समाजविरोधी प्रकल्पातून स्वतःची पोळी पिकवणाऱ्या राजकारणी व उद्योजकांच्या मागे हे धुरीण स्वतःच्या क्षुद्र स्वार्थांकरता प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे उभे राहतात. नंतर त्या प्रकल्पांचा बोऱ्या वाजला, त्यामुळे लोक देशोधडीला लागले तरी त्या राज्यकर्त्यांना, त्या प्रकल्प पुरस्कर्त्यांना, व त्यांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष पाठिंबा देणाऱ्या पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ, अथवा समाजधुरीणांना जाब विचारणारी कोणतीच यंत्रणा आपल्याकडे नाही. ही सारी मंडळी अशाच एखाद्या नव्या प्रकल्पाच्या मागे आपली शक्ती लावण्यास मोकळीच राहतात. ही आपली खरी शोकांतिका आहे.

**लाभ–हानीचा निकष वापरण्यातील गुंतागुंती**

'बऱ्या–वाईट आर्थिक–सामाजिक परिणामांचा हिशेब करून प्रकल्प लाभ–हानीच्या निकषावर तपासणे' ही प्रक्रिया प्रथमदर्शनी वाटते तेवढी सरळसाधी नाही हे देखील लक्षात घेतले पाहिजे. या विषयावर मोठ्या प्रमाणावर अभ्यास व चर्चा विविध स्तरावर झालेली आहे. त्यातील अडचणींवर काही जणानी उपायही सुचवले आहेत. पण त्यातील सारे प्रश्न सुटलेले नाहीत. अजूनही त्यावरची चर्चा चालूच आहे. ह्या चर्चेचा खास अभ्यास मी केलेला नाही. पण या प्रक्रियेतील काही अडचणी येथे दाखवून देणे गरजेचे वाटते.

पहिली अडचण म्हणजे अनेक सामाजिक व पर्यावरणीय हानी अथवा लाभांचे मोजमाप तसेच त्यांचे आर्थिक परिमाणामध्ये (म्हणजे पैशामध्ये) रूपांतर नेमकेपणे करणे कठीण व विवादास्पदच नव्हे तर काही बाबतीत अशक्य देखील आहे.

दुसरी अडचण म्हणजे भविष्यातील लाभ–हानीची तुलना आजच्या लाभ–हानीशी करताना भविष्यातील लाभ–हानीच्या पैशातील मोलाचे रूपांतर आजच्या पैशामध्ये करताना वापरण्यात येणाऱ्या पद्धतीबद्दलही अनेक मतभेद आहेत. उदाहरणार्थ, ह्या पद्धतीमध्ये भविष्यातील पैशाची किंमत आजच्या पैशाच्या तुलनेत कमी मानली जाते. हा विशिष्ट (म्हणजे व्यापारी) दृष्टिकोणाचा परिपाक आहे व हाच एकमेव दृष्टिकोण संपूर्ण समाजाचे दीर्घकालीन (पुढील पिढ्यांचे) हित ठरवण्यासाठी (प्रकल्पांची परीक्षा करताना) वापरणे चुकीचे ठरेल असेही म्हटले जाते.

तिसरा मुद्दा आहे वेगवेगळ्या समाजघटकांच्या दृष्टिकोणातील भिन्नतेचा व त्यातून उद्भवणाऱ्या लाभ–हानीबाबतच्या मतभेदांचा. वेगवेगळ्या समाजघटकांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, इतिहास, व अनुभवांवरून त्या त्या समाजघटकांचे जीवनविषयक दृष्टिकोण ठरत असतात. परिणामी, एखाद्या प्रकल्पाच्या लाभ–हानीकडे पाहण्याचे त्यांचे दृष्टिकोणही भिन्न असतात व त्यातून अनेक मतभेद संभवतात. (अर्थातच समाजघटकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक

जडणघडणीत जितकी जास्त विविधता व विषमता असेल तितकेच हे मतभेदही जास्त व तीव्र असतील हे उघड आहे.) ह्या मतभेदांचे लोकशाहीपद्धतीने (म्हणजे सर्व संबंधित समाजघटकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेऊन) निराकरण करणे हा एक मार्ग असू शकतो. (ते कितपत, कसे, व कोणत्या परिस्थितीमध्ये शक्य आहे व कसे करावयाचे हे प्रश्न तूर्तास बाजूला ठेवूया.) मात्र ह्या अशा लोकशाही प्रक्रियेतून पुढे येणारा पर्याय हा 'लाभ–हानीच्या निकषा'च्या कसोटीवर उतरेलच याची खात्री नसते. (म्हणूनच बहुधा ह्या दृष्टिकोणातील विविधतेकडे दुर्लक्ष करून [एकाच किंवा सारख्या समाजगटाचे सदस्य असणारे] सरकारातले किंवा बाहेरचेही समाजधुरीण बऱ्याचवेळा अशा प्रकल्पांना परस्पर ''समाजहितकारी'' ठरवून मोकळे होतात.)

**शहरी–औद्योगिक प्रतिमानाचे राजकीय अंग**

सहदे : याचा अर्थ असा की ही सर्व वाताहत सरकारची अनास्था, कंपनीचा बेमुर्वतखोरपणा व जनतेतलेच काही स्वार्थी लोक यामुळे झाली. बोकील म्हणतात त्याप्रमाणे हे अर्थशास्त्र नव्हते तर 'राजकीय अर्थशास्त्र' होते. म्हणजे हे परिणाम 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानामुळे घडून आले असे नाही तर ते प्रतिमान ज्या रीतीने राबवण्यात आले त्या रीतीमुळे घडून आले (पान वीस).

'शहर–औद्योगिक प्रतिमान' हे 'शुद्ध' अर्थशास्त्रीय (हा 'नीती'चा भाग) व त्याचे प्रत्यक्षातील दुष्परिणाम मात्र 'राजकीय अर्थशास्त्रा'मुळे आले (हा 'रीती'चा भाग) असा भेदभाव सहदे करतात. हा मुद्दा जरा खोलात जाऊन तपासावा लागेल. बहुतेक मानवी व्यवहारात एक 'राजकीय' अंग असते. खरेतर सर्वच मानवी नात्यांमध्ये ते असते असे अनेक मानसशास्त्रज्ञ व स्त्रीवादाचे अभ्यासक म्हणतात. अनेक नात्यांमधील परस्परव्यवहारांमध्ये दुसऱ्यावर (व्यक्त किंवा अव्यक्त) प्रभाव, सत्ता, अथवा नियंत्रण प्रस्थापित करून त्याद्वारे स्वतःचे हित वा उद्दिष्टे (एखादे उद्दिष्ट परहिताचे देखील असू शकेल) साधण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक अथवा अभावितपणे केला जातो. असा प्रयत्न म्हणजे त्या नात्याचे वा व्यवहाराचे राजकीय अंग अशी 'राजकीय' या शब्दाची व्यापक व्याख्या करता येईल. समाजव्यवहारांमध्ये (विशेषतः ज्या समाजांमध्ये एकजिनसीपणा कमी व विविधता/ विषमता जास्त अशा समाजातील व्यवहारांमध्ये) हे 'राजकीय' अंग अनिवार्यपणे व प्रकर्षाने असते.

पुस्तकातील अर्थशास्त्र हे मानवी व्यवहाराबाबतीतल्या काही गृहीतकांवर अवलंबून आहे. त्यामध्ये ह्या 'राजकीय' अंगाचा फारसा विचार नसतो. त्यामुळे हे पुस्तकी अर्थशास्त्र समाजामध्ये उपयोगात आणताना त्यात 'राजकीय' अंग येणारच. त्यामुळे हे 'राजकीय' अंग वगळून 'शुद्ध' अर्थशास्त्रीय 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाचा विचार करण्याचा प्रयत्न अव्यवहारी किंवा पुस्तकी पढीकपणाचा ठरेल. (न्यूटोनिअन) भौतिकविज्ञानाचे नियम जसे रोजच्या जगात लागू पडतात तसे तथाकथित 'शुद्ध', मूल्य, व 'अ–राजकीय' असे पुस्तकातील अर्थशास्त्राचे नियम व सिद्धांत प्रत्यक्ष समाजात लागू पडणार नाहीत हे विसरून विकासाच्या प्रतिमानावर चर्चा केल्यास ती चर्चाही अप्रस्तुत (इर्‌रेलेव्हंट) ठरेल.

मुळात 'शुद्ध' व 'मूल्यवि ' (मूल्यावलंबी नसणारे अशा अर्थाने), 'राजकीय' अंग नसणारे असे काही समाज–व्यवहारात असेल असे मानणे धाष्ट्र्याचे ठरेल. (यात सर्व प्रकारच्या ''साधु'' प्रवृत्तीच्या व्यक्तींचा व त्यांच्या व्यवहाराचा अर्थातच समावेश केलेला नाही.) असे म्हंटल्यावर समाजातूनच निर्माण होणाऱ्या ज्ञानाच्या निर्मितीप्रक्रियेलाही व ज्ञानालाही (साहित्याप्रमाणेच) एक 'राजकीय' अंग असते हे मानावे लागेल. (हे विधान अगदी भौतिकविज्ञानाच्या बाबतीतही खरे आहे हे थॉमस कुन्हसकट अनेकांनी प्रतिपादन केले आहे.) परिणामी, पुस्तकी अर्थशास्त्राला व त्यातील 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानासारख्या सिद्धांतानाही (म्हणजे तथाकथित शुद्ध 'नीती'लाही) एक 'राजकीय' अंग असते. त्यांना हे राजकीय परिमाण देण्यात समाजातील (ज्यांच्या हाती समाजातील धनसत्ता, ज्ञानसत्ता, वा राज्यसत्ता असते त्या) बलिष्ठ घटकांचा मोठा वाटा असतो. परिणामी, शहरी–औद्योगिक प्रतिमानासारखे सिद्धांत हे मुळातच ह्या बलिष्ठ गटाच्या दृष्टिकोणातून व त्यांना पोषक अशा रीतीने बांधले जातात याचे भान ठेवावे लागेल.

प्रस्तुत चर्चेच्या संदर्भात बोलायचे तर 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाच्या निर्मितीप्रक्रियेतील, त्या प्रतिमानातील, त्याबरोबरीने त्याच्या अंमलबजावणीतील 'राजकीय' अंगाचा विचार न करता विकासाची चर्चा करणे उपयुक्त ठरणार नाही. किंबहुना अंमलबजावणीतील 'राजकीय' अंगाची (वा हस्तक्षेपाची) सबब सांगून 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाला दोषमुक्त करता येणार नाही.

**विस्थापितांच्या पुनर्वसनाबाबतची सत्यपरिस्थिती**

सहदे : प्रतिमानाचे जे रूप प्रस्तुत आहे ते व्यापक आर्थिक–सामाजिक निकषांवर तपासावे किंवा तपासण्याचा आग्रह धरावा, त्या परीक्षेत ते उतरले तर त्याचे स्वागत करावे आणि ते न्याय्य आणि कायदेशीर रीतीने, योग्य त्या नियमनांसह आणि पारदर्शीपणाने कार्यवाहीत येईल याबद्दल जागरूक राहावे. इस्पात इंडस्ट्रीजविरूद्ध खाडीतल्यांनी जो संघर्ष केला त्यात आमचे पुनःस्थापन करा या मागणीपर्यंत ते आले आहेत. पोलाद–उद्योगच नको कारण आम्हांला मासेमारी आणि भातशेती अविच्छिन्नपणे करता यायलाच हवी अशी आता तरी त्यांची मागणी नाही. ही भूमिका शहाणपणाची आहे. तीच मागणी अभयारण्यामुळे पीडित झालेल्यांची आहे ('प्राण्यांना अभय, माणसांना वनवास'). आताच्या प्रतिमानाच्या मर्यादेत कमीजास्त प्रमाणात कुणाचे तरी विस्थापन होणे अपरिहार्य दिसते. त्यांचे पुनःस्थापन नीट होईल असे पाहणे हाच मग मुख्य कार्यक्रम उरतो. अर्थात 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाचा जो अंश प्रस्तुत आहे

तो आर्थिक-सामाजिक निकषांवर उतरतो असे येथे गृहीत केलेले आहे. तशी परिस्थिती नसेल तर त्यावर आक्षेप घेणे अर्थातच योग्य आहे (पान वीस).

इस्पात इंडस्ट्रीजग्रस्त शेतकऱ्यांची किंवा अभयारण्यपीडीतांची पुनर्वसनाबाबतची 'शहाणपणाची' भूमिका ही अगतिकतेपोटी, पुरेशा राजकीय बळाच्या अभावी, व नाईलाजातून आलेली 'समजूतदार' भूमिका आहे हे सहदेंनी लक्षात घ्यायला हवे. आपल्या जगण्याचे, उपजीविकेचे साधन हिरावून घेणाऱ्या 'बलिष्ठां'बरोबरच्या संघर्षात विजयाची कोणतीही शक्यता नसल्याने ''अर्धं त्यजति पंडितः'' या न्यायाने अशी भूमिका घेतली जाते. त्यामध्ये काहीवेळा प्रकल्पपुरस्कर्त्यांकडून दाखवल्या गेलेल्या पुनर्वसनासंबंधी वा विकासासंबंधीच्या गुलाबी स्वप्नांबद्दल वाटणाऱ्या आशेचाही काही भाग असतो. पण जेव्हा ही स्वप्ने फसवी व आपली आशा वृथा आहे हे स्वतःच्या वा इतरांच्या अनुभवावरून लक्षात येते व थोडे का होईना राजकीय पाठबळ मिळते त्यावेळी प्रकल्पग्रस्त विस्थापित संघर्षाचा पवित्रा घेतल्याशिवाय राहात नाहीत हाच अनुभव सर्वत्र दिसतो. उदाहरणार्थ, नर्मदेच्या आंदोलनाचा इतिहासही हेच दाखवतो.

अशा विस्थापितांचे पुनःस्थापन किंवा पुनर्वसन होणे ही अतिशय कठीण, कष्टसाध्य, वेळखाऊ, व वेदनामय प्रक्रिया आहे. त्यासाठी आवश्यक ते कष्ट करण्याची तयारी अर्थातच प्रकल्पनिर्मात्या सरकारी अथवा खाजगी यंत्रणाकडे अथवा उद्योगांकडे अजिबात नसते. दुर्दैवाने, विस्थापनातील भीषणता व पुनर्वसनातील गुंतागुंत समजून घेण्याचा प्रयत्नही बहुसंख्य समाजधुरीण करीत नाहीत. परिणामी, विस्थापितांच्या पुनर्वसनाची चर्चा हे समाजधुरीणासाठीचे एक तोंडीलावणे ठरते.

जंगल, जमीन, पाणी यावर आधारित ज्यांची उपजीविका आहे त्यांची समाजरचना, सांस्कृतिक प्रथा, सामाजिक संबंध, भावनिक विश्व, मानसिकता, आध्यात्मिक संकल्पना या साऱ्यांचे भोवतालच्या जमीन, जंगल, पाणी यांच्याशी जवळचे व अतूट नाते असते व या साऱ्यांच्या अनवट गुंतागुंतीमधून त्यांची जीवनपद्धती तयार झालेली असते. ह्या समग्र जीवनपद्धतीमध्येच त्यांची उपजीविका आतूनच घट्टपणे जोडलेली असते, अवलंबून असते. परिणामी, भोवतालचे जमीन, जंगल, अथवा पाणी त्यांच्याकडून हिरावले गेले तर त्यांच्या उपजीविकेचा केवळ भौतिक आधार हिरावला जात नाही तर त्यांची सारी जीवनपद्धतीच कोसळून पडते. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन (वा पुनःस्थापना) करण्याकरता त्यांना केवळ पुरेसा भौतिक आधार (जमिनीचा तुकडा, घरासाठी जमीन, व काही पैसे) देऊन भागत नाही. हे पुनर्वसन यशस्वी होण्यासाठी त्या भौतिक आधारांभोवती नवीन जीवनपद्धती उभी रहावी लागते. अशी जीवनपद्धती आकारास आली तरच त्यांना त्या भौतिक आधारातून टिकाऊ उपजीविका मिळण्याची शक्यता असते. ही नवीन जीवनपद्धती उभी राहण्यासाठी उपजीविकेच्या भौतिक आधारांबरोबरच इतर साधनसंपत्ती, सामाजिक, शैक्षणिक, भौतिक, व मानसशास्त्रीय साहाय्य व मुख्यतः पुरेशी उसंत मिळणे आवश्यक असते. हे सारे मिळाल्यावरही नवीन सामाजिक संबंध, नवीन संस्थात्मक संरचना, व नवीन मानसिकता निर्माण होऊन त्यातून नवीन जीवनपद्धती व उपजीविका उभी राहण्यास बराच काळ (कदाचित एखाद्या पिढीचा काळही) लागू शकतो. ही सारी गुंतागुंत लक्षात घेऊन विस्थापितांचे 'व्यवस्थित' पुनर्वसन होईल अशी योजना आखण्यासाठी व राबवण्यासाठी आवश्यक ती संवेदनशीलता आपल्याकडील बहुसंख्य समाजशास्त्रज्ञांकडे वा नोकरशहांकडे नाही. एवढेच नव्हे तर भारतासारख्या देशामध्ये एवढ्या मोठ्या संख्येने विस्थापित असताना त्यांच्या व्यवस्थित पुनर्वसनासाठी आवश्यक ते धनबळही आपल्याकडे नाही. वेगळ्या शब्दात सांगायचे तर या 'व्यवस्थित' पुनर्वसनाचा भार जर विकासप्रकल्पांवर टाकला तर बहुतेक विकासप्रकल्प पूर्णतः आतबट्ट्याचे ठरतील. तेव्हा विस्थापितांचे 'व्यवस्थित' पुनर्वसन ही प्रत्यक्षात एक कविकल्पनाच असते.

आजवरचा अनुभव पाहता विस्थापितांना बहुतेकवेळा काही रोख रक्कम अथवा थोडीफार जमीन (तीही कुठेतरी दूर असलेली) अशी काहीतरी थातुरमातूर भरपाई देऊन हुसकावले जाते. अशा परिस्थितीमध्ये त्यांचे पुनर्वसन खऱ्या अर्थाने होणे अशक्य असते. अशा विस्थापितांना मग झोपडपट्ट्यांचा आश्रय घेऊन 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानातील नागरीकरणाच्या प्रक्रियेत सामील होण्यावाचून गत्यंतर नसते.

विस्थापनाची भीषणता व पुनर्वसनाची प्रत्यक्षातील असंभाव्यता लक्षात येण्यासाठी एक 'काल्पनिक खेळ' करून पाहता येईल. अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञ जास्त कार्यक्षम असल्याने उद्या भारतातील सर्व अर्थशास्त्रीय संस्था बंद करून ते काम व्यापक 'मदत' कार्यक्रमाखाली अमेरिकन विद्यापीठांना द्यावयाचे ठरवले गेले असे (केवळ) मिनिटभरासाठी मानूया. हा 'मदत' कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भारतातील सर्व अर्थशास्त्रज्ञांना त्यांचे काम करण्यास बंदी घालावी लागेल अशी पूर्वअट घातली गेली असेही मानूया. ही बंदी यशस्वी होण्यासाठी त्यांना भारतातूनच नव्हे तर साऱ्या 'सुसंस्कृत' जगातून बाहेर हलवावे लागेल. अशा परिस्थितीत त्यांच्या पुनर्वसनाची तयारी म्हणून प्रायोगिक तत्वावर एक योजना सुचवली गेली. या योजनेखाली १० जणांच्या अर्थशास्त्रज्ञांच्या एका गटाला त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रत्येकी १०० एकर जमीन मिळेल एवढ्या आकाराच्या पण मानवी संस्कृतीचा स्पर्श न झालेल्या बेटावर मुलाबाळांसह त्यांनी विरोध करू नये म्हणून अचानक व इतर फारशी काही साधनसामग्री न देता नेऊन सोडले तर त्यांची अवस्था काय होईल याचा विचार करून पाहायला हरकत नाही. वेगळ्या पर्यावरणात, अनोख्या परिस्थितीत अचानक नेऊन टाकले गेले तर साधे तगणे सुद्धा इतके कठीण असते की दोन महिन्यानी त्या बेटांवर बोट पाठवून त्या अर्थशास्त्रज्ञांना गडचिरोलीच्या आदिवासींकडे मजूर म्हणून राहण्याचा पर्याय दिला तर १०० एकर जमीन मागे सोडून सारे अर्थशास्त्रज्ञ तो पर्याय आनंदाने स्वीकारतील. कदाचित ते 'पढेलिखे' असल्याने बोटीच्या 'पढ्यालिख्या' कप्तानाला

आपल्याला मुंबईच्या झोपडपट्टीत सोडावे म्हणून येनकेन प्रकारे पटवण्याचा प्रयत्न करतील.

असा 'काल्पनिक खेळ' करून पाहिला तर तोंडावर चार पैसे फेकून हुसकावलेल्या आदिवासी विस्थापितांचे दुःख कदाचित अर्थशास्त्रज्ञांच्या लक्षात येईल. 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाचे सर्व लाभ घेणाऱ्या शहरीमंडळीनी 'या प्रतिमानामुळे कुणाचे तरी पुनर्वसन होणे अपरिहार्य आहे' अशी 'विश्वामित्री' भूमिका घेणे किती निर्ममपणाचे आहे हे देखील त्यांच्या लक्षात येईल.

सहदे मानतात त्याप्रमाणे 'शहरी–औद्योगिक' प्रतिमान व त्यातील प्रकल्प व धोरणे ही व्यापक आर्थिक–सामाजिक निकषांवर (व लोकशाहीपद्धतीनी) कधीही तपासली जात नाहीत. त्यांची अंमलबजावणी आवश्यक त्या नियमनासह व पारदर्शक रीतीने कधीही होत नाही. अशीच परिस्थिती सर्वदूर आहे. ह्याला अपवाद असलाच तर तो केवळ दुर्मिळ असा अपवाद असेल. मग अशा परिस्थितीत वरील अवतरणाच्या शेवटी सहदे म्हणतात त्याप्रमाणे 'शहरी औद्योगिक' प्रतिमानावर आक्षेप घेणे अर्थातच योग्य ठरेल. तसेच त्याला विरोध करणे विकासविमुखतेचे नव्हे तर जागरूकतेचे व कर्तव्यदक्षतेचे लक्षण ठरेल.

**''शहरी–औद्योगिक'' प्रतिमानाची अपरिहार्यता**

सहदे : ''तंत्रविद्या ज्या रीतीने विकसित झाली त्या रीतीत दुसरा पर्यायच उपलब्ध नव्हता. ही तंत्रविद्या 'केंद्रीकरण' करणारी होती. एका कारखान्यात हजारो कामगार, असे हजारो कारखाने, त्यामुळे निर्माण झालेले लक्षावधी किंवा क्वचित कोट्यवधी माणसांचे समूह–ह्या सर्व घटना उपलब्ध तंत्रविद्येने नियमित झालेल्या होत्या.''

''म्हणजे शहरी–औद्योगिक प्रतिमान हे अनेक पर्यायामधून निवड करून स्वीकारले गेले असे नाही. कारण पर्यायच उपलब्ध नव्हते. विकास हवा तर औद्योगिक वस्तू आणि सेवा हव्यात. त्या हव्यात तर शहरी–औद्योगिक प्रतिमानाला जन्म देते – असा हा पेच होता'' (पान सतरा).

''सर्वच शास्त्रीय शोध नियोजित नसतात. माणूस हा बव्हंशी आपाततः उपलब्ध झालेल्या तंत्रज्ञानाला शरण गेला आहे'' (पान अठरा).

तंत्रज्ञानामधून 'शहरी–औद्योगिक' प्रतिमान व त्यातून विकास असा घटनाक्रम सहदे मांडतात. यामध्ये तंत्रज्ञान हे बव्हंशी आपाततः निर्माण होते असेही ते म्हणतात. थोडक्यात, 'एका बाजूने तंत्रज्ञान आपोआप निर्माण होते तर दुसऱ्या बाजूला मानवी समाजातील आर्थिक सामाजिक व्यवहार व त्यातून बनणारे विकासाचे प्रतिमान तंत्रज्ञानामुळे आकाराला येतात' असा तर्कक्रम ते मांडतात. सहदेंनी मांडलेल्या ह्या तर्कक्रमाच्या दोन्ही बाजूंमध्ये तंत्रज्ञानाला दिलेले स्थान व भूमिका समस्यापूर्ण आहे. मानवी इतिहासाचे असे 'तंत्रज्ञाननिर्धारीत' किंवा 'तंत्रज्ञानकेंद्री' स्पष्टीकरण व आकलन खूप सोपे, आकर्षक वाटते. याला अनेक पर्यायवादीही बळी पडलेले दिसतात. (याचे उत्तम उदाहरण म्हणजे १९६० व १९७० च्या दशकातील अनुरूप–तंत्रज्ञानाची किंवा ॲप्रोप्रिएट टेक्नॉलॉजीची चळवळ. ज्यामागे तंत्रज्ञान सोपे, सुटसुटीत, स्वस्त केले की विकासाचे मार्ग गरिबांना मोकळे होतील असे गृहीतक होते.)

इतर मानवी व्यवहाराप्रमाणेच तंत्रज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेलादेखील एक 'राजकीय' अंग असते. नव्हे, तंत्रज्ञानातून मिळणारे आर्थिक, सैनिकी, व सत्ताकारणी लाभ पाहता त्या प्रक्रियेमध्ये 'राजकीय' अंगच प्रकर्षाने असते असे म्हणता येईल. याची अनेक उदाहरणे देता येतील. एक उत्तम उदाहरण म्हणजे भारतासकट बहुसंख्य देशात सौर ऊर्जा व नैसर्गिक शेती यासारख्या तंत्रज्ञानाच्या संशोधनाकडे केले जाणारे दुर्लक्ष, व त्याचवेळी अणुऊर्जा व जैवतंत्रज्ञान यांना दिले जाणारे झुकते माप. याशिवाय उपलब्ध तंत्रज्ञानाचा अधिकाधिक व व्यापक वापर व प्रसार होणे हे देखील त्याच्या पुढील विकासाला आवश्यक असते. ह्या प्रसारामध्येही अर्थात 'राजकीय' अंग असतेच. याचे एक जवळचे उदाहरण म्हणजे भारतात सर्वत्र व विशेषतः पुण्यामध्ये आधुनिक रेल्वे आधारित सार्वजनिक वाहतूकसेवा निर्माण करण्यास स्वयंचलित वाहन उत्पादकांचा असणारा छुपा व उघड विरोध.

तेव्हा विकासाचा विचार करताना तंत्रज्ञाननिर्मिती व प्रसाराच्या प्रक्रियांमध्ये मोठा 'राजकीय' भाग असतो हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र या प्रक्रियांमध्ये केवळ 'राजकीय' भाग असतो असे म्हणणेही एककल्लीपणाचे ठरेल. त्यामध्ये इतरही वैयक्तिक व सामाजिक घटकांचा प्रभाव असतो. पण तंत्रज्ञाननिर्मितीची प्रक्रिया बव्हंशी आपाततः आहे, स्वतंत्र आहे, अपरिहार्य आहे हे म्हणणे चुकीचे ठरेल.

उपरोल्लेखित तर्कक्रमाची दुसरी बाजू सांगताना सहदे म्हणतात त्याप्रमाणे मानवी समाजव्यवहाराच्या व विकास प्रतिमानाच्या घडणीमध्ये तंत्रज्ञानाचा काही वाटा असतोच. पण त्याबरोबरीने त्याच्या घडणीमध्ये 'राजकीय' अंगाचीही महत्त्वाची भूमिका असते. तंत्रज्ञानाप्रमाणेच त्या तंत्रज्ञानावर आधारलेल्या औद्योगीकरणासारख्या प्रक्रिया, समाजव्यवहारात अनुस्यूत असणारे आर्थिक परस्परसंबंध, त्यासाठी आवश्यक त्या वित्तीय व्यवस्था, व समाजव्यवहार चालवण्यासाठी निर्माण होणाऱ्या संस्थात्मक संरचना या साऱ्यांच्या घडणीमध्ये देखील 'राजकीय' अंग कार्यरत असते. याबरोबरीने समाजातील ज्ञानविज्ञानाच्या निर्मितीमध्येही एक 'राजकीय' अंग असते हे देखील आपण पाहिले. ह्या साऱ्या घटकांतूनच एकत्रितपणे प्रत्यक्षातील विकास प्रतिमान सिद्ध होते. हे प्रतिमान तयार होण्यासाठी ह्या सर्व घटकांमध्ये जी एकमेकांप्रती पूरकता वा सुसंगती आवश्यक असते ती येण्यामध्ये हे 'राजकीय' अंग मोलाची कामगिरी बजावत असते. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, त्या साऱ्या घटकांची रचना व कार्यपद्धती परस्परपूरक व सुसंगत असतात कारण त्यामध्ये काही समाजघटक आपल्या प्रभावाचा, नियंत्रणाचा, सत्तेचा वापर करून त्या रचना, कार्यपद्धती आपल्या लाभांसाठी उपयोगी होतील अशी त्यांची रचना घडवून आणतात.

तेव्हा ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक परस्परसंबंध, वित्तीय व्यवस्था, व संस्थात्मक संरचना अशासारख्या घटकांच्या घडणीमध्ये समाजातील 'राजकीय' शक्तींचा मोठा वाटा असतो व त्यातूनच विकासाच्या प्रतिमानाची जडणघडण होते. परिणामी, ह्या प्रतिमानामध्ये मानवी नियंत्रणाच्या बाहेरचे या अर्थाने अपरिहार्य, आपाततः, मूल्यविरहित, अपौरुषेय असे फारसे काही असत नाही.

त्यामुळे सहदे म्हणतात त्याप्रमाणे पर्यायी प्रतिमान हवे असेल तर केवळ पर्यायी तंत्रज्ञान नव्हे तर पर्यायी विकासविचार, पर्यायी आर्थिक परस्परसंबंध, पर्यायी संस्थात्मक संरचना, पर्यायी वित्तीय रचना हे सारे उभे करावे लागेल. प्रस्थापित 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाच्या विरोधात ते उभे करणे हे अर्थातच 'राजकीय' काम असेल. प्रस्थापित शहरी–औद्योगिक प्रतिमानापासून ज्यांना लाभ मिळतो त्यांचा ह्या कामाला विरोध असेल. तो विरोध मोडून काढण्यासाठी पर्यायी राजकारणदेखील उभे करावे लागेल. असे पर्यायी राजकारण पर्यायी प्रतिमानाभोवती उभे राहिल्यास पर्यायी प्रतिमानाच्या 'नीती' व 'रीती'मधील फरकही खूपच कमी होऊ शकतो.

सहदे म्हणतात त्याप्रमाणे विद्यमान प्रतिमानावर टीका करणाऱ्यांनी असा काही पर्याय प्रत्यक्षात दाखवलेला नाही हे खरे. पण त्याचे कारण म्हणजे पर्यायाच्या मागे उभे राहणारे हे राजकारण अजून उभे राहिलेले नाही. संख्येने जास्त पण 'राजकीय' शक्तीने क्षीण असणाऱ्या (शहरी–औद्योगिक प्रतिमानाला बळी पडणाऱ्या) गरिबांना व त्याच्या पाठीशी उभे राहणाऱ्या मूठभर इतरांना मजबूत 'पर्यायी राजकारण' उभे करण्याचे काम अजून जमलेले नाही. खरेतर त्यांच्यामागे संवेदनशील समाजधुरीणांनी आपले राजकीय बळ उभे करणे गरजेचे आहे. ते न करता बऱ्याचवेळा हे समाजधुरीण त्या बळी पडणाऱ्या गरिबांना व त्यांच्यामागे उभ्या असणाऱ्या मूठभरांना ''दाखवा तुमचा पर्याय'' असे दटावत राहतात.

या साऱ्या पार्श्वभूमीवर 'पर्यायी प्रतिमान अस्तित्वात नसताना विद्यमान प्रतिमान मोडीत काढणे म्हणजे विकासविमुख भूमिका घेणे होय' (पान अठरा) हे सहदेंचे विधान पटण्यासारखे नाही. विद्यमान शहरी–औद्योगिक प्रतिमान मानवी जीवनाला अपायकारक आहे, ते काही जणांना खूप लाभ देत असेल तरी बहुसंख्यांना त्यामुळे विकासाची संधी नाकारली जाते हे स्पष्ट झाल्यावरही विद्यमान शहरी–औद्योगिक प्रतिमानाला संमती देणे व विरोध न करणे ही समाजविमुख भूमिका आहे. 'शहरी–औद्योगिक' प्रतिमान समाजाला व विकासाला घातक आहे असे दिसल्यास त्याचा विरोध करून त्याला पर्यायी असे प्रतिमान उभे करण्यासाठी झटून प्रयत्न करणे हीच भूमिका विकासपूरक आहे, विकासविमुख नव्हे.

**विकासाचे भूमिआधारीत प्रतिमान**

सहदे म्हणतात की भूमिआधारित विकासातून आजच्या मानवी समाजाच्या गरजा भागणार नाहीत (पान वीस). लहान व सीमान्त शेतीचा प्रश्न सोडवण्यासाठी सहदे दोन उपाय सुचवतात. ''एक, शेतीवरचा माणसाचा भार कमी करणे आणि दोन, तंत्रसुधारणा करीत जमिनीची उत्पादकता वाढवणे'' (पान बावीस). शेतीवरचा भार कमी करण्याच्या प्रयत्नांमध्ये 'शहरी–औद्योगिक प्रतिमाना'तील धारणेप्रमाणे शेतीमधील सारा कामगारवर्ग उपजीविकेसाठी औद्योगिक व सेवाक्षेत्राकडे वळवला पाहिजे. मात्र भारतामधील उद्योगांना हे शक्य नाही असे सहदे म्हणतात व रोजगार हमी योजनेचा पर्याय सुचवतात (पान बावीस).

रोजगार हमी सारख्या योजनेमध्ये स्थानिक स्तरावर जोपर्यंत रोजगार उपलब्ध आहे तोपर्यंत जमिनीचा अधिकार नसणाऱ्यांचे विस्थापन न करता त्यांना रोजगार पुरवता येईल. पण ही योजना व्यापक स्तरावर व लांब कालावधीपर्यंत चालवायची म्हटल्यास त्याचे रूपांतर 'लँड आर्मी'च्या योजनेमध्ये करावे लागेल.

ही लँड आर्मी म्हणजे कायमस्वरूपी मजुरांचे सैन्य. अर्थात त्याला सैन्य म्हटले तरी त्या सैन्यातल्या गरीब अर्धशिक्षित मजुरांना खऱ्याखुऱ्या सैनिकांना पुरवतात तशा सोडाच पण प्राथमिक सुविधा पुरवणे देखील आर्थिकदृष्ट्या कितपत परवडेल व परवडले तरी ('राजकीय' कारणे व कारभारातील त्रुटी यामुळे) प्रत्यक्षात त्या किती दिल्या जातील याबद्दल शंकाच आहेत. तेव्हा लँड आर्मी म्हणजे कायमस्वरूपी विस्थापित (कदाचित पुरेशा वेतनामुळे पोट भरणाऱ्या) मजुरांचे सैन्य असेच त्याचे स्वरूप असेल.

ह्या लँड आर्मीचा (व सार्वजनिक निधीचा) वापर करून नैसर्गिक संसाधनाच्या व विशेषतः जमिनीच्या उत्पादकतेमध्ये जी वाढ होईल त्याचे लाभ कोणाला मिळतील? तर ज्यांच्याकडे जमिनी आहेत त्यांना. आणि, ज्याच्याकडे जास्त जमीन असेल, चांगली जमीन असेल, नदीकाठची वा खोऱ्यातील जमीन असेल त्याला अर्थातच त्याचे लाभ जास्त प्रमाणात मिळतील. त्याची यथायोग्य किंमत या जमीन मालकांकडून वसूल करणे व त्याचा वाटा लँड आर्मीमधल्या मजुरांना देणे हे आजच्या 'रीती'मध्ये शक्य होणार नाही हे उघड आहे. थोडक्यात, समाजातील गरीब साधनविहीन वर्गाच्या माथी, पोट भरण्याच्या बदल्यात कायमचे विस्थापन व सरकारने त्यांना दिलेल्या मजुरीपोटी त्यांनी केलेल्या श्रमाचे लाभ मात्र समाजातील सधन वर्गाला असे लँड आर्मींच्या योजनेचे 'राजकीय' अंग आहे. ही लँड आर्मीची कल्पना कदाचित दांडेकर–रथांच्या युगातील मध्यमवर्गीय सामाजिक जाणिवेला बोचणारी नसेल. मात्र आजच्या काळातील सामाजिक जाणिवेच्या व विशेषतः साधनविहीन वर्गामधील जागृतीच्या संदर्भात ही संकल्पना निश्चितच कालबाह्य झालेली आहे.

लहान शेतीच्या प्रश्नांवरील तंत्रसुधारणेच्या (दुसऱ्या उपायाच्या) संदर्भात आपल्या विश्लेषणामध्ये तंत्रसुधारणेच्या मुद्द्यावर सहदे हरित क्रांतीचा दाखला देतात. मृद्संधारण, पाणलोटक्षेत्र विकास, सेंद्रिय शेती या साऱ्यांचा सकारात्मक उल्लेख ते करतात. मात्र, त्यावर ते फारसा जोर देत नाहीत. खरेतर पर्यायी विकासाच्या मांडणीमध्ये सहदे सुचवतात त्या तंत्रसुधारणेतून केवळ जमिनीच्या नव्हे तर साऱ्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थेच्या प्राथमिक उत्पादकतेमध्ये वाढ व रोजगार हमीच्या संकल्पनेप्रमाणे सार्वजनिक पैशातून ह्या तंत्रसुधारणेला व

उत्पादकतावाढीला चालना ह्या दोन्ही संकल्पनावर भर देण्यात आला आहे. आधी म्हटल्याप्रमाणे पर्यायी विकासात समतेचा विचार केंद्रस्थानी असल्याने 'लँड आर्मी'मधल्या समताविरोधी अंगाला दूर सारून सर्वांना नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये किमान अधिकार/वाटा व साधनसंपत्तीच्या उत्पादकतेमधील वाढीच्या लाभाचे पुरोगामी पद्धतीने वाटप यावरही पर्यायी विकासाच्या मांडणीमध्ये भर देण्यात येतो.

**समारोप**

सहदे म्हणतात, ''मी जरी मुक्त अर्थव्यवस्थेचा आणि आताच्या अवस्थेत अटळ असलेल्या औद्योगिक प्रतिमानाचा पुरस्कर्ता असलो तरी ते सावधपणे, पर्यावरणाला आणि मानवी जीविताला कमीत कमी धक्का लागेल अशा रीतीने अमलात आणावे अशा मताचा आहे. आर्थिक उदारीकरणाच्या नव्या लाटेत, ती जणू काही एक जादू आहे, सर्वांच्या समृद्धीची गुरुकिल्ली आहे असे समजण्याचे एक वारे वाहते आहे आणि माणसे गरिबी, बेरोजगारी, अन्याय यांबद्दल संवेदनाहीन होत आहेत की काय असे वाटू लागले आहे. अशा परिस्थितीत या प्रक्रियेच्या दुसऱ्या बाजूकडे वाचकांचे लक्ष वळविण्याचा बोकीलांचा प्रयत्न मोलाचा आहे'' (पान सत्तावीस).

विकासाचे प्रतिमान व्यापक आर्थिक सामाजिक निकषांवर तपासून पाहण्याचा सहदेंचा आग्रह, पुढच्या पिढ्यांना आवश्यक तेवढा पर्यावरणाचा अंश शिल्लक राहिला पाहिजे हे त्यांचे मत, आर्थिक उदारीकरणाकडे जादू किंवा सर्वांच्या समृद्धीची गुरुकिल्ली म्हणून पाहण्यास त्यांनी दिलेला नकार, व उदारीकरणाच्या लाटेत गरिबी, बेरोजगारी, व अन्याय याबद्दल माणसे संवेदनाहीन होत आहेत अशी त्यांना पडणारी काळजी हे सारे पाहता मुक्त अर्थव्यवस्थेच्या व शहरी–औद्योगिक प्रतिमानाच्या निर्मम पुरस्कर्त्यांमध्ये त्यांची गणना करताच येणार नाही. त्यांचा शहरी–औद्योगिक प्रतिमानाला असणारा पाठिंबा व त्यांचे पर्यायी प्रतिमानाबद्दलचे आक्षेप हे शहरी–औद्योगिक प्रतिमानाच्या अपरिहार्यतेबद्दलच्या त्यांच्या काही गृहीतकांवर तसेच त्या प्रतिमानाच्या व्यापक आर्थिक–सामाजिक परिणामांबद्दलच्या काही समजावर आधारीत आहेत हे त्यांच्या प्रतिपादनावरून स्पष्टपणे दिसते. एवढेच नव्हे तर 'शहरी–औद्योगिक' प्रतिमान व्यापक लाभ–हानीच्या निकषांवर न टिकल्यास त्यावर आक्षेप घेतलाच पाहिजे असेही ते स्पष्टपणे म्हणतात. परिणामी, त्यांची उपरोल्लेखित गृहीतके व समज यातील गंभीर त्रुटी दाखवून दिल्यावर त्यांचाही पाठिंबा पर्यायी विकासासाठीच्या प्रयत्नांना मिळण्यास अडचण नसावी.

समाजातील बहुसंख्य संवेदनशील व्यक्तींच्या 'शहरी–औद्योगिक' व 'पर्यायी' विकास प्रतिमानाबद्दलच्या धारणा अशाच प्रकारे घडतात. एका बाजूने रोजच्या जीवनातच नव्हे तर ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात वावरतानादेखील जाणवणारी 'शहरी–औद्योगिक' प्रतिमानाबद्दलची अपरिहार्यता व दुसऱ्या बाजूने एखाद्याने, एखाद्या विशिष्ट परिस्थितीमध्ये, एखाद्या विशिष्ट संदर्भात पर्यायी विकासाच्या नावाने मांडलेली टोकाची भूमिका ह्या दोन आधारे बव्हंशी त्यांची मते बनतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे 'शहरी–औद्योगिक' (वा पर्यायी) विकास प्रतिमानाबद्दलच्या तारतम्यपूर्ण, प्रामाणिक, विश्लेषणात्मक चर्चेची दखल मुख्यप्रवाही माध्यमांकडून अथवा ॲकेडमिक क्षेत्रातील व्यक्ति–संस्थांकडून फारशी घेतली जात नाही. सध्याच्या समाजविघातक प्रतिमानाला पर्याय उभे करण्याची जबाबदारी जणू त्या प्रतिमानाच्या विरोधात उभे ठाकणाऱ्या मूठभर पर्यायवाद्यांची आहे अशी सोयीस्कर समजूत समाजातील धुरीण करून घेतात. सध्यातरी त्यांना त्या प्रतिमानाचे सारे लाभ मिळत असल्याने व त्यांच्या मुलाबाळांनाही त्याचे दुष्परिणाम भोगायला लागणार नाहीत अशी त्यांना खात्री (बव्हंशी अज्ञानापोटी) असल्याने कदाचित त्यांची त्या प्रतिमानाबद्दल फारशी तक्रार नसावी. परिणामी, शहरी–औद्योगिक प्रतिमान व त्यापासून मोठ्या प्रमाणावर लाभ घेणारे मूठभर बलिष्ठ यांची सद्दी तशीच चालू राहते.

❑❑❑❑

# पर्यायी विकास प्रतिमान

डॉ. बोकील व डॉ. वागळे यांच्या टिपणांवर संक्षिप्त प्रतिक्रिया – प्रा. स. ह. देशपांडे

**(अ) सर्वसामान्य**

१. प्रतिमान [Model, System, Paradigm] व व्यूह [Strategy, tactics] असा फरक करणे अवश्य दिसते. हा भेद दोघांच्या लिखाणात स्पष्ट झालेला नाही.

मला पसंत असलेले प्रतिमान खाजगी मालकी मुक्त स्पर्धा – बाजारपेठा असे आहे. त्यांतील पर्यावरणीय धरून सर्व दोषांचा परिहार हे काम शासनाचे व स्वयंस्फूर्त संस्थांचे असेल; म्हणजे व्यूहात्मक असेल.

या मुद्द्याचा अधिक खुलासा प्रत्यक्ष चर्चेत करीन. (पुरवणी पान ५ पहा)

२. शहरी–औद्योगिक प्रतिमानाला सर्वस्वी नकार ही भूमिका संतप्त व टोकाची वाटते.

अधिक खुलासा सभेत.

**(आ) आता विशिष्ट आक्षेप**

***डॉ. बोकील*** (यांच्या मुद्द्यांवरील भाष्ये/आक्षेप)

१. 'जैविक वैविध्य जपले पाहिजे' (पृ. २)

भाष्य – अ. मार्केट कुठल्याही उत्पादनाला नकार देत नाही, किंमत हवी.

ब. उपभोगातील वैविध्य काही कमी होते तर काही वाढते.

क. उत्पादन–क्रियेत जैविक वैविध्य अवश्य आहे काय?

२. 'श्रमप्रधान उद्योग हवेत' (पृ. ३)

स्पर्धेत आणि तंत्रविकासात टिकतील असे असेल तर हो.

३. 'नफा हेतू, स्वार्थ, बेफिकिरी इ.'

वर सर्वसामान्य १ शी संबंधित (पृ. २)

४. 'स्वयंसेवी संस्थांचे कार्य' (पृ. ४)

यावर वेगळ्या चर्चासत्रात चर्चा हवी.

५. 'चर्चा होत नाही' (पृ. ४)

हे खरे मोठे दुखणे आहे.

***डॉ. वागळे*** (यांच्या मुद्द्यांवरील भाष्ये/आक्षेप)

१. 'संस्कृतीची नैतिक बाजू' (पृ. १)

माझे विधान Positive - प्रत्यक्ष मानवी स्वभाव वर्णन करणारे आहे.

२. 'पाश्चात्त्य–आधुनिक–औद्योगिक–शहरी प्रतिमान'

(पृ. २) हे प्रामुख्याने तंत्रनिर्मित आहे.

३. 'चंगळवाद' (पृ. २)

अ. विरोध करायचा म्हणजे नेमके काय? Policy implication काय? शून्य वृद्धी? विशिष्ट वस्तूंवर व सेवावर बंदी?

ब. राज्यसंस्थेने नैतिक दंडक घालून द्यावेत काय? नैतिक निर्णय व्यक्तीने करणे योग्य.

४. 'झिरप सिद्धान्त खरा नाही हा पाच दशकांचा अनुभव' (पृ. ३)

अ. सर्व जगाचा? महाराष्ट्राचा?

ब. एक नैतिक आणि तात्त्विक प्रश्न : समता आणि दारिद्र्यनिर्मूलन हे पर्यायी असतील तर कोणती निवड कराल?

मी दारिद्र्यनिर्मूलनाला प्राधान्य देईन.

क. लोकसंख्या आणि गरिबी यांचा संबंध ध्यानात घेणे जरूर.

५. 'नगरीकरण' (पृ. ३)

दोष प्रतिमानाच्या 'अंगभूत' असण्यापेक्षा तंत्रनिर्मित दिसतात.

६. 'नैसर्गिक साधन–संपत्तीची उत्पादकता' (पृ. ५)

अ. प्राथमिक उत्पादकतेचा मुद्दा मान्य.

ब. Trade - offs चे काय?

क. हरित क्रांती झाली नसती तर? [Paddock and Paddock; 'Triad']

ड. मीठफुटी किंवा खारपड जमीन. कारणे व्यामिश्र

७. 'लाभहानी निकष वापरला जात नाही.'

(पृ. ५) दबाव आणणे – आणीत राहणे हे उत्तर.

८. 'निकषाबद्दल मतभेद' (पृ. ६)

शक्य तितका निर्दोष करणे – करीत राहणे जरूर. कारण निवडीसाठी निकष हवाच. पर्यायी प्रतिमानातही तो लागेल. (भविष्यातील पैशाची किंमत कमी हा Private B. C. निकष आहे.)

९. 'राजकीय अंगाचा विचार केला पाहिजे' (पृ. ७)

अ. अर्थातच. ते दूर करण्यासाठी दबाव हवा.

ब. पूर्ण मूल्यविरहितता कदाचित् शक्य नसेल. पण तिच्याजवळ जाता येते.

क. पूर्वग्रह दोन्ही बाजूंचे असू शकतात.

१०. 'विस्थापन' कठीण, कष्टसाध्य, वेदनामय इ.' (पृ. ८)

अ. विस्थापनविरहित विकासाचा मार्ग काय?

ब. पर्यावरणहानी सर्वच उदाहरणांत केवळ गरिबांना/ग्रामीणांना त्रासदायक होते असे नाही. ध्वनि–वायू–प्रदूषण मुख्यतः शहरी लोकांना भोवते.

११. 'शहरी–औद्योगिक प्रतिमानाची अपरिहार्यता शंकास्पद' (पृ. १०)

अ. वाफ या ऊर्जेतून औद्योगिकीकरणाला प्रारंभ. त्यातून पुढील विकासाला वळण लाभले असण्याची शक्यता.

ब. राजकीय अंश मी नाकारीत नाही. पण तो गौण असावा.

क. इंग्लंडनंतरच्या औद्योगीकृत देशांत social costs कमी (आर्थिक इतिहासाचा आढावा घेतला पाहिजे.)

१२. 'लँड आर्मी' (पृ. ११)

अ. सक्ती नाही. (वेठबिगारी नाही.)

ब. वरचाच प्रश्न : समता हवी की दारिद्र्यनाश?

क. मजूरांचे भ्रमण चालूच आहे. ते नियोजित करता येईल.

ड. 'हमी'चा अर्थ लक्षात घेतला पाहिजे. ('मध्यमवर्गीय सामाजिक जाणीव' हे अप्रस्तुत आहे)

१३. 'तारतम्यपूर्ण, प्रामाणिक, विश्लेषणात्मक चर्चा' (पृ. १२) नजरेस आणावी.

**आणखी काही सर्वसामान्य मुद्दे**

(१) सिद्धान्त आणि राजकीय क्रिया यांचा परस्पर संबंध

(२) क्रांती हवी की Trial and Error?

(३) पर्यायी विकास वा यापुढचा कार्यक्रम काय असावा?

अ. नव्या तंत्रांचा विकास. (शास्त्रज्ञ)

ब. पर्यायी तत्त्वज्ञानाची मांडणी (तत्त्वचिंतक)

क. लोकशिक्षण व दबाव (संघटक)

(४) तत्त्वचिंतकांची गरज (बोकील यांनी अधोरेखित केलेली) सर्वात कळीची आहे.

त्यांची वानवा आहे.

बोकील व वागळे यांनी हे पायाभरणीचे काम करावे.

त्यांना 'प्रतिपक्षा'चे वाटणारे विचारवंतही त्यांना या कामात मदत करतील.

(५) सर्वात महत्त्वाचे : आपणांला प्रयोग करायला अण्वस्त्रधारी, जिहादी लोक सवड देतील काय? आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा, स्पर्धाशील जगाचा, त्यातला आपल्या तगून राहण्याचा [survival] व समर्थ होण्याच्या शक्यतेचा संदर्भ आपल्या कोणत्याही सिद्धांतनाला असायला हवा. सवड सापडल्यास यांचा खुलासा सभेत

**पुरवणी (सर्वसामान्य मुद्दा १ शी संबंधित)**

पर्यायी प्रतिमाने

मार्क्सच्या Production Relations वर (उत्पादन संबधांवर) आधारलेली

(१) खाजगी मालकी व मुक्त बाजारपेठ (भांडवलशाही)

(२) सामाजिक मालकी व पूर्ण नियोजन (समाजवाद)

(३) सहकारी मालकी व तिचे प्रकार (कॉ–ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ)

(४) कामगारांची मालकी (गिल्ड सोशॅलिझम, सिंडिकॅलिझम)

(५) उत्पादन व उपभोग या दोहोंवर समाजाचे प्रभुत्व (उदा. किबुट्झ) ('कम्यून')

यापैकी कोणता किंवा यांखेरीज कोणता पर्याय हे पर्यायी प्रतिमानवाद्यांना ठरवावे लागेल. त्यांच्यापुढचे बौद्धिक आव्हान हे आहे.

❑❑❑❑

---

# पर्यायी विकासनीती

(प्रा. अजित अभ्यंकर)

विकास या शब्दाचा योग्य, चांगला, खरा अर्थ कोणता यावर पुष्कळ चर्चा होऊ शकेल. ती करणे योग्यदेखील ठरेल. पण विकासनीती असा शब्द वापरताना आपल्याला इच्छित असणाराच अर्थ गृहीत धरता येणार नाही; तर त्याचा किमान सामाजिक अर्थ ध्यानात घ्यावा लागणार आहे.

१. विकास या शब्दाचा रूढार्थ उत्पादक शक्तींचा विकास असाच आहे. आज ज्याला रूढार्थाने विकास म्हटले जाते, असा विकास आदिम काळापासून सुरू आहे.

२. उत्पादक शक्तींचा विकास हे मानवी इतिहासामध्ये समान असणारेच समानसूत्र म्हणूनच आपल्याला दिसते. आदिम समतेवर आधारलेल्या व्यवस्थेमधून गुलामीवर आधारलेला समाज अस्तित्वात आला तो कशामुळे ? उत्पादक शक्तींच्या विकासासाठी जुनी व्यवस्था अडथळा ठरु लागल्यामुळेच. त्याच न्यायाने गुलामी समाजामधून सरंजामी व्यवस्थेमध्ये संक्रमण झाले. तसेच सरंजामी व्यवस्थेच्या पोटामधून भांडवलशाहीचा जन्म झाला. आता या भांडवलशाही रचनेचा अडथळा होत असल्यामुळेच उत्पादक शक्तींचा विकास साधण्यासाठीच मानवी समाजाला भांडवलशाहीचा त्याग करुन नवी प्रगत अशी समाजव्यवस्था आणावी लागणार आहे. अर्थात माझ्या मते ही नवी समाजव्यवस्था समाजवादाचीच असणार यात शंकाच नाही.

३. समाजामधील त्या त्या वेळच्या उत्पादक शक्तींचे संघटन व उपयोजन कशाप्रकारे केले जाते त्यानुसार माणसा माणसांमध्ये काही एक संबंध तयार होतात. समाजात एक अधिकार, रचना, राजकीय रचना, वर्ग संबंध , संस्कृती, विचार, तत्वज्ञान यांची एक प्रणाली स्वाभाविकपणे तयार होते.

४. या सर्व रचना, प्रणाली, वर्गसंबंध यांची विकास नावाच्या एका सामाजिक प्रक्रियेच्या संदर्भाच्या अनुषंगाने मांडणी केली, तर आपल्याला एका सामाजिक, आर्थिक, राजकीय रचनेचे दर्शन होते, त्याला आपण विकासनीती असे म्हणू शकतो.

विकासनीती हे काही सामाजिक, आर्थिक, राजकीय रचना व संबंध समजावून घेण्याची नवी पद्धती नाही तर समाजातील वर्ग रचना आणि सामाजिक, आर्थिक गतिशास्त्र समजावून घेण्याचा फक्त नवा संदर्भ आहे.

५. आजचे सत्ताधारी समाजातील त्यांच्या सत्तारचनेला जनतेकडून मान्यता मिळविण्याचा निदान आभास तरी केल्याशिवाय राज्य करू शकत नाहीत. 'विकास करण्याचे वचन' हेच

राज्यकर्त्यांचे सत्तेवर बसण्याचे वचन असणे हे आजपर्यंतचे सामाजिक राजकीय वास्तव होते. (जागतिकीकरणानंतर त्या वचनाच्या सत्ताधाऱ्यांच्या अधिकाराचाही फार संकोच झालेला आहे. त्याचे काय परिणाम होणार आहेत हा अर्थात महत्त्वाचा पण स्वतंत्र असा मुद्दा आहे.) म्हणूनच विकास या नावाखाली सत्ताधारी वर्ग जे काही खपवितात; त्यामधून खऱ्या उत्पादक शक्तींचा वास्तवामध्ये जो नाश होतो, त्याचे सत्य स्वरूप जनतेसमोर आणणे हे प्रगतीवादी शक्तींचे कर्तव्य ठरते.

म्हणूनच आज विकास या संकल्पनेच्या अनुषंगाने समाजातील सर्व प्रस्थापित उत्पादन पध्दती, वर्गरचना, मूल्यप्रणाली, सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रक्रिया आणि त्यांचे गतिशास्त्र यांची मांडणी करणे आवश्यक ठरते. त्याचबरोबर त्याला पर्यायी ठरू शकणाऱ्या सर्व उत्पादन पद्धती, वर्गरचना, मूल्यप्रणाली इ. ची मांडणी करणे तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणजेच प्रस्थापित विकासनीतीच्या विरोधात पर्यायी विकासनीतीची मांडणी आणि त्यासाठी लढा आवश्यक ठरतात.

६. अशा अर्थाने विकासनीतीची चर्चा ही समाजात वास्तवात असणाऱ्या वर्गसंघर्षाचे एक ठोस भौतिक, त्याचप्रमाणे वैचारिक, सैद्धांतिक रूप आहे. विकासनीतीची चर्चा ही केवळ पर्यायी तंत्रज्ञानाची चर्चा नाही. तसे करणे हे पर्यायी विकासनीतीला फारच लहान करण्यासारखे आहे.

७. विकासनीती ही खालील मूलभूत मुद्द्यांच्या आधारे समजावून घेतली पाहिजे.

क) मूलभूत सामाजिक संस्था: यामध्ये समाज ज्या मूलभूत सामाजिक संस्थात्मक रचनेवर उभा असतो, त्याचा समावेश होतो. उदा. मुक्त बाजारपेठ, खाजगी मालकी, जातिव्यवस्था, गुलामीपद्धती इत्यादी.

ख) आर्थिक सामाजिक गतिशास्त्र: यामध्ये आर्थिक सामाजिक संस्था कोणत्या गतिशास्त्रावर चालतात, त्याचा समावेश होतो. उदा. नफा प्रेरणेवर भांडवल चालते. क्षेत्रविस्तार आणि आकारवृद्धी ही भांडवलाची स्वाभाविक आणि जीवनावश्यक गती असते. साम्राज्यविस्तार ही सरंजामी व्यवस्थेची स्वाभाविक अपरिहार्य गती असते. मानवी कल्याणात वाढ ही समाजवादाची गती असते.

ग) तंत्रज्ञान आणि संघटनपद्धती: कोणत्या प्रकारचे तंत्रज्ञान कोणत्या प्रकारच्या समाजाची आवश्यक अट असते, हे निश्चितपणे सांगता येते. उदा. शेतीचा विकास आणि त्यातील यश ही सरंजामी समाजाची पूर्व अट आहे. वाफेची/विजेची यंत्रशक्ती, अत्यंत गतिमान मोठ्या प्रमाणावर उत्पादन ही भांडवलशाहीची पूर्व अट आहे. अशा त्या त्या तंत्रज्ञानाचे उपयोजन क्र.१ च्या मुद्द्यात वर्णन केलेल्या त्या त्या वेळच्या मूलभूत सामाजिक संस्थांच्या व तिच्या गतिशास्त्राच्या आधारे केले जाते, तेव्हा त्यामधून उत्पादनांची सामाजिक संघटनपद्धती व्यक्त होते. उदा. खाजगी मालकी, मुक्त बाजारपेठ ही संस्थात्मक रचना नफ्याचे/भांडवलाचे गतिशास्त्र, आणि गतिमान यंत्रोत्पादनाचा तांत्रिक शोध यामधून अपरिहार्यपणे आधुनिक कारखानदारी आणि भांडवलदार–कामगार असे संबंध निर्माण होतात. केंद्रीत नागरप्रधान औद्योगिक संघटनपद्धती सिद्ध होते.

अर्थात या ठिकाणी हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की यामधील प्रत्येक घटक हा इतिहासात मागील समाजातून काहीसा स्वतंत्रपणे आपल्या विकासक्रमावर चालत पुढे येऊन तयार राहतो. आणि अन्य घटकांची साथ मिळताच एका नव्याच परिस्थितीला/रचनेला जन्म देतो. उदा. बाजारपेठा ह्या प्रथम विस्तार करून मुक्त करून घेण्याचे कार्य व्यापारी वर्ग, सरंजामी व्यवस्थेत करत करत त्या पूर्वीच्या तुलनेने मुक्त करून घेतो. व्यापारामधून पैसा–वस्तू–जास्त पैसा या व्यवसाय चक्राची जोरदार सुरुवात करत असतो. त्याचा परिणाम म्हणून उत्पादनाची मागणी वाढते. जुनी कुळे जमिनीवरून हाकलून जमिनी मोकळ्या केल्या जातात. त्या कुळांमधूनच उत्पादकांची संख्या वाढते. आणि जादा उत्पादकतेची गरज या घरगुती कारखानदारीमध्ये समोर उभी ठाकल्याबरोबरच वाफेवरच्या विणकामाच्या यंत्राचा शोध लागतो. या सर्व घटकांमधून आधुनिक प्रचंड कारखानदारी नावाचे नवे सामाजिक उत्पादन संघटन हे वास्तव समोर येते.

घ) राजकीय रचना व शासनसंस्था: ह्या सर्व आर्थिक–सामाजिक वास्तवाचे संरक्षण करणारी, या सर्व सामाजिक–आर्थिक संस्थांना सार्वत्रिकता, एकरूपता, सातत्य आणि विश्वासार्हता मिळवून देण्यासाठी एका राजकीय आणि दमन यंत्रणेची/रचनेची गरज असते. राजकीय संस्थात्मक चौकट/प्रत्यक्ष शासनसंस्था ही समाजातील सर्व रचना आणि सत्तासंबंधाचे दमन यंत्रणेद्वारे संरक्षण करण्याचे कार्य करते.

ङ) जीवन दृष्टी–मूल्यरचना: मनुष्य मधमाशीप्रमाणे केवळ निसर्गप्रेरणांच्यामुळे भौतिक वस्तूंचे उत्पादन करणारा प्राणी नाही. त्याला वस्तूच्या आकार विषयापासून ते उपभोगापर्यंत प्रत्येक बाबतीमध्ये काही कल्पना आणि मते त्यांच्या व्यवहाराच्या आधारे निर्माण होत असतात. किंबहुना तशी असल्याशिवाय मनुष्य उत्पादन करत नाही. जगूच शकत नाही.

अर्थात कल्पना, विचार यांची निर्मिती ही आकाशातून नव्हे, तर मनुष्याच्या उत्पादनाच्या व्यवहारानुसार होत असते. जसे सरंजामदारी नीट चालायची असेल तर जन्मजात उच्च नीचतेच्या/अधिकाराच्या कल्पना कष्टकरी समाजातही नीट रुजाव्या लागतात. त्यासाठी वरिष्ठ वर्गातील मंडळी तशाच कल्पना धर्म, विचार, वचने, आकांक्षा, कथा, पुराणे यांची निर्मिती करत जातात. बरेचदा त्याला अनुसरून तर कधी नाकारुन समाजात साहित्य आणि कल्पनांची निर्मिती होत असते. समाजात सरंजामदारी उत्पादनपद्धतीला हादरा बसू शकेल अशी भौतिक शक्यता तयार झाल्यावर मात्र प्रस्थापित व्यवस्था नाकारणारे समतावादी–स्वातंत्र्यवादी साहित्य, विचार, कल्पना एका बाजूस आणि दुसऱ्या बाजूस प्रस्थापित जन्मजात विषमतावादी विचार, कल्पना, यांच्यात मोठ्या प्रमाणात चकमक होऊ लागते. कारण दोन्ही बाजूंना भरपूर भौतिक आधार प्राप्त झालेला असतो. प्रस्थापित

शासनसंस्था दमनाचा प्रयोग करते. अखेर त्याची परिणती भौतिक स्फोट होण्यात होते. आणि क्रांतिकारक उठावामधून शासनसंस्थाच बदलते आणि नवी उत्पादनपद्धती स्थिरावण्याचा मार्ग खुला होतो.

पण या सर्व प्रक्रियेमध्ये नव्या भौतिकतेशी सुसंगत अशी जीवनदृष्टी निर्माण होणे, आणि ती रुजणे हे कार्य साधे नाही; तर अत्यंत प्रतिभाशाली व्यक्तींकडूनच ते होऊ शकते. ते आपोआप होणारे नाही. कलेपासून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रापर्यंत त्याचा पसारा असावा लागतो. उद्याचा समाज कसा असावा याचे ते स्वप्न तर असतेच पण ते स्वप्न म्हणजे हवेतल्या धुराने बनविलेले आकार नसतात. नव्या भौतिक शक्यतांचा वेध घेऊन त्यावर आधारलेले आणि कर्तृत्वाला आवाहन करणारे, भावनिक प्रेरणा देणारे स्वप्न देणे ह्यासाठी फार मोठ्या प्रतिभावंतांची गरज असते हे ही लक्षात घेणे आवश्यक आहे. या सर्व आधारावरच आपण आजची विकासनीती कशी आहे याची विश्लेषणात्मक मांडणी खालील प्रकारे करु शकतो.

आजच्या अविकसित देशांमधील भांडवली विकासनीती आणि पर्यायी विकासनीती –

वरील चौकटीमध्ये सूत्ररूपाने प्रस्थापित भांडवली विकासनीती आणि पर्यायी विकासनीती यांची मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

| **मुद्दा** | **प्रस्थापित विकासनीती** | **पर्यायी विकासनीती** |
|---|---|---|
| मूलभूत सामाजिक संस्थात्मक रचना | १. खाजगी मालकी<br>२. कायद्याची समानता<br>३. बाजारपेठीय आर्थिक स्वातंत्र्य | १. सामाजिक मालकी<br>२. सामाजिक न्यायपूर्ण समानता<br>३. विकास प्रगतीचे स्वातंत्र्य |
| गतिनियम | १. अधिकाधिक नफ्यासाठीच उत्पादन<br>२. जगण्यापुरता किमान मोबदला<br>३. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचे क्रयवस्तूकरण<br>४. भांडवलाची सतत वृद्धी | १. गरजानिष्ठित व नियोजनानुसार उत्पादन<br>२. प्रत्येकाला त्याच्या श्रमातील योगदानानुसार मोबदला<br>३. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचा सामाजिक–नैतिक तत्वावर विकास<br>४. सामाजिक कल्याणाची वृद्धी. |
| तंत्रज्ञान पद्धती संघटन पद्धती | १. नियंत्रण/माहिती/निर्णय अधिकारांचे केंद्रीकरण<br>२. नफा प्रेरणा व खाजगी मालकी यामुळे स्थायी विकास, दीर्घकालीन उद्दिष्टे यांना पूर्ण फाटा; निसर्गाला ओरबाडण्याचे तंत्रज्ञान<br>३. महानगरकेंद्रीत विकास<br>४. क्षयी ऊर्जेंचा अतिवापर व उधळपट्टी | १. नियंत्रण/माहिती/निर्णय अधिकाराचे विकेंद्रित लोकशाहीकरण. जनसहभाग व जननियंत्रणावर संचालित संस्था.<br>२. चिरंजीवी, स्थायी विकासाला अनुरूप तंत्रज्ञान<br>३. गावाधिष्ठित नियोजन विकासनीती<br>४. चक्रीय ऊर्जानिर्मितीवर भर |
| जीवनदृष्टी | १. सामाजिकदृष्ट्या तुटलेला असुरक्षित व्यक्तिवाद<br>२. जगाकडे–माणसांकडे केवळ वस्तू–साधने म्हणून दृष्टी<br>३. हव्यासी उपभोगवाद, असमाधानी वखवख<br>४. न–नैतिकता<br>५. हिंसक हस्तक्षेपवादी, नियंत्रणवादी दृष्टिकोन | १. सामाजिक दृष्टया जोडलेल्या व्यक्तींचा विकासवाद<br>२. जग–समाज यांना स्वत:चाच एक भाग म्हणून पाहण्याची व्यापक दृष्टी<br>३. उपभोग हे आनंदाचे एक साधन<br>४. विधायक नैतिक स्वातंत्र्य<br>५. अति आवश्यक तिथेच फक्त हस्तक्षेप/नियंत्रण करणारा सकारात्मक स्वातंत्र्यवादी दृष्टिकोन |

वरील प्रकारची नवी विकासनीती प्रत्यक्षात कशी येईल याचा विचार आपल्याला करावा लागेल. नवी विकासनीती आपणासारख्या केवळ कार्यकर्त्यांना वाटते म्हणून प्रत्यक्षात येणार नाही. नवी विकासनीती ही खरे तर मानवी समाजव्यवस्थाच आहे. त्यासाठी आपल्याला हे शोधावेच लागेल की, नवी व्यवस्था आणावी यासाठी आजच्या समाजात कोणते भौतिक–सामाजिक आधार उपलब्ध आहेत. त्या आधारावर चळवळ केली तरच ती यशस्वी होऊ शकेल. केवळ नैतिक आळवणी आणि हतबल आवाहनांच्या आधारावर एखादी सभा पूर्ण होऊ शकेल. सामाजिक बदल नाही. असे भौतिक–नैतिक–सामाजिक आधार शोधणे, असलेल्यांचा विकास करणे वाढविणे यातच आपली खरी सर्जनशीलता आहे. कार्यकर्त्यांचा खरा कस आहे. त्या आधारावरच आपली चर्चा केंद्रित करायला हवी.

❑❑❑❑

# विकासप्रतिमान विषयक चर्चासत्रासाठी टिपण

(डॉ. विवेक कुलकर्णी, ज्ञान प्रबोधिनी)

डॉ. मिलिंद बोकील यांचे पुस्तक, सहदेंची प्रस्तावना व त्यातील विकास मांडणीला डॉ.सुबोध वागळे यांचा सविस्तर व मिलिंदचा थोडक्यात प्रतिसाद यावर चांगली चर्चा होऊ शकेल. तरीही चर्चेला बरेच व्यापक संदर्भ व आयाम असल्याने खालील टिपणामध्ये काही कल्पना मांडल्या आहेत. एका दिवसाच्या मर्यादित शक्य असल्यास चर्चेत समावेश करता येईल.

१) गेल्या शतकाच्या उत्तरार्धात End of ideology या भावनेला उत्तर म्हणून 'विकसन हेच तत्वज्ञान' (Development is the ideology) असा विचार आला. विकसन हा शब्द गतिमानता व सातत्य दाखवितो तर विकास हा स्थिती दाखवितो म्हणून विकसन. राष्ट्रपतींनीही भारत २०२० साली विकसित देश करण्यासाठी प्रयत्न चालविले आहे. त्यामुळे विकास-विकसन व त्याची प्रतिमाने यांचे महत्त्व वादातीत आहे. शहरी-औद्योगिक, ग्रामीण-विकेंद्रित, small is beautiful and possible, Gandhi with satelite किंवा Electronic Cottage या सर्व संकल्पना फक्त तंत्रज्ञान नाही तर मानसशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र ही अशा सर्वच शास्त्रीय विचारांवर आधारीत आहेत. विकासाच्या प्रतिमानात सर्व नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा विचार आवश्यक आहे. त्यावर आधारित अशी व्यक्तिगत व सामाजिक जीवनप्रणाली आपल्याला शोधायची आणि वास्तवात आणायची आहे. चर्चेमध्ये एका वेगळ्या विचारांचा समावेश पुढील टिपणाद्वारे करता येईल.

२) विकसनाचे एकक (Unit) म्हणून सध्या सरमिसळ आहे. पूर्ण विश्व, पृथ्वी (Biosphere), खंड, देश, राज्ये, जिल्हे-खोरे, तालुका-उपखोरे, गाव, कुटुंब, व्यक्ती अशी एककांची साखळी मांडता येईल. विकसन प्रक्रियेत पहिला मुद्दा हा राजकीय व प्राकृतिक विभागणीत समतोल/सकारात्मक परस्परावलंबन (symbiosis) निर्माण करणे हा आहे. तेल, पाणी, युरेनियम, ऊर्जा अशा विविध विषयांत या symbiosis ची गरज आहे.

३) तालुका/खोरे पातळीवर सुविधा (infrastructure), गाव-शहर पातळीवर जीवनमान (standard of living), कुटुंबपातळीवर उद्योग-रोजगार आणि व्यक्तीपातळीवर सुख-समाधान अशी गरजांची साखळी मांडता येईल. शासन-प्रशासन, खाजगी-सहकार क्षेत्रे, नैसर्गिक साधनसंपत्ती, प्रसारमाध्यमांचे जाळे व स्वयंसेवी व्यक्ती/संस्था या सर्व यंत्रणा (systems) वरील गरजा भागविण्यासाठीची inputs पुरवितात. या सर्व गुंतागुंतीच्या संबंधांमध्ये survival of the fittest, division of labour यांसारखे प्रश्न आणि स्वातंत्र्य विरुद्ध स्वयंशासन, समता विरुध्द गुणवत्ता, विविधता विरुद्ध एकात्मता अशी द्वन्द्वे उत्पन्न होतात. कोणत्याही क्रांतीमधून नाहीतर वैश्विक उत्क्रांतीमधूनच या गुंत्याचे उत्तर उदयास येणार असेही वाटून जाते.

४) व्यक्तींच्या मानसिकता आणि त्यातून जपले जाणारे समूहांचे स्वार्थ यावर नेमकी उपाययोजना केल्याशिवाय प्रश्न सुटणार नाही, म्हणून व्यक्तीच्या गरजांची एक मांडणी पुढील प्रमाणे आहे.

पातळी :

प्राणी → मानव → मानव ऋषी/योगी/महामानव इ.

| | |
|---|---|
| १. अन्न | ६. सुरक्षितता |
| २. वस्त्र/निवारा | ७. शिक्षण |
| ३. पाणी | ८. रोजगार |
| ४. ऊर्जा | ९. संस्कृती |
| ५. आरोग्य | १०. 'स्व' प्रकटीकरण |

५) सर्वांच्या या सर्व गरजा योग्य प्रकारे भागविण्यासाठी विविध social structures व systems आहेत. एका व्यक्तीच्या शरीरात विविध प्रकारच्या अब्जावधी पेशींमध्ये एक सुनियंत्रित संपर्क-निर्णय-नियंत्रण व्यवस्था असते तशीच काहीशी व्यवस्था या ग्रहावर निर्माण करण्याचा आपला प्रयत्न आहे. मिलिंदला अपेक्षित जैविक विविधता व सुबोधला अपेक्षित समता/बंधुता आपल्या शरीरात बघायला मिळते. Survival of the fittest नसतो आणि division of labour नैसर्गिकरीत्या असते. स्वातंत्र्याचा मात्र संकोच असतो, जो टाळून आपल्याला एका नवीन ग्रहरचना बसवायची आहे. शरीरामध्ये असणारे मन/बुद्धीचे अस्तित्व-स्थान घेणारी काही subsystem यासाठी निर्माण करावी लागेल. सध्याच्या स्त्रीशक्ती, पर्यावरण, विज्ञाननिष्ठा अशा सर्व चळवळी आपल्याला या ग्रहअस्तित्वाकडे नेणाऱ्या सकारात्मक प्रक्रिया आहेत. ही उत्क्रांती प्रक्रिया जलद गतीने करण्याची ताकद तंत्रज्ञानात आहे, पण ती ताकद योग्य दिशेने वापरण्याचे शहाणपण मानवसमूहाने दाखविले पाहिजे. माझ्या मते या ग्रहावरती Brain function कोणी करायचे व त्याठिकाणी तो योग्य समूह कसा आणायचा यासाठीचा आपला सर्वांचा खटाटोप आहे. प्रचंड वेगाने बदलणाऱ्या सध्याच्या जगातसुद्धा यासाठी काही पिढ्यांचे कष्ट व काळ लागणे स्वाभाविक आहे.

❑❑❑❑

# प्रा. चंद्रकांत केळकर यांची प्रतिक्रिया

(संदर्भ डॉ. वागळे यांचे टिपण)

स. ह. दें च्या प्रस्तावनेत उपस्थित केलेल्या मुद्द्यांना वागळे व बोकील यांच्या टिपणामध्ये समर्पक उत्तरे दिली गेली आहेत, असे मला वाटते. वागळे यांना सहदेंची भूमिका 'खुल्या मनाची' आहे, असे वाटते. सहदेंना मान्य असलेले मुक्त अर्थव्यवस्थेमधील दोष दूर करण्याकरता जे उपाय अवलंबावे लागतील, ते कार्यवाहीत आणल्यास ती अर्थव्यवस्था मुक्त राहणार नाही; तिला मिश्र अर्थव्यवस्थेच्या जवळ न्यावे लागेल. कारण आवश्यक त्या उपायांची योजना करणे व त्यांची कार्यवाही करणे याकरता राज्याच्या पुरेशा प्रभावी हस्तक्षेपाची गरज राहील. त्यामुळे सहदे मुक्त अर्थव्यवस्थेचे पायिक राहणार असतील व त्याच वेळी त्यांना त्यातून निर्माण होणारे दोष दूरही करायचे आहेत असे ते म्हणत असतील तर ती भूमिका एक तर गोंधळाची किंवा विरोधी भूमिकेला lip service देणारी असे म्हणावे लागेल. 'चंगळवादा'वरील त्यांच्या मांडणीतून हे स्पष्ट होते. 'चंगळवादाचे सामाजिक परिणाम कायद्याच्या कक्षेत येतील' अशी त्यांची मुक्त अर्थव्यवस्थेच्या व्यवहाराकडून अपेक्षा आहे. २००० च्या 'मानव विकास अहवाला'मध्ये प्रगत देशांच्या उपभोगावरील केलेल्या खर्चातून त्या समाजांचे जे अग्रक्रम स्पष्ट होतात, त्यावरून चंगळवादावर कायद्याचे परिणामकारक नियंत्रण कितपत येऊ शकते हे कळते.

माझ्या मते वागळे यांचे टिपण महत्त्वाच्या मुद्द्याला हात घालीत नाही. तो मुद्दा म्हणजे 'पर्यायी विकासा'चे नेमके चित्र कोणते? व समाजाच्या त्या चित्राकडे पोचण्याचा मार्ग कोणता? हा आहे. (सहदे यांनीही यावर बोट ठेवले आहे.) हे दोन्ही प्रश्न अधिक व्यापक आहेत. सहदे ज्या वेळी म्हणतात की ते 'मुक्त अर्थव्यवस्थावादी' आहेत, त्या वेळी त्यांच्यापुढील विकासाचे प्रारूप व मार्ग स्पष्ट आहेत. वागळे यांच्या टिपणातून 'समता, लोकशाही, यांवर आधारलेली न्याय्य समाजरचना व निसर्गाशी समतोल राखून साधलेला मानव विकास' हे सूत्र स्पष्ट होते, हे खरे. पण कोणत्या प्रकारच्या समाजरचनेमध्ये हे साधता येईल, याचे दिग्दर्शन त्यांच्या टिपणामध्ये मिळत नाही. म्हणजेच वागळे यांचे टिपण हे 'पर्यायी प्रतिमानाचे टिपण' या शीर्षकाचे असले तरी त्यातून हे प्रतिमान दृग्गोचर होत नाही, असे मला वाटते. त्यातून प्रतिमानाचे निकष मिळतात, परंतु ते निकष पूर्ण करणारे प्रतिमान कसे निर्माण करावे, हे कळत नाही.

त्यामुळे ही चर्चा पुढे नेण्याकरता ते प्रतिमान कसे निर्माण करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. माझ्या मते या चर्चेचे दोन टप्पे आहेत; १) ज्या संकल्पनांच्या संदर्भात आपण आजची समाजव्यवस्था सदोष आहे, असे म्हणतो त्या संकल्पनांचे अर्थ–आशय पुन्हा तपासून पहाणे; आवश्यक वाटल्यास त्या संकल्पना सुधारून आजच्या परिस्थितीशी सयुक्तिक (relevant) करणे; व २) या संकल्पना मूर्त स्वरूपात आणण्याकरता कोणती व्यावहारिक पावले टाकणे आवश्यक आहे ते ठरविणे, असे दोन टप्पे आहेत. सहदे यांना मान्य असलेला असा एकच मुद्दा उदाहरणाकरता घेऊ : **मुक्त अर्थव्यवस्थेमधील शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये दिसणारे परिणाम** : या परिणामांचे मूळ शहर व गाव यामधील विषम (unequal) विनिमयामुळे गावाचे जे शोषण होते, त्यात आहे. जोपर्यंत विषम बलाच्या दोन घटकांमध्ये मुक्त स्पर्धा आहे, तोपर्यंत त्या दोन घटकांचा विकास समतेच्या तत्त्वावर होण्याची अपेक्षा करणे, तर्कदुष्ट आहे. अशा परिस्थितीत गावाने अधिकाधिक विपन्न होत जाणे, हेच तर्कशुद्ध आहे.

केवळ स्पर्धेवर आधारलेल्या विकासामध्ये शहर व खेडे यांचा जैविक (organic) विकास शक्य नाही.... शरीराच्या सर्व अवयवांची सम्यक वाढ होणे ही प्रकृती, व तसे न होणे म्हणजे विकृती. तोच organic संबंध शहर व खेडे यामध्ये निर्माण झाला पाहिजे, जो केवळ स्पर्धेवर आधारित विकासात होत नाही.

त्यामुळे शहर–गाव यांचा एकमेवाव च्छेदेकरून विकास व्हायचा असेल तर त्या विकासप्रक्रियेमध्ये 'शोषणा'ची संधी निर्माण होता कामा नये. हे 'पर्यायी विकास प्रतिमान'चे एक व्यवच्छेदक लक्षण आहे असे म्हणता येईल.

पुढे असे की 'शोषण' ही संकल्पना आजच्या बदलत्या परिस्थितीत पुन्हा तपासणे गरजेचे आहे, असे मला वाटते. आता बदललेल्या परिस्थितीत शोषणाची नवी रूपे निर्माण झाली असण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये वित्त भांडवलाला प्राप्त झालेले महत्त्व व त्यामधून अविकसित–अर्धविकसित देशांकडून विकसित देशांकडे वेगाने होणारे क्रयशक्तीचे स्थानांतर (transfer). अंतिम विश्लेषणामध्ये ही 'शोषणा'चीच प्रक्रिया आहे; व वित्त भांडवलाला आलेल्या महत्त्वामुळे 'शोषणा'ला मिळालेले हे नवीन रूप आहे. वित्तभांडवलाच्या व्यवहारात उत्पादन प्रक्रियेचे अस्तित्व नसल्याने या शोषणाला उत्पादनसंबंधांचा पूर्वीसारखा आधार मिळणार नाही. त्यामुळे या सर्व प्रक्रियेमध्ये 'शोषणा'चे नवे रूप आपण तपासले पाहिजे व हे शोषण टाळण्यासाठी 'पर्यायी प्रतिमान' कसे असले पाहिजे, याचा विचार करावा लागेल.

गेल्या तीन दशकांमध्ये उत्पादन व्यवस्था व तंत्रविज्ञान यामध्ये झालेल्या आमूलाग्र बदलांमुळे 'उत्पादन संबंध' (production relations) बदललेले आहेत. त्यांच्या नवीन स्वरूपाचा शोध घ्यावा लागेल. पूर्वीचा भांडवलदार व कामगार असे सरळ सोपे उत्पादनसंबंध राहिलेले नाहीत. एका बाजूला, 'भांडवलदार' या कोटीचे (category) स्वरूप बदलले आहे. दुसऱ्या बाजूला, 'निळ्या कॉलर'चा कामगार वर्ग जवळ जवळ अस्तंगत झाला आहे. व त्या जागी 'ज्ञानाधारित' अतिकुशल

मनुष्यसमूह ('संगणकज्ञ') उदयास आला आहे; व उरलेला अर्धकुशल, अकुशल मनुष्यसमूह अशा प्रकारच्या गटांमध्ये विभागला आहे. या मनुष्यसमूहांना पूर्वीचा 'वर्ग' ही कोटी लावणे सयुक्तिक ठरणार नाही. यामुळे २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील भांडवलशाहीच्या रूपाशी जोडलेली 'वर्ग' ही संकल्पना व त्या आधाराने उत्पन्नाच्या विभागणीचे केलेले विश्लेषण, नवीन परिस्थितीत लागू होणार नाही. नवभांडवलशाहीचे परिणाम हे पूर्वीच्या भांडवलशाहीच्या परिणामांपेक्षा अधिक दुःसह आहेत. हे खरे असले तरी त्याची कारणमीमांसा करताना पूर्वीच्या 'शोषण', 'वर्ग', 'उत्पादनसंबंध' यांसारख्या संकल्पना पुन्हा तपासून त्यांची नवी रूपे समजून घ्यावी लागतील. तरच नवभांडवलशाहीचे परिणाम अधिक दुःसह का, हे सांगता येईल.

तसेच, सध्याच्या परिस्थितीत बहुसंख्य लोकांची आर्थिक हलाखी, निसर्गाचे दोहन वगैरेला भांडवलशाहीने उपयोजिलेले तंत्रविज्ञान किती प्रमाणात जबाबदार आहे, हे पाहिले पाहिजे; व नंतर 'पर्यायी विकास प्रतिमाना'मध्ये तंत्रविज्ञानाचा व 'उद्योगा'च्या आकारमानाचा (size) पुनश्च विचार करणे आवश्यक आहे.

सध्याच्या व्यवस्थेमधील निसर्गाच्या ऱ्हासाचा विचार करताना मुळात काही अर्थशास्त्रीय तत्त्वे/संकल्पनांचा (उदा. उत्पादन, व्यय) पुनर्विचार आवश्यक होईल.

थोडक्यात, सध्याच्या व्यवस्थेच्या गुणदोषांचे विश्लेषण करणाऱ्या ज्या मूळ संकल्पना आहेत त्यांचे पुनर्वाचन करणे, हा आपल्या चौकशीचा (inquiry) पहिला टप्पा असेल, असे मला वाटते. तो ओलांडल्यावर त्या संदर्भात 'पर्यायी विकास प्रतिमाना'चा व्यवहार (रीती) कसा असेल, त्या प्रतिमानाची घडण कशी असावी, याबाबतीची वेगळी चर्चा करणे आवश्यक होईल.

❑❑❑❑

---

# जनाचे अनुभव पुसतां : एक टिपण

(डॉ. माधव दातार)

डॉ. मिलिंद बोकील यांचे हे नवे पुस्तक त्यांच्या इतर पुस्तकांप्रमाणेच मराठी वाङ्.मयात पडलेली महत्वाची भर म्हणून ओळखले जाईल. हे लिखाण वेगळ्या विषयांवरील निराळ्या पद्धतीने केलेले आहे म्हणूनच नव्हे तर हे लिखाण मराठीत करण्यामागे लेखकाचा विशिष्ट दृष्टिकोन आहे; लोकांचे अनुभव काय आहेत यांचा पद्धतशीर मागोवा घेऊन जे आपणांस सापडले ते लोकांना (अर्थातच त्यांच्या भाषेत) कळावे यामुळे हे लिखाण जाणीवपूर्वक लोकांच्या भाषेत केले आहे. वास्तवातील विविध समस्यांचा समाजशास्त्रीय पद्धतीने अभ्यास करताना लोकांची जाणीव, त्यांचा समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण यांत बदल होणे महत्त्वाचे असते. त्या दृष्टीने जनांचे हे अनुभव लोकांसमोर मांडणे आवश्यक बनते. म्हणून हे पुस्तक मराठीत असण्यांइतकेच या पुस्तकाबाबत चर्चा घडवून आणणे हेही महत्त्वाचे व स्वागतार्ह आहे.

या पुस्तकाला प्रा.स.ह.देशपांडे यांची विवेचक प्रस्तावना लाभली आहे व त्यांनी पुस्तकासंदर्भात या पुस्तकाची वैशिष्ट्ये व या पुस्तकाबाबत जे विवक्षित व व्यापक मुद्दे उपस्थित होतात त्यांची सविस्तर चर्चा केली आहे. उदा. देशपांडे यांचा कोसबाडला आदिवासी विकासाचे जे काम झाले त्याच्याशी प्रदीर्घ परिचय असल्याने तेथल्या अनुभवाच्या संदर्भात बोर्डीमधील बोकीलांच्या अनुभवाचा विचार करतात. तद्वतच आर्थिक विकासात औद्योगीकरण, नागरिकीकरण यांची अपरिहार्यता या सारख्या व्यापक प्रश्नांचाही ऊहापोह करतात. या पुस्तकावर काही लिहिण्याच्या उद्देशाने ज्यांनी प्रथम पुस्तक वाचून नंतर प्रस्तावना वाचली त्यांना आपल्या डोक्यात पुस्तक वाचताना जे विचार आले, जे मुद्दे विवादास्पद वाटले ते सर्व प्रस्तावनेत विचारात घेतले गेले आहेत असा (काहीसा निरुत्साही बनवणारा !) अनुभव बहुतेकांना आला असेल.

त्यामुळे या पुस्तकाबाबत काही मुद्दे मांडताना देशपांडे यांच्या विचारांचा अनुवाद/प्रतिवाद होण्याची शक्यता टाळण्याचा, काहीसा कठीण प्रयत्न केला आहे.

**बोकील व अवचट**

मराठीत या स्वरुपाचे लिखाण आणखी कुणी केले असा विचार करायचा तर अनिल अवचट यांचा उल्लेख करावा लागेल. हे विधान ढोबळपणे केले आहे कारण बोकील व अवचट यांच्या लिखाणातील साम्य/भेद स्थळे नेमकेपणाने दर्शविणे असा हेतू नाही. अवचट यांचे काही लिखाण आत्मचरित्रात्मक किंवा विवक्षित व्यक्तींचा परिचय करुन देणारे असे आहे. या लिखाणातही सभोवतालचे व्यापक संदर्भ उलगडत असतातच तरी पण विवक्षित समस्यांचा वेध घेणारे त्यांचे लिखाण या संदर्भात विचारांत घेता येते. विविध सामाजिक प्रश्नांचा स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण ललित शैलीत धांडोळा घेणे हे या दोहोंमधील प्रमुख साम्य मान्य होण्यास अडचण नसावी. ज्या समस्यांचा विचार करायचा त्या विवक्षित, स्थळ काळांचे संदर्भ असणाऱ्या असणे व त्यांचा विचार करताना त्यांच्या विविध (सामाजिक, मानवी) पैलूंचा विचार करणे ही या दोघांची खास वैशिष्ट्ये आहेत. अवचट यांच्यापेक्षा बोकील यांची अभ्यासाची पद्धत कदाचित जास्त औपचारिक ठरेल. ज्या प्रश्नांवर बोकील लिखाण करतात त्यांची तपशीलवार मोजणी, पाहणी बोकील यांनी केली आहे वा अशा प्रक्रियेशी त्यांचा जवळचा संबंध आलेला आहे. त्यामुळे ज्या प्रश्नांबाबत ते लिहितात त्याबद्दल

आवश्यक तेथे नेमके सांख्यिकीय परिमाणही पुरवतात. ज्या समस्यांचा ऊहापोह केलेला असतो त्या विवक्षित (micro) स्वरूपात विविक्षित स्थळ काळाची चौकट असलेल्या असल्या तरी त्यांना व्यापक (macro) संदर्भही असतोच. ज्या समस्यांचा ते वेध घेतात त्यात समूह जीवनावरील परिणामांचा संदर्भ महत्त्वाचा असल्याने कदाचित बोकील स्वत: आपल्या या लिखाणाला समाजशास्त्रीय मानतात. पण लोकसमूहांसमोरील कोणत्याही वर्तमान समस्या विचारात घेताना त्यांचे आर्थिक परिमाणही महत्वाचे ठरते त्यामुळे या लिखाणाला आर्थिक समस्यांचा बहुआयामी आढावा असेही म्हणता येईल. Development या शब्दाचा अर्थ सामान्यपणे विकास वा प्रगती असा केला जातो. पण या शब्दाला घडामोडी (Developments) असाही एक अर्थ आहे. भूकंप, नवा कारखाना, वन रक्षण, समाईक मालकीच्या जमिनीवरील आक्रमणे, फलोत्पादनाचा प्रसार व पाणी वाटपातील अनुभव यासारख्या घटनांचे, धोरणांचे विविक्षित जनसमूहांवर काय परिणाम होतात यांबाबतचे बोकीलांचे हे लिखाण आर्थिक विकासाबाबतचे आहे असे म्हणण्याऐवजी चालू घडामोडींच्या आर्थिक व सामाजिक परिणामांविषयी आहे असे म्हणणे जास्त सयुक्तिक ठरावे.

**विवक्षित व सामान्य**

पण या लिखाणाचे वैशिष्ट्य विवक्षित समस्यांचा व्यापक संदर्भात घेतलेला आढावा असे असल्याने या लिखाणावर प्रतिक्रिया देणे हे कठीण होऊन बसते! या लिखाणावर उपयुक्त प्रतिक्रिया देण्यासाठी एकतर त्या विवक्षित समस्येशी पूर्व परिचय असला पाहिजे किंवा तशाच स्वरूपाच्या इतर ठिकाणच्या समस्यांबाबत जो विचार झाला आहे वा होत आहे याची साद्यंत माहिती असायलाच हवी. पण याचा अर्थ इतरांना या लिखाणांचा उपयोग होणार नाही असे नाही. बोकील यांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे लिखाण केले असले तरी समस्यांचे इतर राजकीय पैलू दुर्लक्षिले नसल्याने त्यांच्या या लिखाणाचा उपयोग इतर शास्त्रांच्या अभ्यासकांना होऊ शकतो. या लिखाणात ज्या विविक्षित समस्यांचा ते अभ्यास करतात त्या संदर्भात काही सैध्दान्तिक भूमिकांचा पडताळा पाहता येईल. उदा. बोकील यांनी ज्या विवक्षित समस्यांचे विवेचन केले आहे तेथे शासनाची जी वास्तविक भूमिका होती ती शासनाच्या भूमिकेबाबत ज्या सैद्धान्तिक अपेक्षा असतात त्यांच्याशी मिळती जुळती होती का? याचा विचार करता येतो. उलटपक्षी दिलेल्या वास्तविक समस्येची सोडवणूक होण्यासाठी शासनाने विवक्षित भूमिका घेणे अभिप्रेत असेल तर ते सैद्धान्तिक चौकटीत शक्य आहे असा विचार शक्य आहे. हे विविध विद्याशाखांबाबत शक्य आहे.

**शासन व बाजारपेठ**

आर्थिक विकासाच्या संदर्भात शासन व बाजारपेठ यांच्या भूमिकांविषयी भिन्न मते मांडली जातात. बाजारपेठेवर सर्व निर्णय सोपवून दिले पाहिजेत कारण तसे करणे कार्यक्षम ठरेल, शासन सर्व निर्णय घेऊ शकणार नाही, शासनाची धोरणे हितसंबंधीय स्वहिताचा विचार करुनच ठरवतील अशी एक बाजू असते. उलटपक्षी बाजारपेठ स्पर्धात्मक नसते, त्या परिपूर्ण नसतात त्यामुळे शासनाच्या योग्य हस्तक्षेपाने बाजारपेठांची कार्यक्षमता वाढेल, विशेषत: दुर्बल गटांच्या हित रक्षणासाठी बाजार व्यवस्थेवर अवलंबून राहता येणार नाही व बाजारपेठांना जोखीम हाताळणे कठीण जात असल्याने पुष्कळ नव्या प्रकल्पांत निदान सुरुवातीला शासनाला पुढाकार घ्यावा लागेल ही दुसरी बाजू. अलीकडच्या काळात बाजार विरुद्ध शासन या पद्धतीने विचार न करता शासनाची भूमिका बाजारपेठांचे संवर्धन करण्याची, त्यांचा विकास करण्याबरोबरच त्यांचे नियंत्रण करण्याची असायला हवी असा तिसरा विचार प्रवाह पुढे येत आहे. या सर्व तात्विक चर्चेत शासनाचा हस्तक्षेप काय स्वरूपाची असेल, तो करताना काय अडचणी येतील वा तशी कृती करण्याची शासनाची इच्छा/तयारी असेल का या मुद्दयांचा किंवा बाजारपेठांवर अवलंबून राहायचे तर त्या अस्तित्वात आहेत का, त्या स्पर्धात्मक आहेत का या प्रश्नांचा विचार विवक्षित परिस्थितीचा संदर्भ नसल्याने सामान्यत: दुर्लक्षित राहातो. बोकील ज्या समस्यांचा विचार करतात त्यासंदर्भात शासन वि. बाजार या प्रश्नांचा अधिक डोळस विचार करणे शक्य बनते.

चर्चिलेल्या बहुतेक समस्यांसंदर्भात शासकीय हस्तक्षेपाची गरज (चिकू बागा प्रकल्पाचा एक अपवाद वगळता) शासनासकट सर्वांना मान्य होती व इस्पात प्रकल्पाचा (भरती ओहोटी) अपवाद वगळता शासनाचा हस्तक्षेप योग्य त्या दिशेने योग्य त्या प्रमाणात नसला तरी झाला होता. पण आवश्यक त्या हस्तक्षेपाचे स्वरुप खूप भिन्न स्वरूपाचे होते. पुष्कळदा शासकीय धोरणांना बाजार हा पर्यायच उपलब्ध नव्हता. बहुतेक वेळा आवश्यक तो हस्तक्षेप/मदत स्वयंसेवी संस्था व त्यांचे निरलसपणे काम करणारे कार्यकर्ते यांनी केला. स्वयंसेवी संस्थाचे कार्य व सरकारी धोरणे ही सहसा परस्परांना पर्यायी असत नाहीत तर सरकारी धोरणांची परिणामकारकता/उपयुक्तता वाढविण्यात या संस्था मदत करतात किंवा असे की जे काम शासनाला करताच येणार नाही. भूकंपग्रस्त विधवांना जमीन कसवणुकीत जी मदत स्त्री आधार केन्द्राने केली ती शासकीय यंत्रणेला करणे कठीण गेले असते. सरकारने फार तर आर्थिक सहाय्य दिले असते, शेतावर काम करण्यासाठी सरकारी खर्चाने व्यवस्थापक नेमले असते तरी असा हस्तक्षेप यशस्वी ठरला असता काय हा प्रश्न आहे. किंवा यशस्वी ठरला नसता असे खार जमिनी विकास कार्यक्रमावरून दिसून येते. जोवर आदिवासी सामुदायिकरीत्या हे काम करत असत तोवर ते व्यवस्थित चालत होते पण ही जबाबदारी सरकारने घेतली व कंत्राटी पद्धतीने हे काम होऊ लागल्यावर यातील लोकांचा सहभाग थांबला व खार जमिनीत पाणी घुसण्याचे प्रकार वाढले. खार जमिनीचा विकास करण्याची जबाबदारी स्वत:कडे घेण्याचे काम सरकारने अर्थातच लोकांच्या कल्याणासाठी घेतले असणार पण सरकारचा हस्तक्षेप ज्या रीतीने झाला त्यामुळे खार जमिनीचे व्यवस्थापन तर बिघडलेच मग याद्वारे कल्याण कुणाचे झाले ? सरकारी धोरणांचा हा परिणाम अनपेक्षित होता का असेच होणे अपेक्षित होते ?

जमिनीसाठीच्या लढाईत समाईक जमीनीवरील अतिक्रमणे नियमित करण्याचा सरकारचा निर्णय खूप कालावधीनंतर घेतला गेला. प्रथम १९६० साली दोन जिल्ह्यांमधील वनजमिनीपुरता मर्यादित असणारा निर्णय १९७२ साली संपूर्ण राज्यासाठी वन जमिनी व गायराने या दोहोंबाबत अंमलात आणला गेला. नंतर परत १९७९, १९९१ या वर्षीही अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय घेणे व त्याची अंमलबजावणी याला खूपच वेळ लागला. १९७९ मध्ये अतिक्रमणे नियमित करताना फायदा दलित, भूमिहीन यांना व ठराविक मर्यादेत मिळेल असा बदल करण्यात आला. १९६० मध्ये जे धोरण प्रायोगिक तत्त्वावर अंमलात आणले गेले त्याचा व्यापक उपयोग करण्यात व या धोरणांचे फायदे कमकुवत घटकांपुरतेच मर्यादित राहावे असे बदल होइपर्यंत १७ वर्षे उलटली. समाईक जमिनीचा आदिवासी विकासासाठी उपयोग करायचे ठरल्यानंतरही अतिक्रमणे नियमित करण्याच्या मार्गानेच याची अंमलबजावणी का होत राहिली हे समजणे कठीण आहे. किंबहुना झालेली अतिक्रमणे नियमित करून लोकप्रियता मिळविण्याचा सरकारचा प्रयत्न असे यांचे कारण असू शकते. कसेही असले तरी सरकारी धोरणे आखली जाऊन त्यांची अंमलबजावणी होईपर्यंत बऱ्याचदा खूप काळ जातो हा पण एक महत्वाचा धडा मिळतो.

**औद्योगिक प्रकल्प व पर्यावरण**

इस्पात प्रकल्पाच्या संदर्भात शासनाच्या व कंपनीच्या भूमिकेविषयी बोकीलांनी तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त केले आहे व त्याला प्रस्तावनाकार स.ह. देशपांडे यांनीही अनुमोदन दिले आहे. बोकील यांचा मुख्य आक्षेप खाडीमधील मासेमारी, आजूबाजूची भात जमीन नष्ट करून कारखाना उभा करण्यावर आहे. याचा एक प्रतिवाद देशपांडे यांनी केला आहे. पण एवढा मूलभूत आक्षेप बाजूला ठेवला तरी मोठ्या बोटींची वाहतूक खाडीत सुरू झाल्यावर खाडीतील मासे जीवनावर व मासेमारी करण्यावर कोणते विपरीत परिणाम होतील याची पूर्व कल्पना कंपनीने गावकऱ्यांना दिली नव्हती, त्यांना या बाबत जाणून बूजून अंधारात ठेवण्यात आले. कंपनीला सरकारने पर्यावरणविषयक ज्या परवानग्या व ना–हरकत प्रमाण पत्रे दिली होती ती फारसा विचार न करता दिली होती किंवा या प्रकरणात सरकारने जाणून बूजून स्थानिक लोकांच्या हितांचा बळी दिला असावा. कंपनी अधिकारी, राजकारणी व नोकरशहा यांनी परस्पर संगनमताने कंपनीचे हित राखले असावे असेही बोकील यांनी सूचित केले आहे. या प्रकरणात परस्पर संगनमताने गैर प्रकार झाले असतील तर हे प्रकरण फारच वेगळे बनते. पण खाडीत मोठ्या बोटींची वाहतूक सुरू झाल्यावर मासेमारीवर नेमका काय परिणाम होईल त्याची सरकारी अधिकारी व राजकारणी यांना पूर्व कल्पना नसणे सहज शक्य आहे. कंपनीबाबत असे विधान करणे एकतर धाडसाचे वाटेल किंवा पक्षपाताचे. पण कंपनीचा जो प्रकल्प होता, जे तंत्रज्ञान वापरले जाणार होते त्यांचा या समस्येशी थेट संबंध नव्हता. धरमतरच्या खाडीतील माशांची पैदास, वाढ व मासेमारी प्रक्रिया यावर मोठ्या बोटींचा काय परिणाम होईल याची पूर्वकल्पना केवळ कंपनीस होती व ती माहिती कंपनीने दडवून ठेवली असे गृहीत धरणे सोपे असेल पण रास्त आहे का? मासेमारीवर काय विपरीत परिणाम होतील, खार जमिनीच्या बांध–बंदिस्तीवर काय परिणाम होईल यांची पूर्व कल्पना कोणालाच नव्हती. शासनाची भूमिका औद्योगीकरणाला अनुकूल असल्याने (व ही भूमिका एकंदरीत लोकांच्या हिताची आहे असाही विश्वास (किंवा दावा) असल्याने) संशयाचा फायदा प्रकल्पाला (पक्षी कंपनीला) मिळाला असणे सहज शक्य आहे. असे प्रकार होणे भविष्यात टाळायचे असेल तर स्वयंसेवी संस्थांना जागल्याची भूमिका निभवावी लागेल. शासनाला याबाबत काही खास करता येईल असे मानता येणार नाही. Innovative विचार पद्धती व त्वरित निर्णय या गोष्टी शासन प्रत्यक्षात उतरवणे किती कठीण असते याची कल्पना बोकीलांच्या लिखाणावरूनही येईल. अल्पशिक्षित, गरीब ग्रामस्थ विरुद्ध शासन व बडी कंपनी असे प्रकरण असले म्हणजे ग्रामस्थांच्या हितरक्षणाचा प्रश्न बांका बनतो पण सरकार वा कंपनी यांना सर्वज्ञानी समजणे वास्तवाशी कितपत मिळते जुळते ठरेल ?

औद्योगिक प्रकल्पांचा पर्यावरण व स्थानिक लोकांचे जीवन यावर काय परिणाम होईल यांचे पूर्व अनुमान करणे कसे कठीण आहे हा एक मुद्दा झालाच. विशेषत: प्रकल्पाचे मूल्यमापन करताना या घटकांची रुपये/पैशात मोजणी करणे आवश्यक बनते. हा सर्व परिणाम प्रकल्पाचा (सामाजिक) खर्च मानून त्याचे लाभ : खर्च गुणोत्तर काढावे अशी भूमिका घेता येते. याचा परिणाम म्हणून निदान काही प्रकल्प हा सामाजिक खर्च भरून काढण्यास अक्षम ठरल्याने उभारता येणार नाहीत. या ठिकाणी हे नमूद केले पाहिजे की प्रकल्पांचा सामाजिक लाभ खर्च भरून काढण्याची पद्धत आता जवळ जवळ थांबली आहे. पर्यावरण विषयक विचारही सक्षम यंत्रणेचे ना हरकत प्रमाण पत्र मिळवण्यापुरता मर्यादित बनतो. प्रकल्पाची निवड मुख्यत: तिची नफा मिळवण्याची क्षमता या निकषावर केली जाते.

सामाजिक लाभ खर्च यांचा विचार आवश्यक मानला तरी सामाजिक खर्चाची जबाबदारी खाजगी कंपनीवर टाकावी का हा भार समाजाने (पक्षी शासनाने) उचलावा याचाही विचार करायला पाहिजे. हा भार कंपनीने उचलावा असे ठरले तर ते सर्व राज्यांनी मान्य करायला हवे नसता हा भार काही राज्य सरकारे उचलण्याची तयारी दर्शवून प्रकल्प आपापल्या राज्यांत आकृष्ट करण्याचे प्रयत्न करण्याची शक्यता आहे. प्रकल्पाने सामाजिक खर्च विचारांत घ्यावे व अशा खर्चाचा भार कंपनीने उचलावा का इतर कोणी हे स्वतंत्र प्रश्न आहेत व त्यांचा तसाच विचार करायला हवा.

पाणी वाटपाच्या प्रयत्नांत सरकारी हस्तक्षेपाला फारसा वाव नव्हता तसाच चिकू लागवडीचा विस्तार वाढविण्यातही. पण या दोन्ही ठिकाणी संस्थागत प्रयत्न महत्वाचे ठरले. या बाबतीतले यश इतर ठिकाणी प्रत्यक्षात आणता येईल का हे तेथील कार्यकर्ते व संस्थांचे जाळे यावर अवलंबून राहील. पाणीवाटपाच्या कामात उद्योजकीय वृत्तीबरोबरच सहकार्य

आवश्यक असल्याने सामूहिक प्रयत्न होते तेथे यश मिळाले असे दिसते. या कामात ज्या व्यक्तींनी पुढाकार घेतला त्यांचे समूहाचे नेतृत्त्व करणे व त्यातून मिळणारे सामाजिक महत्त्व मिळवणे असा दृष्टिकोन असणे सहज शक्य आहे. चिकू उत्पादनवाढीत ज्या व्यक्ती व संस्थांनी ही लागवड आदिवासीत लोकप्रिय करण्याचे प्रयत्न केले त्यांना जसे आहे तसेच बाजारपेठेचे सान्निध्य व वाहतुकीची व्यवस्था या घटकांचे महत्व नाकारता येत नाही. चिकू पाठविण्यासाठी लागणाऱ्या वेताच्या परड्यांची निर्मिती होणे व विक्री व्यवस्थेत परराज्यातील विक्रेत्यांचे महत्त्वपूर्ण स्थान यातून बाजारपेठेद्वारे होणारे संघटन दिसून येते.

मात्र निरलसपणे स्वयंसेवी संस्था व कार्यकर्ते यांच्यामुळे बाजार व शासन या दोन्हींचे कार्य सुधारण्यास मदत होऊ शकते असे बोकील यांच्या लिखाणांतून दिसते.

❑❑❑❑

---

# A Note on Alternate Development Model

(Prof. R. K. Patil)

(Apology for writing in English; necessitated owing to some computer problems).

I subscribe to the philosophical arguments developed in A.Sen's book ' Development as Freedom. In the book he uses 'freedoms' (i.e. in plural) through out. That is significant. My views were developed before I read Sen's book; but he has systemised the conceptual framework. Way back, in the nineties, when we took up organizing farmers in irrigated area for water management, it was a developmental measure to increase production by removing bureaucratic mismanagement. However, I looked upon the project as a means of empowering the weak farmers and creating self-confidence (i.e. freedom in an ultimate sense - परम अर्थ). Earlier the farmers were so afraid of the bureaucracy that they would not speak to Executive Engineer except in a servile, subservient mode.

After our intervention, a couple of years later, when they faced a hostile bureaucracy, they told us that they are approaching High Court and would like to sue Government. I consider this emboldenment arising out of tasting the fruits of freedom, should be the aim/objective/goal of development. In view of this, I concur with SHD's concept of development and its relationship with 'humanity' or 'human values'. SW wants to add 'ethical' values. I think this is not necessary, as it is covered under the rubric of human values. And incidentally what is ethics or ethical values? Within ethics, we have Hindu, Muslim, Christian values. The question is whose ethics? Polygamy as sanctioned by Islam is a human value? So let us not narrow human values with circumscription of ethics.

2. SW introduces the concept of alternate development strategy. (पर्यायी विकास नीती) I am afraid, that as opposed to urban-industrial model, there is not one alternate but a spectrum of alternatives - ranging from acceptance of all the 'good' aspects of Western Model <u>sans</u> the inequality, injustice and other deficiencies to Dicholi lifestyle of shepherds so vividly described by Dr. Bokil. Within this spectrum, we would have models proposed by Gandhians, Sarvodayies, Medha Patkar, Leftists, Utopians, Dr. Patankar, etc. and lest I I forget Dr. SW. Unfortunately, none of the alternates in the spectrum are fully articulated. While there is a lot of literature on Western model, and also on failed Soviet model, burgeoning Chinese mode, there is a complete lack of specification of other models, especially the operationalising aspects. In essence, they are reactive, totally devoid of any experience.

3. Then the question of चंगळ. All the three discussants have used the word in a pejorative way. The dictionary meaning of the word is abundance, profusion, overflowing plenty, prosperity (vide Mollesworth's dictionary). In Marathi it means वैपुल्य, समृद्धी, सुकाळ, संपन्नता, रेलचेल, सुबत्ता. Viewed this way, I subscribe to चंगळवाद. In fact, in my student days, 'readings' on socialism emphasized that the aim of socialist state is to bring abundance, plenty to all segments of the society. In 1986, when our Team visited Beijing, we requested our hosts that visits to couple of families may be arranged for us. I knew that this would not happen, as we has seen hoardings on a quite few roads outside. Beijing saying 'Foreigners forbidden' beyond this limit. So, we were overjoyed when they took us to the house of a supervisor, who belonged to middle class. The house was modest. When asked what change he perceived after the new regime came in, he promptly replied that the wine which he served us was unavailable

for a person of his modest means before Revolution. In other words, now there is abundance and plenty. Our Marathi intellectuals may call this as चंगळ.

Another fact is worth noting. On one Sunday, we visited a public garden which was full of visitors - around 600/700 persons. To my surprise, I found about 35 to 40 percent were carrying cameras, which to my upbringing was a luxury. On inquiry, I found that with rising incomes (and surpluses) the only way to enjoy is photography (cheap, relative to TV and other electronic gadgets). So this is plenty shared by the majority - you may consider it as luxury but it is not.

The raison d'etre of development is to create and ensure plenty. If as a result of iniquitous distribution, the system is abused and has deleterious social consequences, the solution is not to abandon 'plenty', but to devise instruments to curb the pernicious tendency. (I have written on this subject in आजचा सुधारक of December, 2002; this may be referred).

4. **Equity and Development**

SHD's argument that equity considerations limit the development process. Yes, if you look only for short term period. In the long run, development process gets accelerated if pursued through equity. (example. China - Contrast with Brazil). Sen's book clarifies this point lucidly. Equity does not constrain or limit 'development. What limits in the Indian context is the abhorrent inequity supported by our ruling classes.

5. **Environment and Development**. There is a close relationship between the two as amplified in Bokil's book. As suggested by SHD, one has to consider cost - benefit nexus - not just in economic and technical terms, but from a longer perspective - in terms of eco-systems. It is wrong to say that there should not be any change; we should study what change, its consequences and alternatives. Even within environmentalists there is a spectrum ranging from Maneka Gandhi, Bahuguna to Birlas and Tatas!

6. **Urbanization and the inevitable of adverse effects.**

In the present stage of development (and deteriorating resource position) not only urbanization inevitable, but so also its दारूण, बकाल character. Inevitable in the sense that under the given political system it is so. It is avoidable, but this requires resources but the present political leadership is unable to commit. So SW is right in his arguments, but as he later admits that the proponents of alternate strategy have very weak (say no) political leverage. The parallel would be: World could be free of atomic weapons, if all countries having these, destroy them. Thus, atomic wars are avoidable in principle; but in practice the danger looms around.

7. **Productivity of Natural Resources.**

I am inclined to agree with SW. However, productivity of organic farming is yet to be proved. But experiments show some breakthrough.

It is very difficult to disagree on the last two sections of the SW's note. While agreeing to the need of EGS, I reject the thesis that it should be institutionalized through land army. The aim of EGS should be to abolish it. We have to develop economic system in such a way that few persons would be forced to join EGS.

The conclusion section is a balanced one. However, I do not find an answer to the serious questions posed by Dr. Bokil on his essay on प्राण्यांना अभय व माणसांना वनवास. That dilemma illustrates the embarrassment faced by advocates of Western model of development. In a broad framework of development, I am convinced that widening and deepening of freedoms - personal, social, political, cultural - should be the core of development. Hence it behaves to take into considerations the views of the persons affected. Participation - active - is the key to development process and not politico-bureaucratic imposition.

❑❑❑❑

**डॉ. चि. मो. पंडित यांनी हे टिपण १५ डिसेंबरच्या चर्चासत्राकरिता पाठविले होते. श्री. दिवाकर मोहनी यांच्या 'आजचा सुधारक ' मधील 'खादीच्या' लेखनाच्या संदर्भात हे टिपण डॉ. पंडित यांनी तयार केले आहे.**

श्री दिवाकर मोहनी यांचे 'खादीच्या' अनुषंगाने आलेले लिखाण हे एका अर्थाने उत्पादन, रोजगारी, मानवी इ. संकल्पनांवरचे मुक्त चिंतन आहे. एक सलग आर्थिक कार्यक्रमाच्या आराखड्याचे त्याचे स्वरूप नाही किंवा आजचे घडीला येऊ घातलेल्या 'जागतिकीकरणाशी' आपल्या देशातील बहुजनांचे हित लक्षात घेऊन कसे जुळवून घ्यायचे यावरही त्यात फारसे हाती लागत नाही. मग या लिखाणाचे प्रयोजन काय? 'आजचा सुधारकने' तीन आघाड्या उघडल्या आहेत. १. देवावरच्या विश्वासाच्या विरोधात. २. अर्थदेवतेने आमच्या आयुष्यातील स्थान तपासण्याचे आणि ३. आजच्या आमच्या कुटुंब व्यवस्थेविरुद्धची.

यात एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. आघाडी १ आणि ३ ही ठाम स्वरूपाची, अमुक एकाच्या विरोधात आहे. त्यामुळे त्याबाबतीत पूर्वपक्ष, उत्तरपक्ष करणे शक्य आहे. प्रस्तुत अर्थदेवतेचे आमच्या आयुष्यातील स्थान तपासण्याचे असल्यामुळे काही संकल्पना ते वाचकांपुढे विचारार्थ मांडतात. त्यासाठी ते तीन सूत्रे पायाभूत धरतात.

१) मानवी आस ही अभावातून विभवाकडे जाण्याची आहे. त्यासाठी सातत्याने वस्तूंचा पुरवठा आणि वैविध्य वाढवत नेणे आवश्यक असते.

२) वरील काम हे एकट्या दुकट्याचे, स्वावलंबनाचे नसून परस्परावलंबनानेच साध्य होणारे आहे.

३) केवळ माणसांचे वा जनावरांचे शारीरिक श्रम वापरले तर उत्पादनाच्या विभवावर फार मर्यादा येतात, अतिरिक्त उत्पादन होऊ शकत नाही आणि मानव जीवन शैली कुंठित होते. म्हणून ज्ञान मिळविणे, शारीरिक श्रमाला यांत्रिक पर्याय शोधणे, बाहेरील ऊर्जा वापरणे, श्रमविभागणीचे तत्त्व स्वीकारणे या सर्व गोष्टी कराव्या लागतात आणि त्यासाठी परस्परावलंबन अपरिहार्य ठरते.

**यावर माझे म्हणणे असे :–**

● अभावाकडून विभवाकडे जाणे ही एकमेव प्रेरणा नसते. मूलभूत गरजा, आयुष्य जगावेसे वाटायला लावणाऱ्या सुखसोयी आणि चैन (ज्याला चंगळवाद म्हणता येईल) यात फरक आहे. ''आपले श्रम कमी करणे परंतू उपभोग कमी न होऊ देणे यालाच चंगळवाद म्हणावयाचे ना?'' असा प्रश्न मोहनी विचारतात. गरज नसताना उपभोग वाढवत नेणे याला चंगळवाद म्हणायचे. कोका कोला, फास्ट फूड, दागदागिन्यांचा सोस ...अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

म्हणजे मानसिक गरजा, सामाजिक प्रतिष्ठेच्या गरजा, ...असे फाटे फुटतील आणि यात परस्परावलंबापेक्षा व्यक्तित्ववादाकडे जावे लागेल. उत्पादनवाद ही एकमेव समस्या नाही. माणूस सुखाच्या शोधात असतो.

● शिवाय परस्परावलंबन ही वाढीची पूर्व अट असली तरी ती तेवढी पुरेशी नसते. खेडेगावात भरपूर परस्परावलंबन असूनही उत्पादन वाढ झाली नाही याला कारणे दोन :–

१) समृद्धीची पण आस लागते. विरागी जीवनाकडे पाहात फिरविणारी मनोवृत्ती उपयोगी पडत नाही.

२) परस्परावलंबन नव्हे तर सहेतुक, सक्रिय संघटन ही उत्पादन वाढीची पूर्व अट आहे.

Science of resource management and organisation ही पाश्चात्त्य समाजाची खास देणगी आहे. या अर्थानी आपण भारतीय 'समाज' नसून 'जमाव' आहोत – आपापल्या वैयक्तिक मुक्तीच्या मागे लागलेला.

तेव्हा परस्परावलंबन – interdependance – की 'सहेतुक सहकार' Co-operation.

ज्या व्यापक अर्थाने मोहनी परस्परावलंबन ही संकल्पना राबवतात तिचे मानवीदेह आदर्श उदाहरण म्हणता येईल. पण इतका व्यापक अर्थ ग्राह्य धरला तर 'समाज' फार मोठा होऊ शकत नाही – संख्येनेही आणि प्रादेशिकही – प्राण्यांचे शरीर किंवा झाडांचे आकार मर्यादितच राहतात. (मोहन हिराभाई हिरालाल)

मोहनींच्या चर्चेत 'वितरण व्यवस्थेवर' काहीच नाही. असे वाटते की each according to his ability and each according to his need असे काहीसे त्यांना अभिप्रेत असावे. रोजगार – अकृत्रिम रोजगार – असो नसो सर्वांना समाजाने पोसले पाहिजे हा विचार स्वीकारणे कठीण आहे.

"When the number of persons willing to work under prevailing marketing wages excess the member of wage jobs available - there is unemployment" अशी बेकारीची/बेरोजगाराची व्याख्या आहे. यात अनेक बारकावे आहेत.

Under prevailing market wages हे कितपत वाजवी आहे? डॉक्टरने परिचारकाचा पगार घ्यायचा का, इंजिनिअरने ड्राफ्टस्मनचा? ऑस्ट्रेलियात जिथे dole दिला जातो तिथे सरकार "employment matching the persons' skill and knowhow" ला कटिबद्ध असते. असा रोजगार देईस्तोवर/ मिळेस्तोवर सरकार dole देते.

दुसरा मुद्दा 'जीवनवेतनाचा' (living wages) आहे. मागणी पुरवठ्याच्या तत्त्वाला धरून मिळणारे वेतन फारच कमी असेल तर कोण काम करेल? 'अहो तुम्ही म्हणता बेरोजगारी प्रचंड आहे, पण आम्हांला तर शेतावर कामाला माणसेच मिळत नाहीत. असे अनेक जण भाबडेपणाने म्हणतात. मुद्दा 'जीवनवेतनाचा' असतो.

इथे कोणी असा प्रश्न उपस्थित करेल की तुला डॉक्टर, अभियंता, प्राध्यापक व्हायला मी नव्हते सांगितले. मी फक्त संधी निर्माण करून दिली. पी.एच.डी. = प्राध्यापक हे तुझे समीकरण आहे. समाजाचे नव्हे.

''जो काम करील त्यालाच जेवणाचा हक्क'' हा विचार आमच्या डोक्यातून जितक्या लवकर काढून टाकू तितके बरे. आमची समाज रचना कशी पाहिजे? कोणी काम करीत असो की नसो – कोठल्याही लाचारीशिवाय रोटी–कपडा–मकान मिळायला पाहिजे. यावर मोहनींनी विस्तृतपणे मांडणी करावी. ऑस्ट्रेलियात dole मुळे ऐतखाऊ वृती इतकी वाढली आहे की उत्पादन आणि सेवा चालू करण्यासाठी परदेशातून माणसे आयात करावी लागताहेत. कुठल्यातरी प्रकारच्या शोषणाशिवाय हे त्या समाजाला कसे शक्य होते कळत नाही.

रोजगारीचा अर्थ keeping them engaged असा धरून भरमसाट कृत्रिम रोजगारी निर्माण झाली. पण keeping them productively engaged असं जरी म्हंटलं तरी संगीतकार, सांस्कृतिक उद्योगात, शिक्षण क्षेत्रात, सेवा क्षेत्रात (डॉक्टर) काम करणारांची उत्पादकता कशी मोजायची.

एका अर्थी आपण Statism चा Laisse Fair ला पर्याय स्वीकारला की हे सर्व प्रश्न उदभवतात.

मोहनींच्या मांडणीत बाजारपेठांचा फारसा उल्लेख नाही. मला दोन बाजारपेठांचा इथे उल्लेख करायचा आहे. वस्तुविनिमयाची व्यवस्था म्हणजे बाजारपेठ अशीच माझी समजूत होती. पण हे फार प्राथमिक स्वरूपाचे सुलभीकरण झाले. दोन मुख्य बाजारपेठा अस्तित्वात असतात.

Economic market :– यात उत्पादन, विक्री, वितरण, संपत्ती, (capital, उत्पादनाशी संबंधित प्रत्यक्ष साधने– इमारती, यंत्रसामग्री, खेळते भांडवल) अशा संकल्पना येतात. Free markets, Demand and Supply वगैरे आपण बोलतो. या बाजारपेठा समाजहिताच्या दृष्टीने कह्यात कशा ठेवायच्या यावर वैचारिक, आणि प्रत्यक्षात खूप प्रयोग झालेत. काही एक अंदाज निर्माण झालाय.

१) Financial market :– ही नवीन संकल्पना आहे. प्रचंड प्रमाणावर आर्थिक व्यवहार वाढल्यावर व्यवहारात 'मुद्रा, चलन' यांचीही मागणी तितकी प्रचंड झाली. या एवढ्या चलनाला सुवर्णाचे पाठबळ देणे अशक्यच होते आणि Gold Standard गेले.

आता Finance market, stock market, currency market, equity lending, credit expansion, undervalued / overvalued companies, collateral trading, forward trading, derivating trading, speculation---अशा अनेक गोष्टी असतात. त्यांना कसे ठेवायचे याचा अजून पुरेसा अनुभव कोणाकडेच नाहीये. शिवाय Finanacial capital अतिशय चंचल असते, अगदी विजेच्या वेगाने ते जिथे उत्तम संधी असते तिकडे धावते. It is not commited to anything, anybody but only to reward, profit.

या Financial market चे जागतिकीकरण झालेय. मात्र राजकीय आर्थिक व्यवहारांचे तसे जागतिकीकरण झालेले नाही. युरोपातील प्रयोग सतत अभ्यासायला हवा.

आर्थिक व्यवहाराबद्दल आणखी एक मुद्दा लक्षात घ्यावा लागेल. वैज्ञानिक दृष्टिकोनातून एक गोष्ट गृहीत असते. आपण ज्याचा अभ्यास करतो ती अभ्यासवस्तू self motivated नसते. एका अर्थाने हा प्रयोग एकतर्फी 'पूर्वनिश्चित तत्त्वावर' deterministic predictive असतो. अर्थव्यवहार हा Reflexive असतो. त्यामुळे इथे predictive फार कमी असते. सतत क्रिया–प्रतिक्रिया चालू असतात. स्थिर संदर्भ चौकटच गवसत नाही.

पुढील चर्चेसाठी आणिक काही मुद्दे सुचतात. :–

१. Voluntary simplicity असते का नसते ? तळेगावचा अनुभव

२. वाढते विपुल उत्पादन, वाढते विपुल टाकाऊ पदार्थ, आणि पर्यावरण

३. समता नव्हे समन्याय – अनेक गटातील, लिंग, दोन पिढ्यांतील.

४. वाढता फुरसतीचा वेळ आणि time pass.

❑❑❑❑

# काही त्रोटक विचार

श्री. रामदास भटकळ

पर्यायी विकासनीतीचा विचार करताना शाब्दिक पातळीवर काही अडचणी निर्माण होतात.

'सुखाचा शोध' म्हणजे जीवनमान वाढविणे इ. असे गृहीत धरले आहे. वास्तविक तो सुबत्तेचा शोध असतो.

औद्योगिक विकास, तांत्रिक विकास, आर्थिक विकास या संकल्पनांमध्ये 'विकास' शब्दाचा सकारात्मक अर्थ गृहीत धरला जातो. न–नैतिक पातळीवर नवीन शोध हा तांत्रिक घडामोडीतील एक टप्पा मानता येईल. एखादा तंत्रज्ञ न–नैतिक भूमिका घेऊन आपले संशोधन चालू ठेवू शकेल. परंतू, उदाहरणार्थ, पहिल्या महायुद्धातील बॉम्बपेक्षा दुसऱ्या महायुद्धातील अणुबॉम्बची क्षमता अधिक असल्यामुळे तो विकासाचा निदर्शक आहे असे सामाजिक पातळीवर म्हणता येणार नाही.

'इकॉनॉमिक रिफॉर्म्स' किंवा 'आर्थिक सुधारणा' ह्या विषयांच्या चर्चेतही उदारीकरण, वैश्वीकरण ह्या धोरणांचा 'सुधारणा' म्हणून निर्देश होत असतो. वास्तविक अनेक पर्यायी धोरणांपैकी ते एक असते. संदर्भानुसार ते श्रेयस्कर की प्रतिगामी हे ठरू शकते.

आता 'विकास', 'सुधारणा', 'प्रगती' या शब्दांचा अर्थ संकुचित झाला आहे. चर्चेत हे शब्द व्यापक अर्थाने घेतले जाऊ नयेत. म्हणजे पर्यावरणवादी 'विकासाच्या आड येतात' असा आरोप झाल्यास 'आम्ही ह्या विशिष्ट विकासाच्या विरोधात आहोत. एकूण विकासाच्या नव्हे' असे उत्तर ठामपणे देता येईल.

ह्या चर्चेसाठी घेण्यात आलेल्या विषयांसंबंधी निरनिराळ्या विचारवंतांनी आजवर मूलभूत पातळीवर विचार मांडले आहेत. उदाहरणार्थ तांत्रिक प्रगती आणि त्याला मानवी मन आणि समाज यांचा प्रतिसाद यात तफावत कशी असते हे टॉफरलने दाखविले आहे. अनेक वेळा एखादी प्रक्रिया चुकीची ठरते आणि त्यामुळे त्या चुकीच्या मार्गाने फार पुढे जाण्यापूर्वी मार्ग बदलता येणे आवश्यक वाटते. त्यामुळे 'स्मॉल इज ब्युटिफुल' ह्या बरोबरच 'स्मॉल स्टेप्स आर वाईज' ध्वनी निघतो.

भारताच्या संबंधात ह्या सर्व प्रश्नांचा विचार गांधींनी सर्वांगाने केला होता, असे वारंवार दिसून येते. ह्या चर्चेत एक अडचण मूलभूत गृहीतांचीच आहे.ऐहिक विकास म्हणजे मानवी सुखाची गुरुकिल्ली ही विचारप्रणाली तपासल्याशिवाय फार पुढे जाता येणार नाही. पाच–सहा वर्षापूर्वी मुंबईत एशियाटिक सोसायटी, जी. आर. भटकळ फौंडेशन यांनी 'ऑल्टरनेट स्ट्रॅटेजीज ऑफ डेव्हलपमेंट' ह्या विषयावर व्याख्यानमाला आयोजित केली. त्यात डॉ. बी. डी. शर्मा, बगाराम तुळपुळे इत्यादिकांनी मूळ संकल्पनांचाच कसा पुनर्विचार होऊ शकेल यासंबंधी सूतोवाच केले आहे. कोणाही एका विचारवंताचे बोट धरुन विचारांच्या प्रांतात शिरू नये हे खरे, परंतु गांधींचे बोट सोडण्यापूर्वी त्यांनी संचार केलेला परिसर एकदा पाहणे महत्वाचे आहे.

बोकीलांनी ' जनाचे अनुभव पुसतां' मध्ये मांडलेले अभ्यास किंवा गेल्या पन्नास वर्षातील एकूण प्रकल्पांची गाथा समोर ठेवली तर एक गोष्ट लक्षात येते. सुरुवातीची काही वर्षे मिश्र अर्थव्यवस्था, त्यानंतर समाजवाद आणि १९९० पासून मुक्त अर्थव्यवस्था यांचा धोशा चालू असला तरी प्रत्यक्षात नोकरशाही, भांडवलदार, आणि राजकारणी हे एकमेकांना सांभाळून सारी 'ऐहिक' प्रगती आपल्या वर्तुळातच खेळवत ठेवतात. क्वचित वि.म.दांडेकर यांनी दाखविल्यानुसार 'ऑर्गनाईज्ड इंडस्ट्री'(संघटित उद्योग) बरोबर 'ऑर्गनाइज्ड लेबर' (संघटित मजूरवर्ग) यात सामील होत असेल. परंतु एक फार मोठा जनसमूह हा या सर्व 'विकासा' पासून वंचित राहतो. आत्तापर्यत पुढे आलेल्या विकासाच्या पर्यायांना 'मानवी' चे हृदय देणेच नव्हे तर त्यात प्राण कसा भरायचा हा प्रश्न आपल्यासमोर ठाकतो. बोकीलांच्या उदाहरणांतून काही पर्याय दिसू लागतात.

❑❑❑❑

# ‘प्रयास’ आयोजित विकासप्रतिमान विषयक चर्चासत्राचा संक्षिप्त अहवाल

(रविवार, दि. १५ डिसेंबर २००२)

प्रास्ताविकाचे सत्र

चर्चासत्राच्या सुरुवातीला ‘प्रयास’ च्या वतीने श्री. शंतनू दीक्षित यांनी उपस्थितांचे स्वागत केले व ‘प्रयास’ बद्दल थोडक्यात माहिती दिली. १९९४ साली वैद्यकीय आणि इंजिनिअरिंग पार्श्वभूमी असलेल्यांनी ‘प्रयास’ ही संस्था सुरू केली. समाजासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग व्हावा हा हेतू या मागे होता. ऊर्जा, आरोग्य, शिक्षण व पालकत्व, तसेच संसाधने व उपजीविका ह्या चार विषयामध्ये प्रयासच्या चार गटां मार्फत काम केले जाते. आईकडून मुलाला होणारी एचआयव्ही एड्सची लागण कशी थांबवता येईल यावर नवीन प्रकल्प अलिकडेच सुरू केला आहे. वीजेच्या प्रश्नाबाबत सरकारी धोरणाचा अभ्यास, त्यावरील विश्लेषण व संशोधन लोकांपर्यंत पोचविणे असे ऊर्जा गटाच्या कामाचे स्वरूप आहे.

*संसाधने उपजीविका गटाचे काम*

त्यानंतर रामचंद्र कौलगी आणि कल्पना दीक्षित यांनी ’संसाधने व उपजीविका’ गटाच्या कामाची माहिती दिली. संसाधने आणि उपजीविका गट कोकणामध्ये कार्यरत आहे. वंचित घटकांचा उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व प्रयत्नांच्या केंद्रस्थानी कसा आणता येईल यावर संसाधने आणि उपजीविका गट काम करीत आहे. कोकणातील वंचित घटकातील विशेषतः रायगड जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाची उपजीविका कशी सुरक्षित करता येईल ह्या विषयावर विविध अंगांनी संशोधन व विश्लेषणाचे काम सुरू केले आहे. कोकणातील आठ संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हे काम आम्ही करीत आहोत. याबाबत नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करून शाश्वत शेतीद्वारे वंचित कुटुंबांना उपजीविकेची सुरक्षितता मिळवून देणे ह्या संकल्पनेभोवती हे काम चालू आहे.

त्याशिवाय शाश्वत उपजीविका (Sustainable Livelihood) या विषयावर आंतरराष्ट्रीय पातळीवर जी चर्चा चालू आहे, तिचा अभ्यास या गटातर्फे केला जात आहे. या चर्चेत काही आंतरराष्ट्रीय संस्थांनी पुढाकार घेतला आहे. परिणामी या चर्चेला एक राजकीय अंग आले आहे. या आंतरराष्ट्रीय संस्थांनी या चर्चेमध्ये शाश्वत उपजीविकेचा मुद्दा जागतिकीकरणाबरोबरच जोडून घेतला आहे. या चर्चेचा अभ्यास करणे आणि त्याचे ‘क्रिटिक’ उभे करणे हा ह्या गटाच्या कामाचा एक भाग आहे. तळागाळातल्या कार्यकर्त्यांसमोर या चर्चेचे विश्लेषण मांडणे आणि त्यांची दृष्टी, त्यांचा अनुभव आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चेमध्ये कसा नेता येईल यासाठी प्रयत्न करण्याची या गटाची इच्छा आहे. या कामाचा एक भाग म्हणून विकासाच्या पर्यायी प्रतिमानावर संकल्पनात्मक काम या गटातर्फे करण्यात येत आहे.

*चर्चासत्रामागील भूमिका*

यानंतर सुबोध वागळे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणालेः डॉ. मिलिंद बोकीलांच्या पुस्तकातील विवेचन व त्याला प्रा. स. ह. देशपांडे यांनी लिहिलेली प्रस्तावना यामध्ये विकास, नैसर्गिक संसाधने, त्यावरील स्थानकांचे हक्क, पर्यायी विकास ह्या विषयावर जी चर्चा झाली आहे त्याचे प्रयासच्या कामाच्या दृष्टीने मोठे महत्त्व आहे. या चर्चासत्राचे ते एक कारण आहे हे याआधी मांडले गेले आहेच. पण त्याबरोबरीनेच चर्चासत्राच्या आयोजनामागे इतरही हेतू आहेत. पुस्तकातील विवेचनामधून जे अजब रसायन समोर येते, त्यातून मिलिंद बोकील हा शिस्तबद्ध समाजशास्त्रज्ञ आणि सामाजिक जाणीव असलेला सहृदय लेखक म्हणून जाणवतो. त्याला दाद देण्याचा हा एक प्रयत्न आहे. स. ह. देशपांडे यांच्या प्रस्तावनेमधील पर्यायी विकासाच्या चर्चेला समोर ठेवून हे चर्चासत्र घेत आहोत. स.ह. गेली वीस वर्षे काही विवाद्य, काही दुर्लक्षित असे विषय घेऊन त्यांवर एका व्रतस्थ ज्ञानकर्मीच्या बांधिलकीतून काम करीत आहेत. आमच्यासारख्या अनेकांना समाजहितासाठी संशोधन करण्याची सहंनी जी प्रेरणा दिली त्याबद्दलची कृतज्ञतेची भावना व्यक्त करणे हेही या चर्चेमागचे प्रमुख कारण आहे.

या चर्चासत्रास मिळालेला प्रतिसाद हा भारावून टाकणारा आहे. गडचिरोली, नागपूर अशा लांबलांबच्या गावांहून येऊन लोकांनी आमच्यावर जो विश्वास दाखवला त्याचे चीज करण्याचा आम्ही प्रयत्न करू. विकासाच्या क्षेत्रात काही दशके विचार करणारी आणि जागतिक स्तरावर काम करणारी काही मंडळी येथे आली आहेत; हा आम्ही आमचा सन्मानच समजतो.

आजच्या चर्चेला ‘रूढ प्रतिमानाची समीक्षा’ इथपासून आपण सुरुवात करू या. पहिल्या चर्चासत्राचे संचालन व समारोप प्रा. एस्. डी. कुलकर्णी करतील व जेवणानंतरच्या दुसऱ्या चर्चासत्राचे संचालन व समारोप प्रा. रमेश पानसे करतील.

*डॉ. मिलिंद बोकील यांचे निवेदन*

यानंतर मिलिंद बोकीलांनी आपली भूमिका विशद केली. ते म्हणालेः विकासविषयक प्रश्नांची चर्चा करण्यासाठी म्हणून मी हे पुस्तक लिहिलेले नाही. पण विकास म्हणजे काय, कशासाठी करायचा, तो करण्याची पद्धत बरोबर आहे का हे सगळे प्रश्न अटळपणे पुढे आले आहेत. पुस्तकाला सहंनी प्रस्तावना लिहून चिकित्सक बुद्धीने जबरदस्त बौद्धिक आव्हान सगळ्यांसमोर उभे करून ठेवले आहे. त्यातून जे प्रश्न उपस्थित झाले आहेत त्यांना भिडण्यामध्ये बौद्धिक आनंदाचा भाग आहे. आपण जे प्रश्न मांडतो आहोत ते जिवंत माणसांचे आहेत, त्यांच्या धडपडीचे आहेत. आजची चर्चा ही कोरड्या तर्कवादाची नाही. या विकासाचे परिणाम लोकांना भोगावे लागत आहेत. यामुळेच या चर्चेला मानवी रसरशीत संवादचे असे परिमाण मिळणे अपेक्षित आहे.

या पुस्तकामागील दृष्टी समाजशास्त्रज्ञाची आहे. अशा प्रसंगी समाज कसा वागतो हे समजावून घेण्याची भूमिका आहे. सध्या समाजात एक दबलेली अस्वस्थता आहे. या संदर्भात मला तीन महत्त्वाच्या गोष्टी जाणवतात. (१) हे परिप्रेक्ष्य भारत देशाचे आहे. (२) या देशात या क्षणी लक्षावधी लोक दारिद्र्य आणि

विषमता यांची शिकार झाले आहेत. (३) या देशाचा या क्षणी एका विकसित जगाशी अत्यंत जवळचा घनिष्ट संबंध आला आहे.

त्यामुळे बदलाच्या अत्यंत वेगवान प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी घर्षण तयार झाले आहे. ही बदलाची प्रक्रिया जशी वेगवान आहे तसेच त्यामागे एक अट्टाहास, घाई संबंध वातावरणामध्ये आहे. या आग्रहामुळे या देशातील दारिद्र्य आणि विषमतेचा प्रश्न अधिक वेगाने उफाळून आला आहे. त्यामुळे या देशाच्या वस्त्रावर ताण आलेला आहे आणि ते फाटते आहे. संबंध वातावरणात अस्वस्थता आहे. या अस्वस्थेतेची चर्चा करून किमान काही तरी करू या. प्रयासने हे चर्चासत्र आयोजिले आहे, त्याबद्दल मी आभारी आहे.

*प्रा. स.ह. देशपांडे यांचे निवेदन*

यानंतर स.ह. देशपांडे यांनी आपली भूमिका मांडली. ते म्हणाले: तथाकथित औद्योगिक शहरी प्रतिमान, त्यावरील टीका आणि त्यावरील पर्याय हाच मुद्दा घेऊन मी बोलणार आहे. सुबोधच्या टिपणातली एकमेव मुद्दा महत्त्वाचा आहे. हे जे शहरी औद्योगिक प्रतिमान आहे ते जगावर आलेले अरिष्ट आहे असे त्याने लिहिले आहे. जणू काही हा प्लेग आहे. निकराचे प्रयत्न करून ते संकट टाळण्याचे प्रयत्न माणूस करतो आहे. ज्या शहरी औद्योगिक प्रतिमानाविषयी ते अस्वस्थता व्यक्त करतात त्याची व्याख्या नेमकी काय आहे? ते म्हणतात, 'या प्रक्रियेतील उद्योगांचा आकार, त्यांची केंद्रीभूत रचना, त्यामध्ये खनिज किंवा पुनर्निर्मितीक्षमता नसणाऱ्या ऊर्जासाधनांचा होणारा वारेमाप व अपव्ययी वापर, त्यामधून निर्माण होणारी पर्यावरणास व मानवी जीवनास घातक असणारी विषारी रसायने, त्यामध्ये कामगारांवर होणारा अन्याय, उद्योगाच्या महाकाय आकारांमुळे त्यांच्या ठायी एकवटणारी अमर्याद आर्थिक–राजकीय सत्ता, त्या उद्योगांची मर्यादित रोजगारक्षमता...' असे त्यांनी वर्णन केले आहे. हे वर्णन एका विशिष्ट तंत्राचे आहे. एवढेच जर टीकेचे लक्ष्य असेल तर उत्तर सरळ आहे. ही जी तंत्रविद्या आहे ती बदलली पाहिजे, तिच्यात सुधारणा केली पाहिजे. हे काम नियोजनकारांचं आहे. स्वयंसेवी संस्थांचे काम अशा नियोजनास उत्तेजन देणे; सुविधा, सामग्री उपलब्ध करून देणे; त्यांच्यामागे उभे राहणे हे आहे. हे अवघड आहे. मात्र त्याहीपेक्षा मला असे वाटते की, ही जी व्याख्या सुबोधनी केली, त्यामागे आणखी काही तरी आहे. त्याचा ध्वनी असा निघतो की, या तंत्रविद्येमागील अर्थव्यवस्था म्हणजेच भांडवलशाही. या विस्तारात ते गेलेले नाहीत. नुसते तंत्रच बदलून चालणार नाही तर अर्थव्यवस्थाही बदलली पाहिजे असे सुबोधनी म्हटले आहे. खासगी मालकी, मुक्त अर्थव्यवस्था, बाजारपेठा ही जी अर्थव्यवस्था आहे आणि त्याविषयी जे वर्णन केले आहे ते हे प्रतिमान असू शकते. मग या सगळ्या अर्थव्यवस्थेला पर्यायी अर्थव्यवस्था कोणती हा प्रश्न मनामध्ये निर्माण होतो.

हे खरोखर अरिष्ट आहे का? या अर्थव्यवस्थेने जगाच्या संस्कृतीला काही महत्त्वाच्या देणग्या दिल्या आहेत. व्यक्तीस्वातंत्र्य, मूलभूत हक्क प्रत्यक्षात यायचे असतील तर त्याला आर्थिक स्वातंत्र्याचे पाठबळ लागते. या अर्थानं लोकशाहीची, व्यक्तिस्वातंत्र्याची प्रतिष्ठापना करण्याचे काम या अर्थव्यवस्थेने केलेले आहे. आर्थिक विकास तर घडवून आणलेलाच आहे. ज्या देशातून संपूर्ण संपत्तीचे राष्ट्रीयीकरण झाले, त्यांची अवस्था काय आहे आणि ज्या देशात खासगी मालमत्तेचे रक्षण केले गेले त्यांची अवस्था काय आहे हे आपण पाहतो आहोत. या दोन बाजू लक्षात घेऊन हे प्रतिमान तयार झाले आहे. नैतिक बदल झाला का? थोडासा झाला. स्वातंत्र्य आणि समता मूल्ये आपल्या भारतीय संस्कृतीत कधीच नव्हती. ती पाश्चात्त्यांकडून आपण घेतली आणि लोकशाहीमुळे ती बळकट झाली. निदान एका बाबतीत माणसाची उन्नती झाली आहे. माणसाला माणूस म्हणून जगाच्या काही थोड्या भागात तरी प्रतिष्ठा मिळू लागली आहे. म्हणून हे केवळ अरिष्ट आहे असे मला म्हणता येत नाही.

भारताच्या संदर्भात अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे जातिसंस्था आहे. जर जातिव्यवस्था मोडायची असेल तर मुक्त अर्थव्यवस्था हेच त्याच्यावर उत्तर आहे. कारण मुक्त अर्थव्यवस्था एक मूल्यबदल घडवून आणते. अर्थव्यवस्थेला हातभार लावणारा जो कोणी असेल त्यानुसार माणसं नेमली जातात. माणसाच्या प्रतिष्ठेचा निकष कोणता? तर माझा नफा वाढवणारा असेल त्याला मी प्रतिष्ठा देईन. हा मूल्यबदल होण्यास आपल्याकडे सुरुवात झाली आहे. जन्माधारित, कुलाधारित प्रतिष्ठा आधी आपल्याकडे होती. मुक्त स्पर्धेमधून आणि नफा पाहण्यामधून हा बदल घडून येतो.

उत्पादन संबंधांवर आधारलेली किती प्रतिमाने असू शकतील ते सर्व प्रयोग जगात करून पाहिलेले आहेत. त्यातून फक्त भांडवलशाही टिकून राहिली. कारण मानवी स्वभावाशी ते जास्त जुळणारे आहे. सामान्य माणूस स्वार्थी असतो. पण आपल्या स्वार्थाला धक्का न लागता दुसऱ्यासाठी काय करता येईल तेवढे तो करतो. त्याच्या स्वभावाला जी सुसंगत असेल ती अर्थव्यवस्था योग्य असे मला वाटते. पण या व्यवस्थेत दोष निर्माण होतात. ते दूर केले पाहिजेत. हे प्रतिमान कायम ठेवून त्यात सुधारणा करायच्या की तिला विरोध करायचा हा प्रश्न आपल्यापुढे आहे. पण मग याला पर्याय काय? अद्याप पर्यायी प्रतिमान असे कोणी दाखवलेले नाही. सध्या जे चालू आहे त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला तर मानवाचा विकास थांबेल अशी मला भीती वाटते.

जोपर्यंत तुमच्या डोळ्यासमोर दुसरा काही पर्याय नाही; तोपर्यंत ही नकारात्मक भूमिका आहे असे मला वाटते. सुबोधचे म्हणणे असे आहे की राजकीय शक्ती उभी राहिलेली नाही. अगोदर विचार आणि मग अंमलबजावणी असा यथाक्रम मला योग्य वाटतो. जगातील नवे विचार लोकांनी प्रथम निर्माण केले. मार्क्सने नवा विचार सांगितला. त्यानंतर ही व्यवस्था निर्माण झाली. अगोदर राजकारण, आंदोलने असे झाले तर ते दिशाहीन होण्याची शक्यता आहे. म्हणून आधी तत्त्वज्ञानाची मांडणी केली पाहिजे.

शेवटी मला एक मुद्दा मांडायचा आहे. समजा ही सर्व व्यवस्था सडलेली आहे. ती आपल्याला नाहीशी करायची आहे. तिच्याऐवजी दुसरे काही आणायचे आहे. तुम्ही जगात एकमेव देश असता तर ठीक झाले असते. पण सध्याचे जग तुम्हाला सुखासुखी असा प्रयोग करू देणार नाही. तुम्हाला खूप शत्रू आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थिती काय आहे? पुढच्या पिढ्या केव्हा

अस्तित्वात येतील? आपण राष्ट्र म्हणून जगलो तर ! समर्थ झालो तर ! पण हे जे प्रयोग आपण करू; त्या वेळी हे भान असायला पाहिजे की, जगाच्या स्पर्धेमध्ये आपण मागे पडता कामा नये. ते स्वातंत्र्य आपल्याला नाही.

*डॉ. सुबोध वागळेः दोन संक्षिप्त खुलासे*

सुबोध वागळे यांनी स.ह. देशपांड्यांच्या भूमिकेनंतर दोन खुलासे केले. ते म्हणालेः सहंनी माझी म्हणून प्रतिमानाची जी व्याख्या वाचून दाखविली; ती दोन क्रमांकाच्या पानावर आहे. ती खरेतर औद्योगिकरणाच्या प्रक्रियेची मी केलेली व्याख्या आहे. पान अकरावर माझी प्रतिमान विषयाची व्याख्या आहे असे म्हणता येईल. 'ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक परस्परसंबंध, वित्तीय व्यवस्था व संस्थात्मक संरचना अशासारख्या घटकांच्या घडणीमध्ये समाजातील 'राजकीय' शक्तीचा मोठा वाटा असतो व त्यातूनच विकासाच्या प्रतिमानाची जडणघडण होते. परिणामी, ह्या प्रतिमानामध्ये मानवी नियंत्रणाच्या बाहेरचे या अर्थाने अपरिहार्य, आपापतः मूल्यविरहित, अपौरुषेय असे फारसे काही असत नाही.' असे मी यासंबंधात म्हटले आहे.

दुसरा एक खुलासा असा की, पर्यायी प्रतिमान प्रत्यक्षात अस्तित्वात नाही असे मी म्हटले आहे. पण त्यावर चर्चाच झाली नाही असे मला वाटत नाही. खूप विचार, चर्चा झाली आहे. प्रत्यक्षात फारसे काही झाले नाही. त्यासाठी पूरक राजकीय बळ उभे राहिले नाही.

पहिले सत्रः प्रस्थापित प्रतिमानाची समीक्षा

यानंतर पहिल्या सत्रात 'प्रस्थापित प्रतिमानाची समीक्षा' या विषयावर चर्चा झाली. या सत्राचे संचालन प्रा. एस.डी. कुलकर्णी यांनी केले. या सत्रात छाया दातार, कुमार भंडारी, मोहन हिराबाई हिरालाल, मेधा पाटकर, तात्या कांबळे, प्रकाश गोळे, अजित अभ्यंकर, रा. प. नेने, रामदास भटकळ, गिरीश सोहोनी, सदा डुंबरे, जयंतराव पाटील, चंद्रकांत केळकर, रमेश पानसे यांनी भाग घेतला. त्या सत्रातील चर्चेतून अनेक महत्त्वाचे मुद्दे पुढे आले. त्यांचा थोडक्यात गोषवारा पुढे दिला आहे.

- जातिव्यवस्था मोडीत काढण्यासाठी औद्योगिकरणाचा उपयोग होईल असे सह म्हणाले. स्त्रीवादाची सुरुवात औद्योगिकरणामुळेच झाली आहे. एफिशिअन्सी हा मुक्त अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भांडवलशाहीत 'एफिशिअन्सी' हा शब्द मर्यादित अर्थाने वापरला जातो. नवऱ्याने घरात काम करायचे नाही कारण तो बाहेर एफिशिअंट आहे. यामध्ये गोष्टी एक्सटर्नलाइज होतात. एकूण अर्थव्यवस्थेपैकी फक्त एक अष्टमांश अर्थव्यवस्थेचा विचार केला जातो. लाइव्हलीहुड हा शब्दही आक्षेपार्ह आहे. कारण त्याचे दोन भाग आहेत. प्रॉडक्शन आणि रिप्रॉडक्शन. यातील फक्त दर्शनी उत्पादनाचा विचार केला जातो. स्त्री नेहमी पुनरुत्पादनाच्या कामाशी निगडित राहते. त्याचा विचार आपण जवळजवळ करीत नाही. हे जे पुरुषांचे काम स्त्री करीत आहे ते मध्यभागी यायला हवं. मुलांना मोठे करणे, त्यांचे संगोपन करणे यात जाणारा वेळ लक्षात घेऊन सगळी समाजरचना करायला हवी. स्त्रियांना करावे लागणारे पुरुषांचे काम, म्हाताऱ्या माणसांच्या व मुलांच्या संगोपनाचे काम यांना केंद्रस्थानी ठेवून समाजाची रचना केली पाहिजे. नैसर्गिक संसाधनांशी स्त्रिया बांधलेल्या राहिल्या आहेत. तिच्यावर संचारबंदी लादली गेली. त्यामुळे तिला घरात ठेवणे आले. घरातील कामांची जबाबदारी म्हणून ती स्थलांतरित होऊन बाहेर काही करू शकत नाही. अशा स्त्रीचं जीवन बदलायला पाहिजे. मुलं उखडण्याची प्रक्रिया आताच्या विकासामध्ये होते आहे.
- औद्योगिकरण माणसाशी जोडले जाता कामा नये. शहरीकरण किंवा औद्योगिकरण हे चांगलेच आहे किंवा वाईटच आहे असे नेमके म्हणता येणार नाही. आधी चांगले काय याविषयीचे निकष बनवावे लागतील. त्या निकषांच्या तपासणीनुसार कोणते प्रतिमान योग्य हे ठरवावे लागेल. सगळे पर्याय शोधून झालेत असे म्हणणे हे बरोबर नाही. भारतीय संदर्भातील दोन विचारवंत गांधी आणि विनोबा हे दिवसेंदिवस अधिक समर्पक होत चालले आहेत. १९०९ साली लिहिलेले गांधींचे 'हिंद स्वराज' नावाचे पुस्तक त्या दृष्टीने अभ्यासनीय आहे. विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तकातही सर्वायतन राज्यव्यवस्थेची मांडणी केली आहे. सह म्हणतात तशी विचारप्रक्रिया महत्त्वाची आहेच. पण इतके अपरिहार्य आहे असे मला वाटत नाही. एखादा विचार माहीत नसलेला समाजसुद्धा त्या विचाराशी सुसंगत अशी कृती करतो.
- ऐहिक सुखाचा शोध अमर्याद आहे, असे म्हणणे बरोबर नाही. माणूस आपल्या सुखाला स्वतःच एक मर्यादा आखून घेतो. तो स्वतःच्या पलिकडे समष्टी मानीत असतो हे आपल्याला अभिमानाने मान्य करावे लागते. विकासाच्या आपल्या मूल्यांना धरून काही गोष्टी आपल्याला निश्चित करता येतात. मानवाच्या स्वाभाविक परिवर्तनामधून आपण त्या साध्य करू शकतो. संतुष्टी, संयम, त्याग माणूस करू शकतो. तो किती, याचे भान

प्राथमिक टिपणांमधून पुढे आलेले मुद्दे

समीक्षात्मक

१. औद्योगीकरण – शहरीकरण
२. विकास आणि राजकारण
३. मानवी संस्कृती व विकासाची संकल्पना
४. विकासप्रकल्प आणि विस्थापन
५. आपाततः तंत्रज्ञान
६. चंगळवाद आणि विकास

पर्यायी

१. भूमी आधारित विकसन प्रतिमान
२. जैविक विविधता

पर्यायी प्रतिमानासाठी विचारार्थ मुद्दे

१. पर्यायी व्यवस्थेचा नैतिक आशय
२. तंत्रज्ञानात्मक वैशिष्ट्ये
३. संस्थात्मक रचना
४. राजकीय वैशिष्ट्ये
५. आर्थिक रचना/वैशिष्ट्य

ठेवून आपण त्यातून संपूर्ण विकासाची संकल्पना मांडू शकतो. त्याला निकष म्हणता येईल. उद्दिष्टाची सुसंगत अशी भांडवलाची जोड (नैसर्गिक भांडवल) असल्याशिवाय काहीच होऊ शकत नाही. नैसर्गिक संसाधने आणि मनुष्य शक्ती यांच्या साह्याने आपण भांडवल निर्माण केले. या सगळ्याचा विचार केला तर आपल्या विकासाच्या संकल्पनेचा मतितार्थ आपण मांडू शकतो. समता, न्याय ही मुख्य मूल्ये मानली पाहिजेत. स्वावलंबन हे सुद्धा महत्त्वाचे मूल्य आहे. विषमता हा सध्याच्या व्यवस्थेचा फार मोठा आधार आहे. हे समजून घेत आपण समाजवादाचा पुरस्कार केला पाहिजे. तंत्राची निवड आपल्या विकासावर अवलंबून आहे. तंत्राची निवड हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. तंत्रज्ञानाची निवड करताना आपल्याला मनुष्यबळ, नैसर्गिक भांडवल, लाभाचे वाटप याचा अंदाज घ्यावा लागतो. केवळ उच्च तंत्राच्या साहाय्याने सर्व गोष्टी सुटत नाहीत.

- न्याय आणि समता यांचा उल्लेख आपण करतो पण पर्यावरणीय कायद्यांचा विचार करीत नसल्यामुळे या गोष्टी प्रत्यक्षात येत नाहीत. पूर्वी निसर्गातून श्रमशक्ती वापरून माणूस संसधाने घेत होता. उद्योगांचे प्रमाण वाढले तसे चैनीच्या गोष्टींच्या गरजा पुरविण्यासाठीच हे परवडते असे लक्षात आले. त्यामुळे चंगळवाद फोफावला. सर्वसामान्यांची क्रयशक्ती कमी होते. म्हणून ठराविक वर्गाला परवडेल अशाच वस्तूंचे उत्पादन होते. सर्वसामान्यांच्या गरजा पुरविण्याऱ्या वस्तूंचे उत्पादन करण्याकडे लक्ष पुरविणे शक्य होत नाही. या विषमतेवर मार्ग काढण्यासाठी पर्यावरणाकडे जावे लागते. निसर्गाकडून तुम्हाला प्राथमिक गरजा भागविता येत असतील तरच तुमच्या हातात उद्योग करण्यासाठी शक्ती राहील. यासाठी नैसर्गिक संपत्ती राहिली पाहिजे. आपल्या संस्कृतीतील संतुष्टी, संयम आणि त्याग यांचे महत्त्व जाणले पाहिजे.
- मुक्त अर्थव्यवस्था ही स्वाभाविक आहे असे सहंनी म्हटले आहे. पण मुक्त अर्थव्यवस्था नैसर्गिक नाही. ती टिकावी यासाठी इंग्लंड, अमेरिका यांना प्रचंड हिंसा करावी लागली. फार मोठे लष्करी बळ वापरावे लागले. ही व्यवस्था प्रयत्नपूर्वक टिकवावी लागली. ती आपोआप टिकली नाही.
- पर्यायाची त्रोटक चौकट नक्की न करता पर्यायाविषयी आपण काही सांगू शकतो का हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कुठल्या प्रकारची प्रॉडक्शन रिलेशनची चौकट ते आधी स्पष्ट करा. या प्रक्रियेमधील कोणती चौकट योग्य? ही चौकट खासगी मालकी आणि मुक्त बाजारपेठा ही तर नक्की नाही. मग कोणती? आपल्याला एक चौकट निवडावी लागेल (दिलेल्या चारपाच पर्यायांपैकी) मुक्त अर्थव्यवस्था आणि राष्ट्र टिकून राहणे यांचा संबंध येऊ शकत नाही. हे दोन शब्द विसंगत आहेत.
- ज्या व्यवस्थेमध्ये तुमच्या स्वातंत्र्याचा संकोच होत असेल ती व्यवस्था योग्य नाही. उत्पादन वाढले, त्याची गुणवत्ता वाढली, लोकांना निवड मिळाली परंतु पूर्णत्वानं पाहिलं तर तिथे निवड नाही असे लक्षात येईल. या सगळ्यासाठी आपण कशाची किंमत देणार आहोत याविषयी आपण जागरूक राहिले पाहिजे. तुमची शुद्धता जाणार असेल तर समाज एकसंध झाला, भेद नाहीसा झाला असे म्हणण्याला अर्थ आहे का? डायव्हर्सिटी होणार असेल तर प्राधान्य कशाला द्यायचे हे ठरविले पाहिजे?
- समाजाच्या पुनर्रचनेची गरज उत्पन्न झाली आहे. हे शक्य आहे का हे आपण पाहात आहोत. मानवाच्या गरजांचं क्षितिज रुंदावणे अपरिहार्य आहे. गरजांचं क्षितिज रुंदावणार नसेल तर तो माणूसच नाही. मानवी संबंध कसे असावेत? तो उच्चतर पातळीवर नेण्याचा सारखा प्रयत्न करीत राहणे हे पुनर्रचनचे दुसरे उद्दिष्ट असावे. म्हणजेच ते समाजाच्या पातळीवर नेणे. यासाठी आवश्यक असणारी व्यवस्था निर्माण केली तरी प्रत्यक्षात तसे होत नाही.
- सारे जग मुक्त अर्थव्यवस्थेने पुढे जात असेल तर आपल्याला दुसरा कोणता पर्याय आहे असे सह म्हणाले. जेव्हा मुक्त अर्थव्यवस्था मुळात आली तेव्हाही दुसरा पर्याय नाही असा विचार होता. दुसऱ्या पर्यायाचा विचार आपण करू शकत नसलो तरी मग आपण लोकशाहीमध्ये आहोत असे कसे म्हणायचे?
- मुक्त अर्थव्यवस्था ही भांडवलशाहीचेचे रूप आहे. प्रत्यक्षात ही व्यवस्था कधीच मुक्त नव्हती. त्यातून विषमता तयार होते. वास्तव उत्पादनाचा जो व्यवहार आहे त्याच्या पन्नासपट टर्नोव्हर वित्त भांडवलाचा आहे.
- भांडवलशाही व्यवस्थेमध्ये काही तोटे दिसतात. वस्तू आणि पुरवठा यांचे प्रमाण अमर्याद झाले. बेकारी वाढली. नैसर्गिक संसाधनांचा फार मोठ्या प्रमाणात वापर होतो. यातून प्रदूषण होते. या कचऱ्याचे काय करायचे, हा प्रश्न आहे.
- इंडोनेशियाने मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. इंडोनेशिया शेतीमध्ये स्वयंपूर्ण होता. मुक्त अर्थव्यवस्था केल्यामुळे तेथील लोकांच्या अनेक सवयी बदलल्या आहेत. तेच इथेही होण्याची शक्यता आहे.
- एक शोषक आहे, भांडवलदार आहे आणि त्याने सर्वांना गरीब ठेवले आहे असे गृहित धरले जाते. सवर्ण, पुरुष यांचीच सर्व जबाबदारी आहे असे समजले जाते. पण जे शिकार झाले त्यांचीही या बाबतीत जबाबदारी आहे.
- समाजबदलाची जी आपण चर्चा करतो त्यात शैक्षणिक परिस्थिती, राजकीय व्यवस्था यांचा विचार केला तर आपल्या देशामध्ये जी काही वाईट व्यवस्था आहे; त्याबद्दल कृतीतून काही बाहेर आलेले दिसत नाही. ज्याची पिळवणूक होते तोही त्याला जबाबदार आहे, हे चूक आहे. खालच्या स्तरामध्ये काय प्रश्न आहेत ते जाणून घेतले तरच आपण जागतिकीकरणाचा योग्य तऱ्हेने विचार करू शकू. नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये प्रत्येक माणसाचा वाटा असला पाहिजे. पाणी, जमीन यामध्ये माणसाला केंद्रबिंदू मानून काम करता येते.
- नागरीकरणाच्या प्रेरणा औद्योगिकरणाखेरीज इतरही आहेत. स्वार्थ ही नैसर्गिक गोष्ट आहे. स्वार्थापेक्षा संचय या गोष्टीमुळे केंद्रीकरण होते आहे. विकेंद्रीकरण करून पर्याय शोधता येईल. ज्ञान हे फार मोठे भांडवल आहे. विकासाची दिशा ज्ञानाधारित असली पाहिजे.

### दुसरे सत्र : पर्यायी प्रतिमानाचे विविध पैलू

- यानंतर दुसऱ्या सत्रात 'पर्यायी प्रतिमान' च्या विविध पैलूंवर चर्चा झाली. या सत्राचे संचालन व समारोप प्रा. रमेश पानसे ह्यांनी केले. सत्रातील चर्चेमध्ये दिलीप कुलकर्णी, सदा डुंबरे, मेधा पाटकर, छाया दातार, मोहन हिराबाई हिरालाल, प्रकाश गोळे, प्रा. मुटाटकर, शाम असोलेकर, रा. प. नेने, तात्या कांबळे, रामचंद्र कौलगी, दयानंद प्रभू, अजित अभ्यंकर, विनय र.र. व रमेश पानसे ह्यांनी भाग घेतला. सत्रातील चर्चेमधील महत्त्वाच्या मुद्यांचा गोषवारा पुढील प्रमाणेः
- मुक्त अर्थव्यवस्था आपण स्वीकारली तरी अमेरिकेतील तंत्रज्ञान तीनशे वर्षांपासूनचे आहे तर आपल्याकडील पंचवीस वर्षांपूर्वीचे आहे. आपल्या लोकसंख्येमध्ये फरक आहे. म्हणून उत्पादकतेवर आधारलेले जे प्रतिमान आहे ते आपल्या देशाला अनुकूल नाही. सर्वांना रोजगार देणारं प्रतिमान आपल्याला आवश्यक आहे. म्हणून पर्यायी प्रतिमानाचा विचार करावाच लागेल. एफिशिअन्सीशी संबंधित अर्थव्यवस्था असावी असे म्हणणे बरोबर नाही. नीतीवर आधारलेल्या अर्थशास्त्रातून तयार झालेली उत्पादनेच महत्त्वाची आहेत. सर्वांना रोजगार मिळू शकेल अशी व्यवस्था आणली पाहिजे.
- समतेचा विचार मार्क्सने दिला. पण पर्यावरणाचा, स्त्रियांच्या कामाचा विचार झाला नाही. पुनरुत्पादनाच्या कामाचा विचार हा या संदर्भात झालाच पाहिजे. जी पुनरुत्पादनाची कामे स्त्रिया करीत होत्या ती कोणी करायची? मार्क्सने म्हटले आहे की, ती समाजाने करावीत. स्त्रियांचे काम नष्ट होणे म्हणजे ती कामे बाजारपेठेत येणे असे झाले आहे. मोठ्या प्रमाणात उत्पादन, वाहतूक या सगळ्या गोष्टी एकेकट्या स्त्रीला शक्य नसतात. त्याचा विचार करायला हवा. हे काम कोणी, कसे करायचे, ते कोणत्या स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शक्य होईल याचा विचार व्हावा. जमिनीचा हक्क, पाण्याचा हक्क स्त्रियांना मिळायला हवा. काम मिळणे हा जसा आपला हक्क आहे तसेच नैसर्गिक साधने मिळण्याचाही हक्क पाहिजे.
- अर्थव्यवस्थेकडून मूल्याकडे जाणारा असा हा विषय आहे. भौगोलिक परिस्थिती आणि मानसिक गरजा यांची सांगड घालायला हवी. व्यवहाराकडून तत्त्वाकडे जाणारा विचार सुरू व्हावा.
- भांडवलशाही आणि साम्यवादी व्यवस्थेने निसर्गाचा विचार केला नाही. म्हणून कोणत्या प्रतिमानातील विकासाच्या संकल्पना काय असणार आहेत याचा निकष ठरवावा लागेल. जसे जगून दाखवले गेले ते अधिक चागंले होते. गंगेच्या खोऱ्यात आपले पूर्वज जे उत्पादन करीत होते ते आजही जगाच्या निकषावर उतरणारे होते. उपभोगांची वाढ हे आजच्या व्यवस्थेचे परिमाण आहे. हा विकास आहे का? निसर्गातील संसाधने जर वाढत नसतील तर घटत्या संसाधनांद्वारा उत्पादने वाढत ठेवणे हे कसे शक्य आहे? त्यातून मूल्यांचे अधःपतन होत आहे. भारताचे तत्त्वज्ञान विधायक आहे तसे विकासाचे उद्दिष्ट ठरवले पाहिजे.
- आपण सर्व निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकतो का? आपल्या मूलभूत मानवी प्रेरणांना साक्षी ठेऊन आपल्या विकासाचा आकार किती ठेवावा हे आपण आता ठरवू शकतो का? आपले सरकार तरी इतके प्रभावी, स्वतंत्र राहिले आहे का? विकासासाठी वीस टक्के खर्च आपण करू शकतो. कोणतीही योजना प्रत्यक्षात आणताना व्यवहारतः काय शक्य आहे हेच पाहिले पाहिजे.
- स्वावलंबन हे व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंत लागू होणारे महत्त्वाचे मूल्य आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्य असले पाहिजे. खऱ्या लोकशाही मार्गाने साधनांचे नियोजन करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. नियोजनाच्या पायऱ्या आणि प्रक्रिया कोणत्या असणार हे सर्वात महत्त्वाचे. आजपर्यंत नियोजनाची केंद्रीकरणाची व्यवस्था होती. त्यामुळे लोकांकडून विरोध होत राहिला. हा विरोध विषमतेला आणि चुकीच्या नियोजनाला आहे. लोकांची सार्वभौम सत्ता असायलाच हवी. हातातल्या संसाधनांपासून किमान गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत. केंद्रीकरणाकडून वैश्वीकरणाकडे जी व्यवस्था गेली आहे ती नाकारणे आपल्याला आवश्यक आहे. अधिकाधिक विकेंद्रीकरण अंमलात आणले पाहिजे. देशातल्या खासगीकरणापासून जागतिकीकरणाकडे जाणारा विकास भारतातील गरजांच्या बाजूने उभा राहूच शकत नाही.
- सध्याच्या राज्यव्यवस्थेमध्ये लोकशक्ती प्रगट व्हायची असेल तर ती कोठे होऊ शकेल? समता आणि स्वातंत्र्य यांचे दर्शन कसे होईल ते पहावे. स्त्री आणि पुरुष एकत्रितपणे आपल्या निर्णयात जास्तीत जास्त सहभागी होऊ शकतील अशी व्यवस्था पाहिजे. बहुमताने निर्णय घेणे हे सुद्धा घातक ठरले आहे. यामुळे समाजाची दोन पक्षात विभागणी होते. सर्व समाजानेच निर्णय घेऊ असे ठरविल्यास समाज एकसंध राहील. स्वातंत्र्य याचा अर्थ असा की जे करतील त्याची फळे त्यांनाच भोगावी लागतील. आज असे होतेय की, निर्णय वेगळे लोक घेतात आणि त्याची फळं वेगळी लोक भोगतात. जेव्हा सर्वसंमती असेल, तेव्हा स्वतःच स्वतःचा निर्णय घेतला जाईल. तेव्हा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्रस्थापित होईल. निसर्गाच्या रचनेमध्ये व्यक्ती अमर्याद स्वतंत्र नसते. म्हणून अशा व्यक्तींची रचना पाहिजे की जे निसर्गावर आधारित निर्णय घेतील.
- निसर्गाचे ज्ञान आपल्याकडे त्रोटक आहे. आपला विकास परकीय कल्पनांवर आधारित आहे. जी नैसर्गिक परिसंस्था आहे तिच्या गरजा पुरविल्या तरच समतोल टिकून राहतो. आपल्या अस्तित्वासाठी ते आवश्यक आहे. नियोजन करताना नैसर्गिक विविधता आपण कमी करतो आहोत. खेडं हा केंद्रीभूत घटक मानायला हवा. त्या दृष्टीनं नियोजन व्हायला हवे. खेड्यांच्या पातळीवरच आपण अनेक उद्योग सुरू करू शकू. खेड्यांना पूरक अशी शहरे असावीत. आज उलट आहे. शहरांसाठी खेडी आहेत. उत्पादन वाढीवर फार भर दिला जातो. त्यापेक्षा वितरण चांगल्या प्रकारे कसे होईल यावर लक्ष दिले पाहिजे. खेड्यांमध्ये उद्योग निर्माण झाला तर स्थानिक लोकांच्या

गरजा भागून उरलेल्या गोष्टी बाजारात जातील. आणि तरच चंगळवादाला थांबवता यईल. जमीन आणि पाणी यांच्या जतनाकडे गांभीर्याने पाहायला हवे.

- युनिट ऑफ प्लॅनिंग निर्माण केले पाहिजे. जास्तीत जास्त समाजाला काय हवे आहे त्यानुसार हे प्लॅनिंग हवे. सध्याचे पाण्याचे साठे नष्ट झालेले आहेत. लोकसंख्या वाढली आहे. जागतिक परिस्थितीतील विकासाची मॉडेल्स तयार करायला हवीत.
- विकासाचा पर्याय कसा बदलणार हे ठरविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शाश्वत असणे ही संकल्पना ठरविताना आपल्या कमिटमेंट्स नक्की केल्या पाहिजेत. ट्रान्झिशन म्हणून आपण काय स्वीकारणार हेही ठरविले पाहिजे. हे ट्रान्झिशन करताना त्यातील महत्त्वाचे टप्पे आपण स्पष्ट केले पाहिजेत. रिस्टोरेशनही त्यातली एक स्टेप आहे. एफिशिअन्सी वाढवणे महत्त्वाचे नाही. फूटप्रिन्ट लहान करणे महत्त्वाचे आहे. एक प्रोजेक्ट ठरविणे आणि दुसरे नीती ठरविणे अशा दोन गोष्टी आहेत.
- दंडशक्ती महत्वाची आहेच. कायद्याला पूरक उपाय योजावे लागतील. पण कायदा पाहिजे. रूल ऑफ जस्टिस हे तत्त्व असायला हवे. अन्याय्य कायद्याच्या विरुद्ध जायचे असेल तर त्याला सर्वसंमती मिळतेच असे नाही. बहुमत हे पुढे टाकलेले पाऊल आहे. ते मागे घेऊ नये. तसेच आपल्या देशात आमूलाग्र असे क्रांतिकारक बदल झालेले नाहीत. भांडवलशाही या देशात क्रांतिकारक पद्धतीने आली नाही. ती लादली गेली. त्यामुळेच आपल्याकडील जातिव्यवस्था भांडवलशाही येऊनही नष्ट झाली नाही.
- लोकसत्ता विकेंद्रित झाल्याशिवाय लोकशाही रुजणार नाही. गोवागावी पीपल्स कमिटी असावी असे रॉय यांचे मत होते. लोहिया यांनी सांगितल्याप्रमाणे कुटिरोद्योग उभारल्यास त्यातून खेडी स्वयंभू होतील. लहान यंत्रांच्या साहाय्याने चौखांबा सारखी व्यवस्था लोहिया यांनी सुचविली होती. आज सर्व शास्त्रीय शोध भांडवलशाहीसाठी निर्माण झाले आहेत. माणसाची निर्मितीक्षमता कशी वापरली जाईल हे आपण आज पाहिले पाहिजे.
- खासगी मालकीवरील जागतिक बाजारपेठ सर्व दुरितांची निर्मिती करते. 'विकासप्रकल्प आणि विस्थापन' आणि 'विकास आणि राजकारण' हे जे चार आणि पाच क्रमांकाचे मुद्दे आहेत त्याविषयी मी बोलतोय. सामाजिक व्यवहारांवर खासगी मालकी असता कामा नये. ज्यांना हे मान्य आहे ते बाजारव्यवस्था नाकारतात. हा समाजसत्तावाद आहे. केंद्रीय व्यवस्थेत काही दोष दिसून आले तर ते दूर करता येतील. तंत्रज्ञानाच्या बाबतीत ट्रान्झिशनचे मुद्दे ठरवावे लागतील. संस्थात्मक रचना कशी असायला हवी हे ठरवायला हवे. स्वंयसेवी संस्था बोकीलांना आशादायक वाटतात. पण ज्या संस्था राजकीय नाहीत त्या हे करू शकणार नाहीत. राजकीय शक्तीची गरज यासाठी आवश्यक आहे. या बदलाच्या प्रक्रियेचे राजकीय प्रतिनिधित्व कोण करणार? त्याचा उल्लेख कुठे केला नाही तर ही चर्चा म्हणजे फक्त सुभाषित होईल.
- तंत्राला विरोध करून चालणार नाही. माणसाला वजा करील असी तंत्रे नकोत. कष्ट नको पण श्रम राहतील असे तंत्र पाहायला हवे. या देशात जे तंत्रज्ञान विकसित झाले त्या तंत्रज्ञानाचा अभ्यास झाला नाही. कारण त्याचा समावेश अभ्यासक्रमात नव्हता. त्याला तसे स्थान द्यायला हवे. आताचे तंत्रज्ञान जातिनिहाय आहे. त्याची मक्तेदारी मोडून काढली पाहिजे.
- वंचितांकडे चला हा संदेश आपण घेतला पाहिजे. संपूर्ण पाण्याचे नियोजन कोणाच्या तरी हातात सोपवले जात आहे. त्यासाठी आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे. पाण्याचे नियोजन काय असायला हवे याचे मार्गदर्शक तत्त्व आपण मांडायला पाहिजे. बुद्धिजीवींचा सहभाग अशा चळवळींमध्ये अत्यंत आवश्यक आहे. निसर्गापासून वंचित झालेल्या सर्व लोकांची माहिती घ्यायला हवी. आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्याला काय हवे आहे हे भारताला सांगता यायला हवे.
- गावपातळीवरील नियोजनाचा प्रयोग करायला हवा. पर्यावरण आणि नैसर्गिक साधनसंपत्ती हा प्रमुख भाग धरूनच नियोजनाचा विचार झाला पाहिजे असे विचार आता मांडले गेले. नियोजन करताना दीर्घकालीन की सद्यःस्थितीचा विचार करावयाचा हेही लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रीय पातळीवरच्या विकासाऐवजी स्थानिक पातळीवरच्या प्रतिमानावर यावे असे मला वाटते. काही गावे, पंचक्रोशीचा प्रदेश, पाणलोट क्षेत्र अशा तऱ्हेने एका विशिष्ट प्रदेशावर लक्ष केंद्रित करून अशा ठिकाणी लोकशाही नियोजन करावे. कुटुंबाभिमुख नियोजन करावे असे मला वाटते. माणसाची किमान उपजीविका काय असायला हवी याचा विचार व्हावा लागेल. तंत्राचा विचार आणि त्याला असलेले राजकीय परिमाण यांचा विचारही करायला हवा. राजकीय शक्ती त्याला पूरक ठरतील की विरोधी हे ठरवावे लागेल. चर्चेसाठी आणि प्रयोगासाठी एकत्र आल्यावर चळवळीसाठी एकत्र येणे शक्य आहे. असे गट निर्माण व्हायला लागतील.
- गावाच्या प्रमुख पदावर दलित असला तरी निर्णय घेणारे पाटील पटवारी असतात. सत्तेचे वाटप झाले पाहिजे. सत्ता एका जातीत एकवटता कामा नये.

### उत्तरमांडणीचे सत्र

या चर्चेला उत्तर देणारी मांडणी प्रा. स.ह. देशपांडे, डॉ. मिलिंद बोकील व डॉ. सुबोध वागळे यांनी केली.

*प्रा. स. ह. देशपांडे*

पर्यायी प्रतिमाने दोनच आली आहेत. एक म्हणजे साम्यवादाचे प्रतिमान. या बाबतीत माझे म्हणणे असे आहे की, समाजवादामध्ये समाजाची शक्ती राहत नाही. उदारमतवादाची धारणा अशी आहे की, राज्यसंस्था प्रबळ असताना चीनमध्ये दुष्काळ पडला. सोव्हिएटमध्ये दशसहस्त्र जमीन ओसाड झाली. तेथे लोकशक्तीचा दबाव नाही अशी स्थिती होते. सर्वसत्ताधारी व्यवस्थेमुळे हे होते. त्या सत्ताधीशाला वाटले तर तो समाजाचा फायदा करून देतो; नाही वाटले तर नाही. समाजवादाचा पर्याय मला पसंत नाही.

दुसरा पर्याय गांधी आणि विनोबा. गाव पातळीवर आणि थोडी गावं मिळून असे नियोजन करावे असा एक विचार पुढे आला. दुसरा विचार म्हणजे गाव पातळीवरचे स्वालंबन! असे जर केले तर गावागावामध्ये होणारा व्यापार पूर्ण बंद करावा लागेल. म्हणजे त्या गावाभोवती एक कडेच निर्माण होणार. हे प्रत्यक्षात येणे शक्य नाही. लहान परिसरात तंत्रज्ञान सीमित राहते. मग भाता आणि चाक यापलीकडे तुम्ही जाऊ शकणार नाही. अशाने तुमचे दारिद्र्य कधीच नष्ट होणार नाही. अशी तुकड्यातुकड्याने गावे राहिली तर सांस्कृतिकदृष्ट्या ती प्रगत होत नाहीत. पूर्वी गावं स्वावलंबी होती याचं कारण वाहतूकव्यवस्था सुधारलेली नव्हती. त्यामुळे अशी व्यवस्था ही गावांवर लादलेली होती. त्यातून मग ही गावं जातिव्यवस्थेत अडकून पडतात. राजकीय विकेंद्रीकरणाचा विचार रॉय, लोहिया यांनी सांगितला. पण ते त्यांचे स्वप्नरंजन होते. त्याचे प्रतिमान आणि प्रक्रिया त्यांनी सांगितली नाही.

अनेक देशांनी वेगवेगळी प्रतिमाने अंगिकारली. त्यांचा अभ्यास आपण करायला हवा. त्यांच्याकडे पाणी, वीज यांच्या टंचाईचा प्रश्न नाही. त्यामुळे त्यांच्याशी पडताळून भारताच्या स्थितीत त्या प्रतिमानांचा विचार करायला हवा.

कोणत्याही प्रतिमानाचा विचार करताना देशहिताचा विचार करायला हवा. राष्ट्राभिमान माणसाच्या मनात असतो आणि तो कायमचा राहील इकडे दुर्लक्ष होऊ नये. अमेरिकेने राष्ट्रवाद सोडला नाही. आम्हाला काहीतरी वेगळं, आकर्षक पाहिजे आहे का? मला असे वाटते की, जे आहे ते मान्य करा. त्यात काय सुधारणा करता येतील त्याचा विचार जास्त फलदायी ठरेल. आताच्या परिस्थितीत जे अन्याय होत आहेत त्यावर चर्चा करू या. त्यासाठी संघटना कशी करता येईल, त्यावर राजकीय उपाय कसा काढता येईल यावर चर्चा आणि प्रयत्न करायला हवा. गरिबी नष्ट करणे हे मला महत्त्वाचे वाटते.

मधुसूदन साठेंनी रोजगार हमी योजनेचा अभ्यास केला. त्यावरील त्यांचे निष्कर्ष असे की, रोजगारी दुप्पट झाली. उपस्थिती कमी होऊ लागली. भांडवली गुंतवणुकीमुळे गावे ओसाड झाली. माणसे शेतावरच असतात. पाणीपुरवठ्याची आकडेवारी जी त्यांनी लिहिली आहे त्यातून नेमके चित्र स्पष्ट होत नाही. साठे म्हणतात की, तीनतीन पिके घेतात; पण मग ते दिसत का नाही?

दुसरे असे की, १९८६-८७ मध्ये दुष्काळी भागात मी गेलो तेव्हा दलित वस्तीमध्ये हिंडत होतो. इथे भयानक दारिद्र्य आहे असे मला आढळले नाही. कोसबाडमधील दारिद्र्य बघून अंगावर शहारा येतो. मी माझ्या अभ्यासक मित्रांना यासंबंधी विचारले तेव्हा त्यांनी असे उत्तर दिले की, 'महाराष्ट्रात इतके दारिद्र्य नाहीच आहे.' हा परिणाम रोजगार हमी योजनेमुळे झाला किंवा काय ते पहावे लागेल. लँड आर्मीमध्ये वाईट काय आहे? अशा प्रकारे काम करायचे की नाही हे ठरविण्याचे तुम्हाला स्वातंत्र्य आहे. हे समूह भटके राहतील असे वागळे म्हणतात. ते भटके आहेतच. या योजनेकडे तुच्छतेने पाहू नये. म्हैस किंवा गाय घेऊन देण्याने त्यांचा काहीही फायदा होत नाही हे मी पाहिले आहे. दारिद्र्य निर्मूलनाचा पर्याय रोजगार हमी योजना हाच आहे असे मला वाटते.

*डॉ. मिलिंद बोकील*

एक स्पष्टीकरण म्हणजे, मी जेव्हा संस्था म्हणतो तेव्हा मला लोकांचे समूह, म्हणायचे असते. असे समूह जे स्वार्थापलिकडे जाऊन काम करतात.

माझ्या टिपणात मी म्हटले आहे तीच भूमिका मला कायम करावीशी वाटते. मुक्त भांडवलशाही किंवा समाजवाद ही काही मानवी समाजाची अंतिम ध्येये नाहीत. लाखो वर्षांच्या स्पॅनमध्ये अमुकच एक अंतिम प्रतिमान आहे असे मानण्याचे कारण नाही. या दोन्हीपेक्षा काही तरी निराळे मानवी समाजात येईल. त्यामुळे ज्या ज्या वेळी समाजात अस्वस्थता निर्माण होते तिला पर्याय काढण्याचे प्रयत्न सुरू होतात. एखादी गोष्ट आक्रमकपणे समोर येते तेव्हा तितक्याच समर्थपणे त्याला पर्याय समोर येऊ लागले. जे पर्याय उभे राहात आहेत तिकडे आपण डोळसपणे पाहिले पाहिजे. पर्याय शोधण्याचा हा प्रयत्न म्हणजेच जिवंतपणा आहे. त्यामुळेच आपण बदल घडवून आणू शकतो.

*डॉ. सुबोध वागळे*

चर्चेमध्ये मांडल्या गेलेल्या अनेक मुद्यांची, प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत असे मला वाटते. पर्यायांबद्दलच्या चर्चेमधून (कदाचित वेळेअभावी) तितकी स्पष्टता आली नाही. त्याबाबतचे गैरसमज दूर झाले नाहीत हे सहंच्या उत्तरमांडणीतून दिसून येते. त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांना विस्ताराने उत्तर देणे वेळेअभावी कठीण आहे. पण काही महत्त्वाच्या मुद्यांबाबतचे निराकरण व्हायला हवे. नमुन्यादाखल बोलायचे तर स्वावलंबन म्हणजे पोलिसी बळावर करावयाचे तालिबानीकरण नाही. असा रितीने खेड्याकडे जाणे म्हणजे स्वावलंबन नव्हे. सेल्फ साफिशंसी व सेल्फ रिलायन्स ह्यातील फरकांवर खूप चर्चा झालेली आहे. ती लक्षात न घेता स्वावलंबनाबाबत बोलणे अपुरे ठरेल. मुक्त स्पर्धेचे लॉजिक हे राष्ट्रवादाच्या विरोधात आहे किंवा नाही, मुक्त अर्थसंकल्पनेत राष्ट्राला काय स्थान आहे, या प्रश्नांना नीट उत्तरे मिळाली नाहीत.

वेगळे प्रतिमान कशासाठी? कारण या प्रतिमानाचे भीषण, दाहक परिणाम भोगणारे कोट्यवधी लोक आपल्याभोवती आहेत. पर्यायी प्रतिमानाचा शोध घेण्याचे हे मुख्य कारण आहे. आताचे प्रतिमान सपशेल फसले आहे याचा ढळढळीत पुरावा भोवती दिसतो म्हणून पर्यायी प्रतिमानाचा शोध!

''लँड आर्मीमध्ये स्वातंत्र्य आहे, आजही मजूर फिरतातच ना?'' असे सह म्हणतात. लँड आर्मीतल्या मजुरीसाठी न जाण्याचे स्वातंत्र्य म्हणजे उपाशी राहण्याचे स्वातंत्र्य. अशा उपाययोजनेला पर्याय नाही का? माणसाला जमीन व पाण्याचा हक्क द्या. त्या जमीन व पाण्याची उत्पादकता वाढवण्याचे तंत्र बसवा. त्यासाठी धोरणात्मक जी रचना हवी आहे ती उभी करा. उत्पादन वाढीतून होणारा फायदा सर्वांना मिळाला पाहिजे. महाराष्ट्रातील दारिद्र्य संपले असे म्हटले गेले. मात्र संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेने तयार करवून घेतलेल्या मानवी विकास अहवालामध्ये (ह्यूमन डेव्हलपमेंट रिपोर्ट)

असे म्हटले आहे की, महाराष्ट्रातील ३७% जनतेला किमान पातळीवरचे म्हणजे २७०० कॅलरी देणारे अन्न आजही मिळत नाही. यानंतर यापैकी काही मुद्यांवर अपुरी चर्चा झाली. वेळेअभावी ही चर्चा थांबवण्यात आली.

### विचारविनिमयाच्या प्रक्रियेसंबंधी सूचना

यानंतर चर्चासत्रामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींनी विचारविनिमयाची ही प्रक्रिया पुढे चालू ठेवण्यासंबंधी काही सूचना केल्या.

- एकाच ठोस मुद्यावर सर्वांनी चर्चा करावी. फॉर्म आणि कन्टेन्ट्स हे दोन्ही बदलते असू नयेत.
- एक प्रतिमान समोर ठेऊन त्यात काय बदल करायचे याची चर्चा करावी.
- दोनतीन जणांनी प्रथम चर्चा करून काही मुद्दे मांडावेत. मग त्याबाबत इतरांनी चर्चा करावी. केलेल्या प्रयोगांविषयी चर्चा व्हावी.
- कुणीतरी एकानं मांडणी करावी व इतरांनी तपासून पाहावी. जे गट प्रयोग करत आहेत. त्या प्रयोगगटांशी हा अभ्यासगट जोडलेला असावा. त्या प्रयोगगटांची अशी तयारी असावी की विचार व काम करणारे हे एकमेकांना पूरक ठरू शकतात.
- याच्या पुढे जाणारे विचारांचे एक टिपण तयार करावे. या लोकांपैकी जे सहज भेटू शकतात त्यांनी एकमेकांशी संवाद साधावा. चर्चेतून निघणाऱ्या समान मुद्द्यांचे टिपण करावे. ते सहंकडून तपासून घ्यावे. फील्डमध्ये काम करणारे लोक फारसे बोलले नाहीत. त्यांनी बोलावे. विद्यापीठात पॅनेल डिस्कशन्स घेऊन तिथे चर्चा घडवून आणाव्यात. समान मुद्दे काढून त्यावरून मसुदा तयार करावा. जो मसुदा तयार होईल, त्यात फील्ड मधील माहिती काम काहींनी करावे. प्रत्यक्ष लढणाऱ्यांशी संवाद, संपर्क ठेऊन मसुदा तयार करावा. परस्परांना पूरक काम होणे महत्त्वाचे आहे.
- तत्त्वचिंतक निर्माण होणे, पर्यायी प्रतिमानांची चर्चा होणे हे महत्त्वाचे आहे. मला असे वाटते की, सातत्याने अभ्यास करणारे असे एक ज्ञानपीठ तयार व्हावे. ते कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवतील, प्रयोग करणाऱ्यांशी (उदा. दाते, दाभोळकर) संपर्क ठेवतील, यातून नव्या विचारवंतांची पिढी निर्माण व्हावी. जेथे सातत्याने अभ्यास चालेल असे व्यासपीठ किंवा ज्ञानपीठ प्रयास किंवा तत्सम इतर संस्थेने सुरू करावे. वेगवेगळ्या संस्थांमध्ये फसलेले प्रयोग पुन्हा पुन्हा होत राहतात. कारण त्याचे रेकॉर्डच कुठे नसते. ते जर समोर असले तर नवीन संस्था काम करेल तेव्हा त्याचा उपयोग करील.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. सुबोध वागळे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची समाप्ती झाली.

### चर्चासंबंधी प्रतिक्रियांचा गोषवारा

चर्चासत्रासंबंधी सहभागी लोकांकडून ज्या प्रतिक्रिया आल्या त्यात बऱ्याच लोकांनी चर्चा समाधानकारक झाल्याचे लिहिले आहे. काही लोकांच्या मते चर्चा ठोस नव्हती, वेळ कमी पडल्याने सविस्तर चर्चा करता आली नाही तसेच चर्चा अपुरी झाली. बहुसंख्य लोक प्रस्थापित प्रतिमानाच्या विरुद्ध असल्याने स.हं. ची बाजू लंगडी पडली व प्रस्थापित प्रतिमान मान्य असणाऱ्या उद्योजक–प्रशासक यांना बोलवायला हवे होते असेही मत मांडले गेले.

(प्रस्थापित प्रतिमान मान्य असणाऱ्या अनेक प्राध्यापक व तज्ज्ञांना आवर्जून बोलावले होते. पण विविध कारणांमुळे ही मंडळी उपस्थित राहिली नाहीत–प्रयास)

ज्या मुद्यांवर चर्चा व्हायला हवी होती पण झाली नाही अशा मुद्यांमध्ये जागतिकीकरण, ग्रामोद्योग, लघुउद्योग, पर्यायी विकासाची इतर प्रतिमाने, अर्थनीती, संस्थात्मक रचना, तंत्रज्ञान व सामाजिक रचना, व्यवस्थापकीय कौशल्ये व मूल्ये, संस्कृतीचा विचार, विकासाचे एकक (unit), विकसन–प्रतिमान व राष्ट्रवाद, गांधीप्रणित विकासनीती, मार्क्सवादी प्रतिमान या मुद्यांचा अंतर्भाव सहभागी लोकांनी केला आहे. तसेच भांडवलशाही प्रतिमानातील दोष नीट मांडले गेले नाहीत असेही मत व्यक्त करण्यात आले आहे.

यापुढील चर्चा अधिक परिणामकारक होण्यासाठी ज्या सूचना आल्या आहेत त्यातील काही महत्त्वाच्या सूचना पुढीलप्रमाणेः

१. केवळ असहमतीच्या मुद्यांवरच बोलावे.
२. जे मुद्दे या चर्चासत्रात संक्षेपाने मांडले गेले ते सविस्तर लेखी कळवावेत.
३. विकासाचे एक ठोस प्रारूप घेऊन त्यासाठी आवश्यक व्यवस्थेसंबंधी चर्चा व्हावी.
४. सहभागी लोकांचे छोटे गट करून त्यांनी एकेका विषयावर चर्चा करून मांडणी करावी.
५. प्रत्यक्ष कार्यकर्ते/लेखक/चिंतक व इतर क्षेत्रातील तज्ज्ञ यांना समान वेळ द्यावा.
६. प्रस्थापित प्रारूप स्वीकारणारे, नियोजनकार इ. चा समावेश चर्चासत्रात असावा.
७. चर्चेसाठी कालमर्यादा अधिक ठेवावी. (दोन दिवस)
८. भाषेपेक्षा विचार महत्त्वाचे असल्यामुळे (मराठी थोडंफार समजणाऱ्या) अमराठी विचारवंतांचा समावेश चर्चासत्रात करावा.
९. लोकप्रतिनिधींना भेटून चर्चेची माहिती द्यावी.
१०. एकेका विषयावर व्याख्यान व त्यावर चर्चा घडवून आणता येईल.
११. प्रत्यक्ष प्रयोगांना भेटी देता येतील.

❑❑❑❑

# उपस्थितांची नावे व संपर्क पत्ते

१. अशोक सासवडकर, निर्मिती ग्राम विकास सेंटर, मु.पो.उद्धर, सुधागड, रायगड.
२. डॉ. जयंतराव पाटील, ॲग्रो इंडस्ट्रीज ट्रायबल वेलफेअर फाँऊडेशन, मु. पो. बोर्डी, ठाणे-४०१७०१, फोन - ९५२५२८-५४१०६.
३. कुमार भंडारी, पी-६, बिल्डींग नं १६, फ्लॉट नं १०, सेक्टर १५-अ, नवी पनवेल, रायगड.
४. शरद कुलकर्णी, दीपक बंगला, ७२०/१८ लालबहाद्दूर शास्त्री रोड, नवी पेठ, पुणे-३०. फोन - ५४४९६०५.
५. अरुण शिवकर, साकव, युसुफ मेहरअली सेंटर, मु.पो. तारा, पनवेल, रायगड, फोन - (०२१४३) २६२६२.
६. रा. प. नेने,५४४/२ सदाशिव पेठ, पुणे-३० फोन- ४४५४९०९.
७. गिरिश सोहोनी, बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाऊंडेशन, डॉ. मणीभाई देसाई नगर, नॅशनल हायवे नं. ४ वारजे. पुणे ५२. फोन- ५४६८५१५
८. सदा डुंबरे, साप्ताहिक सकाळ, ५९५ बुधवार पेठ, पुणे-२, फोन-४४५५५००
९. मोहन हिरालाल हिराबाई, शेंडे प्लॉट, रामनगर, चंद्रपूर - ४४२४०१, फोन - ०७१७२-२५८१३४.
१०. सुरेखा दळवी, ९, कृष्णकुंज, ३६ शिवाजी पार्क, डॉ.एम.बी.राऊत मार्ग, दादर, मुंबई-२८, फोन - ४४५८४८९.
११. श्याम असोलेकर, सेंटर फॉर एनव्हायरनमेंटल सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग,आय आय टी, मुंबई, पवई, मुंबई -४०००७६, फोन - ०२२-२५७६७८६७.
१२. विजया चौहान, ३३,ऑलिंपस,चोतानी मार्ग, माहिम, मुंबई-१६.
१३. प्रकाश गोळे, १-बी, अभिमानश्री सोसायटी, पाषाण रोड, पुणे - ८, फोन - ५६५०४०८.
१४. छाया दातार, ७, मंजिरी, मकरंद सहनिवास, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई, फोन - ०२२-२४४४९४६८.
१५. उल्का महाजन, बी-२०२, पायल सोसायटी, सेक्टर -१७, नवीन पनवेल, जि. रायगड, फोन - २७४५८९०१.
१६. हेमंत देसाई, सी.-३, गुलमोहर, मुनिसीपल वसाहत, डी.जी. महाजनी पथ, शिवडी (प.), मुंबई १५, फोन - २४१३५८६४.
१७. चन्द्रकांत केळकर, केशव गोरे स्मारक ट्रस्ट, आरे रोड, अंबामाता मंदिराशेजारी, गोरेगाव (ई), मुंबई ६२.
१८. अजित अभ्यंकर, सुहासिनी (बी), अपार्टमेंट, तुळशीबागवाले कॉलनी गल्ली, सहकार नगर, पुणे-९, फोन - ४२२०१८८.
१९. रा. के. मुटाटकर, ४९, आनंद पार्क, औंध, पुणे ४११ ००७. फोन - ५८८७२१९.
२०. रामदास भटकळ, डी-३ प्रथमेश, प्रभादेवी, मुंबई-४०००२५, फोन - २२-२४२२१०८८.
२१. दीपक पाटील, ॲग्रो इंडस्ट्रीज ट्रायबल वेलफेअर फाँऊडेशन, मु. पो. बोर्डी, ठाणे-४०१७०१, फोन - ९५२५२८-५४१०६.
२२. गिरीश संत, प्रयास उर्जागट, अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, डेक्कन जिमखाना पुणे -४, फोन - ५४२ ०७२०.
२३. शंतनू दीक्षित, प्रयास उर्जागट, अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, डेक्कन जिमखाना पुणे -४, फोन - ५४२ ०७२०.
२४. दिलीप कुलकर्णी, मु. पो. कुडावळे, ता. दापोली, जि. रत्नागिरी - ४१५७१२.
२५. डॉ. विवेक कुलकर्णी, समृध्दी, ६३५/८५, सदाशिव पेठ, निलायमसमोर, पुणे-३०, फोन - ४३३८३०५.
२६. विलास सावे, मु. पो. बोर्डी, ता. डहाणू, जि. ठाणे. ४०१७०१, फोन - ९५२५२८-२५४२७६.
२७. रमेश पानसे, सुगंध, विजयानगर कॉलनी, २११८ सदाशिव पेठ, पुणे-४११०३०, फोन - ४३३०३४३.
२८. प्रवीण लाटे, डी/३, शारदाश्रम, भवानीशंकर रोड, दादर, मुंबई- ४०००२८, फोन - २४२२७४२३/२३४९.
२९. डॉ. मिलिंद बोकील/नीता बोकील, ७ मुक्ता कॉम्प्लेक्स, अनिल पार्क, एरंडवणे, पुणे - ४, फोन - ५४४४२५२.
३०. सुनिती सु. र./विनय र. र., ६ राघव, श्री रघुराज सहनिवास, ११८ अ, विठ्ठलवाडी रस्ता, पुणे-३०, फोन - ०२०-४२५१४०४.
३१. कल्पनाताई साळुंखे, ११३, सेन्ट पॅट्रिक टाऊन, पुणे-सोलापूर रस्ता, पुणे-४११०१३, फोन - ६८७०२८५.
३२. तात्या कांबळे, सर्वांगीण विकास संस्था, तानाजी चौक, आनंद नगर, लातूर, पो.बॉ.नं ४२, फोन - २५६२३६.
३३. सतीश रेड्डी, मु. पो. बाभळगाव, ता. जि. लातूर, फोन - २६५४९६.
३४. अभय कांता, फ्लॅट नं. २६ विंग ४, आनंद पार्क, विठ्ठलवाडी, स. नं. १३/४/५ सिंहगड रोड, वडगाव (बु.), पुणे-५१, फोन- ४३४५१६२
३५. प्रसाद मणेरीकर, ११३ अ, शनिवार पेठ, चिरमंगल अपार्टमेंट, पुणे -४११०३०.
३६. सुभाष देशपांडे, गीत गोविंद अपार्टमेंटस्, ३३७, शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२, फोन - ४४५५२६७.
३७. स्वाती गोळे, १-बी, अभिमानश्री सोसायटी, पाषाण रोड, पुणे - ८, फोन - ५६५०४०८.
३८. माधव पुराणिक,१४९०, सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०. फोन - ४४७५३६७.
३९. मेधा पाटकर, द्वारा, सुनिती सु. र., ६, राघव, श्री रघुराज सोसायटी,सिंहगड रस्ता, पुणे-४११०३०, फोन - ४२५१४०४.
४०. दयानंद प्रभू, ६- ब, सरस्वती बाग, सोसायटी रोड, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई- ४०००६०, फोन - २८३७९९७२.
४१. पुष्पा बॅनर्जी, ३०२,मनिष दर्शन, फातिमानगर, पुणे-१३.
४२. अमृता गोस्वामी, द्वारा. प्रा. जी. एन. गोसावी, टेलुतला, जि. धुब्री, आसाम - ७८३३०१, फोन - ०३६६२-२३०७८३
४३. राम राठोड, चौधरी निवास, हडको वसाहतीजवळ, उस्मानाबाद रोड, तुळजापूर, फोन - २४४०६९
४४. प्रसन्न जोशी, ८, गुरुप्रसाद अपार्टमेंट. २३ आनंद निकेतन सोसायटी, कर्वेनगर, पुणे-५२, फोन - ५४३७११९
४५. प्रा. स. ह. देशपांडे, सी-२८, गंगाविष्णु संकुल,प्रतिज्ञा कार्यालयासमोर, कर्वे नगर, पुणे- ४११०५२, फोन - ५४३४८२९.
४६. माधव जोशी, ६०२, विघ्नहर्ता, शिवाजी रोड, मो. ह विद्यालयाशेजारी, ठाणे (प.) - ४००६०२. फोन - २५४१०३१०.
४७. माधुरी तळवलकर, ई-६ ए, गंगातीर्थ कॉम्प्लेक्स, अरण्येश्वर मंदिराजवळ, चंद्रशेखर आझाद रोड, पुणे ४११००९.
४८. संजय संगवई, ७ चिंतामणी अपा. १९, शिक्षक नगर, पौड रोड, कोथरूड, पुणे - ३८, फोन - ५४५०८७०
४९. माधुरी मनोहर

❑❑❑❑

# कमी खर्चाची शाश्वत शेती

## प्रयोग, प्रत्यक्षदर्शन, प्रशिक्षण,
## माहिती संकलनाचा चार सूत्री कृती–कार्यक्रम

*प्रयास, संसाधने व उपजीविका गट, पुणे.*

### संसाधने व उपजीविका : एक दृष्टिक्षेप

झाडे–झुडुपे, जंगले, गवताळ भाग, ओढे–नाले, शेत–जमीन यांसारख्या सभोवतालच्या परिसरातील नैसर्गिक संसाधनांवर बहुसंख्य ग्रामीण भागातील लोकांची उपजीविका अवलंबून असते. मात्र या संसाधनांची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होत असल्याने ग्रामीण लोकांच्या उपजीविकेची स्थिती खालावत चाललेली आहे. त्यातही विशेषतः दलित, आदिवासी, व महिलांसारख्या वंचित समाजसमूहांच्या बाबतीत नैसर्गिक संसाधनाच्या उपलब्धततेचा प्रश्न देखील तीव्र बनला आहे. जमिनीवरील मर्यादित खाजगी मालकी व सामाजिक मालकीतील संसाधनांवर होणारी बाहेरची आक्रमणे ही त्या मागील मुख्य कारणे होत. सरकारी कार्यक्रम व विविध संघटनांनी दिलेले लढे यामुळे या वंचित घटकांना जमिनी उपलब्ध झाल्या आहेत व होत आहेत. मात्र, या जमिनीचा दर्जा व उत्पादकता दोन्ही खूपच कमी असल्याने त्यातून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सुटत नाही. त्यातच वाढते औद्योगीकरण, शहरीकरण व जागतिकीकरण यामुळे बाहेरील ताकदवान गटांचे स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर (विशेषतः सामायिक मालकीच्या) होणारे आक्रमण वाढते आहे.

ह्या साऱ्या परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवणे व त्यावर अवलंबून असलेल्या ग्रामीण लोकांच्या विशेषतः वंचित घटकांच्या उपजीविकांना बळकटी देणे ह्या उद्दिष्टांनी प्रयास संस्थेचा संसाधने व उपजीविका गट विविध प्रकारची कामे करीत आहे. कमी बाह्य साधने वापरून करावयाची कमी खर्चाची व शाश्वत शेती ह्या संकल्पनेवर आधारित कृती–कार्यक्रम हा त्या कामांतील एक महत्त्वाचा भाग आहे.

### कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती पद्धती

शेती ही ग्रामीण भागातील जनतेसाठी उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. मात्र महाराष्ट्रातील बहुतेक भागातील शेतीची अवस्था वाईट आहे. राज्यातील फार मोठ्या भागामध्ये शेतीला पाणी नाही. जेथे पाणी आहे तेथे पाणी व खताचा गैरवापर झाल्याने उत्पादकता घटली आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य, विविध कारणांमुळे जमिनीची घटलेली प्रत, व जमिनीचे छोटे आकार यामुळे समाजातील वंचित घटक शेतीपासून पूर्णपणे दुरावले आहेत. मात्र जमिनी विकून शहरात जाण्यामुळे त्यांचा उपजीविकेचा प्रश्न सुटत नाही हे देखील त्यांच्या लक्षात आले आहे. शेतीसुधारणेसाठी नेहमी सांगितला जाणारा मार्ग म्हणजे पाणी, खते, कीटकनाशके यासारख्या बाह्य साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याचा मार्ग त्यांच्या आवाक्याबाहेरचा आहे हेही त्यांना स्पष्टपणे दिसते आहे. कारण त्यासाठी आवश्यक ती रोख रक्कम वा कर्जासाठी पत त्यांच्याकडे नसते.

खरेतर पाणी, खते, कीटकनाशके यांचा मोठ्या प्रमाणात वापर जमिनीला हानिकारक ठरतो व तो मोठ्या शेतकऱ्यांनाही परवडणारा नाही हे आता सर्वांच्याच लक्षात आले आहे. त्यामुळे आजच्या बाह्य साधनांच्या भरपूर वापरावर आधारित परंतु अशाश्वत शेतीपद्धतीचा त्याग करण्याची वेळ आली आहे. त्याऐवजी वरील बाह्य साधनांचा कमी वापर असणाऱ्या व म्हणून कमी खर्चाच्या अशा आर्थिक व पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्याची आज नितांत गरज आहे.

महाराष्ट्र शासनानेही आता शाश्वत शेतीला अधिकृत धोरण बनवले आहे. वंचित घटकांचा विचार करता त्यांच्या आर्थिक ताकतीच्या बळावर त्यांच्या जमिनीच्या छोट्या तुकड्यातून अन्नसुरक्षितता मिळवण्यासाठी व पोषक आहाराची गरज भागवण्यासाठी कमी खर्चाच्या शाश्वत शेती तंत्राचा वापर महत्त्वाचा ठरेल. त्यामुळे वंचित घटकांना शाश्वत शेतीचे दार खुले करून देणे हे शेती धोरणाचे व विकास धोरणाचे प्रथम उद्दिष्ट असायला हवे.

ह्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी प्रयासतर्फे होणाऱ्या कामामध्ये कमी खर्चाच्या शाश्वत शेतीच्या पुढील चार पद्धतींवर भर दिला जात आहे. (१) सुपीक माती किंवा बागमाती तयार करणे, (२) पीक संगोपन करणे, (३) एकात्मिक कीड नियंत्रण साधणे, (४) कुंपण व सूक्ष्म वातावरण निर्मिती करणे.

शाश्वत शेतीच्या वरील पद्धतींचा अवलंब केल्याने शेतीची उत्पादकता दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होईल. याचबरोबर बाह्य साधनांवरील अवलंबित्व म्हणजेच रोख रक्कम वा कर्जाची गरज कमी होऊन ग्रामीण भागातील वंचित घटकांच्या उपजीविकेस बळकटी मिळेल. या धारणेने प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे 'कमी खर्चाच्या शाश्वत शेती'वरील चार सूत्री कृती-कार्यक्रम राबवला जातो आहे.

## कमी खर्चाच्या शाश्वत शेतीचा चार सूत्री कृती-कार्यक्रम

प्रयासच्या चार सूत्री कार्यक्रमातील प्रयोग व प्रत्यक्षदर्शनाचे काम साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, ता. माणगांव, जि. रायगड येथे असणाऱ्या प्रयासच्या संसाधने व उपजीविका अभ्यास केंद्रात चालू आहे. सेंद्रिय पदार्थांचा वापर करून मातीचा कस व पोत सुधारण्याची तंत्रे, विविध टप्प्यांमध्ये पिकांची योग्य वाढ व्हावी यासाठी पीक संगोपनाची तंत्रे व पिकांवरील कीड व्यवस्थापनाची एकात्मिक तंत्रे यावर विविध प्रयोग या अभ्यासकेंद्रावर चालू आहेत. कमीत कमी साधनात व खर्चात सुपीक माती बनवणे, बांधावर व कुंपणात बहुउपयोगी वनस्पतींची लागवड, हरित - सजीव कुंपणाची लागवड, शाश्वत शेती तंत्राने वाढविण्यात येणारी परसबाग व छोटे भाजीपाला प्लॉट, कीड व्यवस्थापनासाठी विविध नैसर्गिक तंत्रे इत्यादी सारख्या शाश्वत शेतीतील विविध घटक व तंत्रांचे एक जिवंत प्रत्यक्षदर्शन (डेमोन्स्ट्रेशन) उभे करण्याचे कामही या केंद्रावर चालू आहे.

कोकणातील समाजकार्य करणाऱ्या विविध संस्था संघटनांच्या कार्यकर्त्यांसाठी एक नियमित (आठ शिबिरांची मालिका असणारा) प्रशिक्षण कार्यक्रम सध्या प्रयासतर्फे या केंद्रावर राबवला जातो. डहाणू पासून ते देवगड पर्यंतच्या कोकणपट्ट्यातील एकूण नऊ सामाजिक संस्था - संघटनांच्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या शाश्वत शेतीचे काम करणाऱ्या आघाडी तुकड्या या प्रशिक्षण कार्यक्रमातून तयार होत आहेत.

प्रयोग व प्रत्यक्षदर्शन यातून मिळणाऱ्या तांत्रिक, आर्थिक व सामाजिक माहितीचे सखोल व पद्धतशीरपणे संकलन चालू आहे. त्याच बरोबर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी चालू असलेल्या शाश्वत शेतीतील प्रयत्नांचे पत्र व प्रत्यक्ष भेटीद्वारे माहिती संकलनही प्रयासतर्फे केले आहे.

## शाश्वत शेतीच्या कामामध्ये सहभाग

कमी खर्चाच्या शाश्वत शेती कार्यक्रमामध्ये आपण विविध प्रकारे सहभाग देऊ शकता.

- आपण आपल्या सहकाऱ्यांसह साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, परिसरातील प्रयासच्या अभ्यासकेंद्रास अवश्य भेट द्यावी. त्याद्वारे आपण शाश्वत शेती पद्धती व तंत्राची माहिती घेऊन, आपआपल्या ठिकाणी स्वतः त्या पद्धतींचा अवलंब करू शकाल तसेच इतरांना तसे करण्यास प्रवृत्त करू शकाल.
- आपणास अधिक खोलात जाऊन माहिती घ्यावयाची असल्यास ५ ते १५ जणांचा गट जमवून आमच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सामील होऊ शकता.
- आपण अनुभवी शेतकरी किंवा शेती संबंधातील विषयाचे तज्ज्ञ असाल तर प्रयासतर्फे चालणाऱ्या प्रयोग, प्रशिक्षण व माहिती संकलनाच्या कामाला हातभार लावू शकाल.
- आपणास सामाजिक कार्यास हातभार लावण्याची इच्छा असल्यास संसाधने व उपजीविका गटातर्फे चालू असलेल्या शाश्वत शेती उपक्रम तसेच इतर विविध उपक्रमांमध्ये आपण इतरही वेगवेगळ्या तऱ्हेने सामील होऊ शकाल.

## प्रयोग/प्रत्यक्षदर्शनाचे ठिकाण :

प्रयासचे संसाधने व उपजीविका अभ्यासकेंद्र,
द्वारा : साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक वडघर, ता. माणगाव,
जि. रायगड. फोन नं. - ०२१४० - २५०२०५

## प्रयासविषयी

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने 'आरोग्य', 'ऊर्जा', 'शिक्षण व पालकत्व' तसेच 'संसाधने व उपजीविका' ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, वाङ्मनिर्मिती, इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

---

प्रयास

**संसाधने व उपजीविका गट :** 'मंगेशपुष्प', सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद सोसायटी, बायफच्याजवळ, वारजे, पुणे – ४११०५२, ☎ ५२३ २८३६, मोबाईल–९४२२३१७५३०, फॅक्स – ५६७ ३११८/५४२ ०३३७, E-mail: reli@vsnl.net Web-site: www.prayaspune.org

**नोंदणीकृत कार्यालय :** अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, पुणे–४११ ००४, ☎ ५४४१२३०,५४२०३३७.